
# मध्ययुगीन भारताचा इतिहास

## इयत्ता सातवी



शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक :
प्राशिसं/२००८-०९/मंजुरी ५०५(२३)/१२०६ दिनांक २५.२.२००८

# मध्ययुगीन भारताचा इतिहास

## इयत्ता सातवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २००८
पुनर्मुद्रण :
जुलै, २०११

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

संपादक मंडळ :
श्री. बापूसाहेब शिंदे
श्री. विजयचंद्र थत्ते
प्रा. गणेश राऊत
प्रा. अनिल गौतम
श्री. आबासाहेब शिंदे
श्री. लक्ष्मण भोये
श्री. मोगल जाधव, समन्वयक

लेखक :
प्रा. लहू गायकवाड
प्रा. दिलावरखान पठाण

संयोजक :
श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

मुखपृष्ठ व सजावट : श्री. सचिन जोशी
नकाशाकार : श्री. रविकिरण जाधव
निर्मिती : श्री. प्रभाकर परब, निर्मिती अधिकारी

अक्षरजुळणी : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
कागद : ७० जी.एस.एम. क्रिमव्होव
मुद्रणादेश : एन/टेक/२०१२-२०१३ (२.००)
मुद्रक : निट प्रिंटस्, एम.आय.डी.सी., अहमदनगर - ४१४१११.

प्रकाशक : श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी, म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## प्रस्तावना

'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० आणि २००५' अनुसार महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४' तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २००६-२००७ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू झाली आहे.

वरील शासनमान्य अभ्यासक्रमानुसार मंडळाने इतिहास विषयाचे इयत्ता सातवीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया विद्यार्थिकेंद्रित असावी, स्वयंअध्यनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'विहित क्षमता' प्राप्त कराव्या, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. 'स्वयंअध्ययन' सुलभ व्हावे, म्हणून पुस्तकात प्रत्येक पाठावर स्वाध्याय दिले आहेत.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. संपादक मंडळ, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने आणि परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(एस. एन. पवार)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक :** २५ फेब्रुवारी २००८

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | भारत आणि जग | १ |
| २. | प्रादेशिक सत्तांचा उदय | ७ |
| ३. | आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन | १३ |
| ४. | दिल्लीची सुलतानशाही | २० |
| ५. | विजयनगर व बहमनी राज्ये | २७ |
| ६. | धार्मिक समन्वय | ३३ |
| ७. | मुघल सत्तेची स्थापना व विस्तार | ३८ |
| ८. | मुघल सत्तेचा विस्तार | ४५ |
| ९. | नव्या सत्ताकेंद्रांची निर्मिती | ५१ |
| १०. | मुघलकालीन समाजजीवन | ५४ |
| ११. | शिवपूर्वकालीन महाराष्ट्र | ६१ |
| १२. | स्वराज्यस्थापना | ६८ |
| १३. | मुघलांशी संघर्ष | ७५ |
| १४. | स्वराज्याचा कारभार | ८४ |
| १५. | रयतेचा राजा | ९१ |
| १६. | मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम | ९६ |
| १७. | मराठी सत्तेचा विस्तार | १०३ |
| १८. | पानिपतचे तिसरे युद्ध | १०९ |
| १९. | मराठी सत्तेचे आधारस्तंभ | ११६ |

- मुखपृष्ठ - रायगड
- मलपृष्ठ - दौलताबादचा किल्ला


# १. भारत आणि जग

भारताच्या प्राचीन कालखंडाचा अभ्यास आपण मागील वर्षी केला आहे. या वर्षी आपण मध्ययुगीन कालखंडाचा अभ्यास करणार आहोत. मध्ययुगाचा काळ प्रत्येक देशाच्या इतिहासात वेगवेगळा असतो. भारतीय इतिहासातील मध्ययुगाचा कालावधी हा ढोबळमानाने इसवी सनाच्या नवव्या शतकापासून ते अठराव्या शतकाअखेरपर्यंतचा आहे. युरोपातील मध्ययुगाचा काळ इसवी सनाचे पाचवे शतक ते पंधरावे शतक असा आहे.

**सामंतशाही :** इसवी सनाच्या पाचव्या शतकामध्ये रोमन साम्राज्य लयास गेले. त्यानंतर युरोपात प्रभावी अशी मध्यवर्ती सत्ता राहिली नाही. परिणामी या काळात लोकांना आपल्या जीविताची व मालमत्तेबद्दलची असुरक्षितता वाटू लागली. इसवी सनाच्या आठव्या शतकात सम्राट शार्लमनने आपल्या प्रभावाखाली युरोप संघटित करण्याचा प्रयत्न केला. शार्लमनच्या मृत्यूनंतर त्याने निर्माण केलेल्या साम्राज्याचे विघटन झाले आणि पुन्हा मध्यवर्ती सत्ता दुर्बल झाली. या परिस्थितीचा फायदा ठिकठिकाणच्या प्रदेशांतील सामंतांनी घेतला. सामंत म्हणजे सरदार. सामंतांच्या प्रभावाखाली युरोपात एक नवी व्यवस्था अस्तित्वात आली. तिला 'सामंतशाही' असे म्हणतात.

प्रजेचे रक्षण करणे, आपल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था राखणे, राजाच्या वतीने न्यायदानाचे काम करणे आणि राजाच्या मदतीला जाणे इत्यादी प्रकारची कामे सामंतांना करावी लागत.

सामंत आपापल्या प्रदेशात तटबंदी असलेले वाडे बांधून राहत. या वाड्याला 'गढी' असे म्हणत. या गढ्यांमधून ते आपल्या प्रदेशाचा



गढी

कारभार पाहत. या प्रदेशातील शेतकरी व कष्टकरी लोक सामंतांच्या वर्चस्वाखाली असत. सामंत सामान्य जनतेचे मोठ्या प्रमाणावर शोषण करत. शेती उत्पन्नाचा मोठा वाटा ते शेतकऱ्यांकडून घेत असत. कालांतराने त्यांच्या जमिनी सामंतांनी बळकावल्या, त्यामुळे अनेक शेतकरी भूदास झाले. भूदास म्हणजे स्वतःच्या मालकीची जमीन नसलेले शेतमजूर. हे शेतमजूर सामंतांच्या सेवेत असत. या शेतकरी भूदासांची स्थिती हलाखीची होती. त्यांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसे. सामंतांच्या शेतीवाडीवर त्यांना विनावेतन काम करावे लागे.

**व्यापारी वर्गाचा उदय :** आशिया खंडातून विशेषतः भारतातून आणि आग्नेय आशियातून मसाल्याचे पदार्थ युरोपीय बाजारपेठेत विकले जात. युरोपबरोबर होणाऱ्या या व्यापारामध्ये अरबांचा सहभाग महत्त्वाचा

होता. मौल्यवान धातू, कापूस, रेशीम, साखर, चहा, कापड, मसाल्याचे पदार्थ इत्यादी वस्तूंना युरोपीय बाजारपेठांमध्ये मोठी मागणी होती. मध्ययुगात युरोपचा व्यापार वाढीस लागला. व्यापारविषयक विविध कामे करणारा व्यापारी वर्ग उदयास आला. युरोपात व्हेनिस, जिनोआ इत्यादी नवीन नगरे व्यापारासाठी प्रसिद्धीस पावली.

**इस्लामचा उदय :** इसवी सनाच्या सातव्या शतकामध्ये मुहम्मद पैगंबरांनी इस्लामची शिकवण दिली. 'कुरआन शरीफ' हा इस्लाम धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. इस्लाम या शब्दाचा अर्थ परमेश्वरावर नितान्त श्रद्धा, त्याच्या इच्छांचे व आज्ञांचे पालन आणि ईश्वराला संपूर्ण शरण जाणे हा होय.

**इस्लामची शिकवण :** ईश्वर एकच असून मुहम्मद पैगंबर हे ईश्वराचे प्रेषित आहेत. दररोज नियमितपणे पाच वेळा प्रार्थना करावी, रमजानच्या महिन्यात उपवास करावा, आपल्या उत्पन्नातून ठरावीक रकमेचा गोरगरिबांसाठी दानधर्म करावा, आपल्या जीवनात एकदा तरी हज यात्रा करावी, मातापित्यांविषयी आदर बाळगावा, अशी इस्लामची शिकवण आहे.

**अरबांचा उदय :** मुहम्मद पैगंबरांच्या या शिकवणुकीचा प्रसार अरबस्तानात झाला. आशिया खंडाच्या नैर्ऋत्येला असलेल्या मोठ्या द्वीपकल्पास अरबस्तान असे म्हणतात. अरबस्तानातील लोक विविध टोळ्यांमध्ये विखुरलेले होते. या टोळ्यांमध्ये परस्परांत नेहमी संघर्ष होत असे. मुहम्मद पैगंबरांनी त्यांना संघटित केले. पैगंबरांचे वारसदार म्हणजे खलिफा. त्यांनी अरबांच्या सत्तेचा विस्तार केला. हा विस्तार युरोपातील स्पेनपासून भारताच्या पश्चिम सीमेवरील सिंध प्रदेशापर्यंत झाला.

**अरबांचे योगदान :** अरबांनी कला, विज्ञान, साहित्य या क्षेत्रांत




upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. The territorial waters of India extended into the sea to a distance of nautical miles measured from the appropriate base line. The responsibility rest with the publisher.

© Government of India Copyright- 2008

लक्षणीय कामगिरी केली. स्थापत्यकलेची एक सुंदर शैली निर्माण केली. या स्थापत्यशैलीची अर्धवर्तुळाकार कमान, घुमट, उंच मिनार, रेखीव नक्षीकाम व जाळीकाम इत्यादी वैशिष्ट्ये होत. स्पेनमधील कार्डोवा, इजिप्तमधील कैरो आणि सौदी अरेबियातील मक्का, मदिना येथील मशिदीत ही शैली आढळते. सिरियामधील दमास्कस, इराकमधील बगदाद येथील विशाल राजवाडे हीं उत्कृष्ट स्थापत्यकलेची उदाहरणे आहेत. कारंजी असलेली मोठमोठी उद्याने हेही एक वैशिष्ट्य आहे.

शिक्षण आणि साहित्यातही अरबांनी लक्षणीय प्रगती केली. स्पेनमधील कार्डोवा हे विद्यापीठ महत्त्वाचे होते. बगदादमधील मदरशांमध्ये शिक्षण घेण्यासाठी दूरदूरच्या प्रदेशांतून विद्यार्थी येत असत. कैरो येथील विद्यापीठात एका वेळी बारा हजार विद्यार्थी शिक्षण घेत. अरबांनी प्राचीन ग्रीक व प्राचीन भारतीय वैज्ञानिक ग्रंथांची अरबीमध्ये भाषांतरे केली. खगोलशास्त्र व गणितविषयक भारतीय संकल्पना अरब लोकांमुळे पाश्चात्त्य जगाला परिचित झाल्या. जगप्रसिद्ध 'अरेबियन नाइट्स' मधील कथांचे संकलन याच काळात झाले.

अरब व्यापाऱ्यांनी आशिया खंडातील अनेक वनस्पती युरोपात नेल्या. संत्र्याचे पीक युरोपात रुजवले. खजुराची झाडे स्पेन व पोर्तुगालमध्ये लावली. बंदुकीची दारू, होकायंत्र, चिनीमातीची भांडी या गोष्टी त्यांनी चीनमधून युरोपात नेल्या.

**भारत आणि जग :** मध्ययुगात आशिया खंडातील विशेषत: भारताच्या संदर्भात व्यापाराच्या बाबतीत अरबांची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अरब सत्ताधीश भारताकडे वळले. आठव्या शतकामध्ये मुहम्मद बिन कासिम या अरबी सेनानीने सिंध प्रांतावर स्वारी केली. तेथील दाहीर राजाचा पराभव केला.

या स्वारीमुळे अरबांचा भारताशी राजकीय संबंध प्रथमच आला. यापुढील काळात मध्य आशियातील तुर्क, अफगाण, मुघल हे लोक भारतात आले आणि त्यांनी भारतात आपली सत्ता स्थापन केली. या संदर्भातील माहिती आपण पुढील पाठांमध्ये घेणार आहोत.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) भूदास म्हणजे स्वतःच्या ..........जमीन नसलेले शेतमजूर.

(आ) खगोलशास्त्र व ..........भारतीय संकल्पना अरब लोकांमुळे पाश्चात्त्य जगाला परिचित झाल्या.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) युरोपीय बाजारपेठांमध्ये कोणत्या वस्तूंना मागणी होती?

(आ) अरबांनी कोणत्या क्षेत्रांत लक्षणीय कामगिरी केली?

(इ) अरबांनी चीनमधून युरोपात कोणत्या गोष्टी नेल्या?

३. **तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सामंत कोणत्या प्रकारे जनतेचे शोषण करत?

(आ) इस्लामची शिकवण कोणती आहे?

# २. प्रादेशिक सत्तांचा उदय

इसवी सनाच्या आठव्या ते तेराव्या शतकाच्या काळात भारतामध्ये अनेक लहान-मोठ्या सत्ता उदयास आल्या. या पाठामध्ये आपण पाल, राष्ट्रकूट, चोळ, राजपूत आणि यादव या प्रादेशिक सत्तांविषयीची माहिती घेणार आहोत.

**पाल :** इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या उत्तरार्धात बंगालचा प्रदेश तेथे राज्य करणाऱ्या निरनिराळ्या राजांमध्ये विभागला गेला होता. तेथे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या परिस्थितीत बंगालमधील राजांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवले. ते सर्व एकत्र आले. त्यांनी सहमतीने गोपाल याची प्रमुखपदी निवड केली. इ. स. ७२५ मध्ये गोपालने बंगालमध्ये पाल सत्तेची स्थापना केली. त्याने मगधवर स्वारी करून राज्यविस्तार केला. त्याचा पुत्र धर्मपालाने मगधवर आपली सत्ता स्थापन केली. त्याने करतोया नदीच्याकाठी पुंडवर्धनपूर येथे आपली राजधानी नेली. धर्मपालाने कनोजचा राजा इंद्रायुध यास पराभूत केले. त्याला राष्ट्रकूट व प्रतिहारांशी संघर्ष करावा लागला, मात्र राष्ट्रकूट राजा तिसरा गोविंद याच्यापुढे धर्मपालाचे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. धर्मपालास कनोजवरील आपले प्रभुत्व राखण्यासाठी प्रतिहार राजा नागभट्ट याच्याशी संघर्ष करावा लागला. नागभट्टाने धर्मपालाचा मुंगेर येथे पराभव केला. धर्मपालानंतर त्याचा मुलगा देवपाल सत्तेवर आला. देवपालाने उडीसाचे राज्य आपल्या राज्यात समाविष्ट करून घेतले.

**राष्ट्रकूट :** इसवी सनाच्या आठव्या शतकात महाराष्ट्रात राष्ट्रकूट घराण्याचा उदय झाला. राष्ट्रकूट घराण्यातील दंतिदुर्ग हा पहिला पराक्रमी राजा होता. दंतिदुर्गानंतर सत्तेवर आलेला पहिला कृष्ण याने बदामी ही

चालुक्यांची राजधानी जिंकून घेतली. त्याने कर्नाटक आणि आंध्रप्रदेशचा काही भाग आपल्या राज्यात समाविष्ट केला.

इ. स. ७९४ मध्ये गादीवर आलेला तिसरा गोविंद या राजाच्या कारकिर्दीत राष्ट्रकूट सत्ता कनोजपासून रामेश्वरपर्यंत पसरली. त्याचा मुलगा अमोघवर्ष याने सोलापूरजवळ मालखेड हे नवे नगर वसवले. ते राजधानीचे केंद्र झाले. पुढे तिसरा कृष्ण याने अलाहाबादपर्यंतचा प्रदेश जिंकून घेतला. त्याने चोळ राजांनी दिलेले आव्हान मोडून काढले. दहाव्या शतकात चालुक्य राजा तैल याने राष्ट्रकूटांचा पराभव केला.

**चोळ :** चोळ हे घराणे दक्षिण भारतातील प्रमुख व प्राचीन घराण्यांपैकी एक होय. चोळांचे राज्य तमिळनाडूमध्ये होते. विजयालय हा चोळ सत्तेचा संस्थापक होय. इ.स. ८५० च्या सुमारास त्याने तंजावर जिंकून घेतले. तंजावर ही चोळांची राजधानी झाली. चोळांच्या इतिहासामध्ये पहिला राजराज आणि पहिला राजेंद्र हे दोन कर्तबगार राजे होऊन गेले.

पहिला राजराज याने गंग, चेर आणि पांड्य या राजसत्तांचा पराभव केला. आपल्या आरमाराच्या जोरावर त्याने मालदीव बेटे आणि श्रीलंकेचा उत्तरेकडील भाग जिंकून घेतला. पुढे त्याने वेंगीचा चालुक्य आणि कलिंगच्या राजाचाही पराभव केला. त्याने चोळांचे सामर्थ्यवान राज्य निर्माण केले.

पहिल्या राजराजानंतर त्याचा मुलगा पहिला राजेंद्र हा सत्तेवर आला. त्याने संपूर्ण श्रीलंका जिंकून घेतली. चेर व पांड्य यांचे राज्य आपल्या साम्राज्यास जोडून घेतले. चालुक्यांना त्याने अनेक वेळा पराभूत केले. गोदावरी नदी ओलांडून कलिंग, दक्षिण कोसल, पूर्व बंगाल या प्रदेशांतील राजांना पराभूत केले. पुढे तो गंगा नदीपर्यंत गेला.या विजयाप्रीत्यर्थ त्याने

'गंगैकोंड' असे बिरुद घेतले.

पहिल्या राजेंद्राने मलायातील शैलेंद्रच्या घराण्याच्या विरोधात आरमारी मोहीम हाती घेतली. भारताच्या इतिहासातील अशा स्वरूपाची ही पहिलीच मोठी आरमारी मोहीम होय. पहिल्या राजेंद्राने बंगाल, मलायाचा द्वीपकल्प जिंकून घेतला. त्याने गंगैकोंडचोलपुरम ही नवीन राजधानी उभारली.




Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. The territorial waters of India extended into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. The responsibility rest with the publisher. © Government of India Copyright- 2006

पहिल्या राजेंद्रानंतरचे चोळराजे फारसे कर्तबगार नव्हते.बाराव्या शतकात चोळ सत्तेचे महत्त्व कमी झाले. पुढे अल्लाउद्दीन खल्जीचा सेनापती मलिक काफूर याने चोळांची सत्ता संपुष्टात आणली.

**राजपूत :** इसवी सनाच्या अकराव्या शतकात अवंतीच्या प्रतिहारांची सत्ता ऱ्हास पावली. त्यानंतर उत्तर भारतात अनेक राजपूत सत्ता अस्तित्वात आल्या. त्यांपैकी कनोजचे गाहडवाल, माळव्याचे परमार, अजमेरचे चौहान या विशेष महत्त्वाच्या राजपूत सत्ता होत.

गाहडवाल घराण्याचा संस्थापक चंद्रदेव हा होय. कनोज ही गाहडवालांची राजधानी होती. गोविंदचंद्र हा गाहडवाल घराण्यातील कर्तबगार राजा होय. त्याने बंगाल, मगध आणि पूर्व माळवा हे प्रदेश आपल्या राज्याला जोडले. पुढे गझनीच्या मुहम्मद घोरीने गाहडवाल सत्तेचा शेवट केला.

परमार घराण्याचा संस्थापक कृष्णराज हा होय. माळव्यातील धार ही परमारांची राजधानी होती. या घराण्यातील सर्वांत महत्त्वाचा आणि कर्तबगार राजा भोज हा होय. त्याने परमारांची सत्ता दक्षिणेत कोकणपर्यंत वाढवली. तो पराक्रम, विद्‌वत्ता व गुणग्राहकता यांसाठी प्रसिद्‌ध होता. चौदाव्या शतकाच्या आरंभी अल्लाउद्दीन खल्जी याने परमारांची सत्ता संपुष्टात आणली.

राजस्थानच्या उत्तरेकडील प्रदेशात चौहानांचे राज्य होते. तिसरा पृथ्वीराज चौहान हा या घराण्यातील पराक्रमी राजा होता. त्याने इ.स. ११९१ मध्ये तराईच्या लढाईत मुहम्मद घोरीचा पराभव केला. कनोजचा गाहडवाल राजा जयचंद राठोड याचे पृथ्वीराजाबरोबर तणावाचे

संबंध होते. मुहम्मद घोरीने पुढील वर्षी पृथ्वीराजाविरुद्ध मोहीम हाती घेतली. त्या वेळी पृथ्वीराजाने जयचंद राठोडला मदतीला बोलावले, तथापि जयचंदाने त्याला सहकार्य केले नाही. मुहम्मदाने पृथ्वीराजाचा पराभव करून अजमेर जिंकून घेतले. त्यानंतर कनोजवर स्वारी केली. त्याने जयचंदाला ठार केले.

**यादव :** महाराष्ट्रातील हे एक इतिहासप्रसिद्ध घराणे होय. आरंभी यादव हे नाशिक जिल्ह्यातील चांदवड या ठिकाणी स्थायिक झाले. यादव राजा सेऊणचंद्र याने सिन्नर येथे राजधानी नेली. इसवी सनाच्या बाराव्या शतकात पाचवा भिल्लम याने आपली राजधानी औरंगाबादजवळील देवगिरी येथे नेली. तेथे त्याने स्वतःस राज्याभिषेक करून घेतला.

यादव घराण्यातील दुसरा सिंघण हा सर्वांत कर्तबगार राजा होय. त्याने माळवा, कर्नाटक आणि जवळ जवळ संपूर्ण महाराष्ट्र या प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्याच्या काळात यादवांची सत्ता कळसास पोहचली. तेराव्या शतकात अल्लाउद्दीन खल्जी याने देवगिरीवर स्वारी केली, त्या वेळी रामचंद्रदेव हा राजा होता. अल्लाउद्दीनने त्याचा पराभव केला. यादव सत्तेचा ऱ्हास सुरू झाला. पुढे लवकरच यादवांची सत्ता संपुष्टात आली.

इसवी सनाचे आठवे ते तेरावे शतक या काळात भारतातील निरनिराळ्या प्रदेशांमध्ये विविध प्रादेशिक सत्ता उदयास आल्या. या सत्तांचा आपापसात सतत संघर्ष होत राहिला. या परिस्थितीचा फायदा वायव्येकडून आलेल्या तुर्की आक्रमकांनी घेतला. इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या आरंभीस त्यांनी दिल्ली येथे आपले सत्ताकेंद्र निर्माण केले.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) गोपालने बंगालमध्ये ..........सत्तेची स्थापना केली.

(आ) राष्ट्रकूट घराण्यातील ..............हा पहिला पराक्रमी राजा होय.

(इ) विजयालय हा .......... सत्तेचा संस्थापक होय.

(ई) माळव्यातील ................ ही परमारांची राजधानी होती.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) धर्मपालाला कोणत्या सत्तांशी संघर्ष करावा लागला?

(आ) राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण याने आपल्या राज्यात कोणता प्रदेश समाविष्ट केला?

(इ) भोज राजा कोणत्या गुणांसाठी प्रसिद्ध होता?

(ई) पृथ्वीराजाने तराईंच्या लढाईत कोणाचा पराभव केला?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पहिल्या राजराजाने चोळांचे सामर्थ्यवान राज्य कसे निर्माण केले?

(आ) दुसरा सिंघण याने कोणत्या प्रदेशांवर वर्चस्व निर्माण केले?

४. **कारणे लिहा.**

(अ) चोळ राजा पहिला राजेंद्र याने 'गंगैकोंड' असे बिरुद घेतले.

(आ) इसवी सनाच्या तेराव्या शतकात तुर्कांनी दिल्ली येथे आपले सत्ताकेंद्र निर्माण केले.

**उपक्रम**

भारताच्या नकाशात पाल, राष्ट्रकूट, चोळ, राजपूत, यादव या सत्तांची ठिकाणे दाखवा.

# ३. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन

इसवी सनाचे आठवे ते तेरावे शतक या काळात भारतात झालेल्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घडामोडींची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

**परराष्ट्र व्यापार :** इसवी सनाच्या आठव्या व नवव्या शतकांमध्ये भारताचा बाहेरील देशाबरोबरचा व्यापार मंदावला होता. दहाव्या शतकानंतर मात्र परराष्ट्र व्यापारास पुन्हा चालना मिळाली.

अरब साम्राज्याच्या स्थापनेनंतर अरबांचे भारताबरोबरील व्यापारी संबंध वाढले. अरब व्यापाऱ्यांकडून भारतातील कापड, सुगंधी द्रव्ये व मसाल्याचे पदार्थ यांना मोठी मागणी होती. अरब लोक भारतात येताना खजूर व घोडे बरोबर आणत असत. भारतातून ते लिंबू, नारळ, आंबा इत्यादी पदार्थ अरबस्तानात घेऊन जात.

याच काळात भारताचे चीन व आग्नेय आशियातील देशांबरोबर व्यापारी संबंध वाढीस लागले. चीनमध्ये मसाल्याच्या पदार्थांना तसेच हस्तिदंत, काचेचे सामान, औषधी द्रव्ये, लाख इत्यादी पदार्थांना मोठी मागणी होती. गुजरातमधील भरूच हे महत्त्वाचे बंदर होते. केरळमधील मलबारमधून शिसम लाकूड चीनला पाठवले जाई. बंगालमधील ताम्रलिप्ती बंदरातून जावा, सुमात्रा इत्यादी बेटांकडे भारतातून व्यापारी जहाजे जात. बंगालमधील पाल राजांनी व दक्षिण भारतातील चोळांनी या व्यापारास उत्तेजन दिले. चोळ राजा पहिला राजेंद्र याने आपला प्रतिनिधी चीनला पाठवला. व्यापाराच्या निमित्ताने अनेक भारतीय आग्नेय आशियातील देशांमध्ये गेले. व्यापाऱ्यांपाठोपाठ धर्मोपदेशकही तेथे गेले. तेथे त्यांनी हिंदू व बौद्ध विचारांचा प्रसार केला. जावा बेटांमधील बोरोबुदूरचा

बौद्ध स्तूप, तर कंबोडियातील अंकोरवट मंदिर ही या प्रभावाची उदाहरणे आहेत.

**नगरांचा विकास :** नव्याने उदयाला आलेल्या राजसत्तांमुळे तसेच व्यापारवाढीमुळे या काळात नगरांचा विकास झाला. मालखेड, उज्जैन, तंजावर, अजमेर इत्यादी नगरे भरभराटीस आली. राजांचे मंत्री, पदाधिकारी, सरदार, व्यापारी आणि सेवाचाकरी करणारे लोक नगरात राहत.

**व्यवसाय व उद्योग :** खेड्यांतील लोकांचा शेती हा महत्त्वाचा व्यवसाय होता. पावसाच्या पाण्यावर आणि नद्या, तळी यांना काढलेल्या पाटाच्या पाण्यावर शेती केली जात असे. तांदूळ, बाजरी, गहू, तेलबिया, ऊस, द्विदल धान्ये, कापूस ही पिके घेतली जात. फणस, आंबे, द्राक्षे, अंजीर, कवठ इत्यादी प्रकारच्या फळांचे उत्पादन घेतले जात असे.

शेतीव्यवसायाबरोबर इतर व्यवसायांना लोकजीवनात महत्त्व होते. लोखंड, तांबे, सोने, चांदी वगैरे धातूंवर आधारित धातू उद्योग होते. कोल्हापूर, यवतमाळ इत्यादी ठिकाणी गूळ उद्योग महत्त्वाचा होता. महाराष्ट्रातील पैठण हे पैठणीसाठी व आंध्रप्रदेशातील वरंगळ तलम कापडासाठी प्रसिद्ध होते.

स्थानिक पातळीवरील व्यापार वस्तुविनिमयाद्वारे होत असे. दूरच्या व्यापारासाठी सोने, चांदी व तांबे या धातूंच्या नाण्यांचा चलन म्हणून उपयोग केला जाई. यादव काळात 'पद्मटंक' हे सुवर्णनाणे होते.

**सामाजिक स्थिती :** भारतीय समाज जाती-उपजातींमध्ये विभागला होता. जाती जातींमधील संबंध हे रूढी, परंपरांनी निश्चित केले होते. जातीबाहेरील विवाहास बंदी होती. व्यवसाय हे जातीनिहाय होत गेले. जातिव्यवस्थेमुळे समाजातील विषमतेची दरी रुंदावत गेली. समाजव्यवस्था

ही पितृप्रधान होती. स्त्रियांचे स्थान दुय्यम होते, परंतु कुटुंबातील त्यांची भूमिका महत्त्वाची होती.

**शिक्षण** : समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार मर्यादितच राहिला. व्यक्तीला व्यवसायाची माहिती कुटुंबामध्ये मिळत असे. या काळात नालंदा आणि विक्रमशीला या विद्यापीठांची ख्याती सर्वत्र पसरली होती. येथे नेपाळ, तिबेट, चीन, म्यानमार, कंबोडिया, श्रीलंका, इंडोनेशिया इत्यादी देशांमधून विद्यार्थी येत असत.

**मंदिर स्थापत्य** : या काळात मंदिर स्थापत्यकला विकसित झाली. भारताच्या विविध भागांत अनेक मंदिरे बांधली गेली. भव्यता, नाजूक व रेखीव शिल्पकाम, कोरीवकाम, उंच शिखरे, गोपुरे व विस्तृत आवार ही या काळातील मंदिर स्थापत्याची वैशिष्ट्ये होत.



लिंगराज मंदिर - भुवनेश्वर

महाराष्ट्रात वेरूळ येथे खोदली गेलेली लेणी जगप्रसिद्ध आहेत. त्यांपैकी कैलास मंदिर हा कोरीवकामाचा अप्रतिम नमुना आहे. दक्षिण भारतात तंजावर येथील बृहदीश्वराचे मंदिर प्रसिद्ध आहे. भुवनेश्वर येथील लिंगराज मंदिर, पुरीचे जगन्नाथ मंदिर, कोणार्कचे सूर्यमंदिर आणि



कोणार्कचे सूर्यमंदिर

मध्यप्रदेशातील खजुराहो येथील कंडारीय महादेव मंदिर ही मंदिरे विशेष प्रसिद्ध आहेत. राजस्थानमधील अबूच्या पहाडातील दिलवाडा येथील जैन मंदिरे संगमरवरावरील कोरीवकामासाठी प्रसिद्ध आहेत. कर्नाटकमधील बेलूर येथील चेन्नकेशव, तर हळेबीड येथील होयसळेश्वर या मंदिरातील कोरीवकाम अप्रतिम आहे.

समाजजीवनात प्रार्थनास्थळांना विशेष महत्त्व होते. या ठिकाणी



कंडारीय महादेव मंदिर - खजुराहो

उत्सव प्रसंगी जत्रा भरत. मंदिरांच्या आवारात गायन, वादन, नृत्य, मूर्तिकला, स्थापत्य इत्यादी कला शिकवल्या जात. मंदिरांमुळे या कलांचा विकास झाला. काशी, नाशिक, पैठण यांसारखी काही नगरे परंपरेने तीर्थक्षेत्रे म्हणून प्रसिद्ध होती. कांचीपुरम, मदुराई, तिरुपती इत्यादी नगरेही तीर्थक्षेत्रे म्हणून प्रसिद्धीस आली.

**लघुचित्रे :** लघुचित्रे म्हणजे लहान आकाराची चित्रे. हस्तलिखित ग्रंथ सुशोभित करण्यासाठी त्यामध्ये लघुचित्रे काढण्यात येऊ लागली. बंगालमधील पाल राजांनी लघुचित्रे काढण्याच्या शैलीस प्रोत्साहन दिले.

बौद्ध व जैन साहित्यात लघुचित्रे असलेले ग्रंथ आजही उपलब्ध आहेत.

**साहित्य :** या काळात संस्कृत, तमीळ, तेलुगु, कन्नड इत्यादी प्रादेशिक भाषांमध्ये विविध विषयांवर साहित्यनिर्मिती झाली.

जयदेवाने 'गीतगोविंद' हे काव्य लिहिले. या काव्यात कृष्णभक्तीचा महिमा सांगितला आहे. कल्हणाने 'राजतरंगिणी' ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने प्राचीन काळापासून ते इसवी सनाच्या बाराव्या शतकापर्यंतचा काश्मीरचा इतिहास सांगितला आहे. इसवी सनाच्या बाराव्या शतकात भास्कराचार्य हा सर्वश्रेष्ठ गणिती होऊन गेला. त्याने 'सिद्धान्तशिरोमणी' हा ग्रंथ लिहिला. पंप याने कन्नड भाषेमध्ये 'आदिपुराण', 'पंपभारत' ही महाकाव्ये लिहिली. कवी कंबन याने तमीळ भाषेमध्ये रामायण लिहिले. मुकुंदराजाने 'विवेकसिंधू' या नावाचा मराठी भाषेमधील ओवीबद्ध ग्रंथ लिहिला. मुकुंदराजास मराठी भाषेचा आद्य कवी मानले जाते.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) केरळमधील मलबारमधून .......... लाकूड चीनला पाठवले जाई.
(साग, शिसम, देवदार)

(आ) पहिला राजेंद्र याने आपला प्रतिनिधी ............. पाठवला.
(चीनला, कंबोडियाला, इंडोनेशियाला)

(इ) यादव काळात .......... हे सुवर्णनाणे होते.
(होन, शिवराई, पद्मटंक)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) गीतगोविंद | (१) मुकुंदराज |

| | | | |
|---|---|---|---|
| (आ) | राजतरंगिणी | (२) | कंबन |
| (इ) | सिद्धान्तशिरोमणी | (३) | कल्हण |
| (ई) | विवेकसिंधू | (४) | भास्कराचार्य |
| | | (५) | जयदेव |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अरब व्यापाऱ्यांकडून भारतातील कोणत्या वस्तूंना मागणी होती?

(आ) व्यापारासाठी चलन म्हणून कोणत्या धातूंच्या नाण्यांचा उपयोग केला जाई?

(इ) मंदिरांच्या आवारात कोणकोणत्या कला शिकवल्या जात?

**४. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शेतकरी कोणत्या पिकांचे व फळांचे उत्पादन घेत असत?

(आ) मंदिर स्थापत्याची कोणती वैशिष्ट्ये होती?

**उपक्रम**

तुमच्या परिसरातील एखाद्या प्राचीन वास्तूला भेट द्या. खालील मुद्द्यांच्या आधारे त्या वास्तूची माहिती मिळवा.

- वास्तू कोणत्या काळातील आहे.
- कोणी बांधली आहे.
- वास्तूवरील कोरीवकाम, नक्षीकाम.



यादवकालीन नाणे - पद्मटंक

# ४. दिल्लीची सुलतानशाही

इसवी सनाच्या अकराव्या शतकात भारतावर तुर्कांची आक्रमणे होऊ लागली. ते आपल्या सत्तेचा विस्तार करत भारताच्या वायव्य सरहद्दीपर्यंत आले. गझनीचा सुलतान महमूद याने भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यांत त्याने मथुरा, वृंदावन, कनोज, सोमनाथ येथील संपन्न मंदिरे लुटून तेथील प्रचंड संपत्ती आपल्याबरोबर नेली.

इसवी सनाच्या बाराव्या शतकामध्ये अफगाणिस्तानातील घूर येथील सुलतान मुहम्मद घोरी याने भारतावर आक्रमण केले. भारतातील जिंकून घेतलेल्या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठी त्याने कुतुबुद्दीन ऐबक याची नेमणूक केली. पुढे मुहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर ऐबकाने आपल्या प्रभुत्वाखाली भारतातील प्रदेशाचा कारभार स्वतंत्रपणे पाहण्यास सुरुवात केली. राजपुतांकडून व तुर्की सरदारांकडून त्यास विरोध झाला. त्याने या विरोधास तोंड देत आपली सत्ता स्थिर करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या काळात दिल्ली येथे कुतुबमिनारच्या कामास सुरुवात झाली. इ.स.१२१० मध्ये त्याचा मृत्यू झाला.



कुतुबमिनार - दिल्ली

**अल्तमश :** कुतुबुद्दीन ऐबकाच्या मृत्यूच्या वेळी अल्तमश हा बदाऊन या प्रांताचा कारभार पाहत होता. दिल्लीतील उमरावांनी त्याची आपला प्रमुख म्हणून निवड केली. त्याला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. त्याने राजपुतांचे, तसेच गंगा आणि यमुना या नद्यांच्या प्रदेशातील व बंगालमधील उठाव मोडून काढले. आपली सत्ता स्थिर केली. बगदादच्या खलिफाने अल्तमशच्या या कार्याचे महत्त्व लक्षात घेतले. सुलतान म्हणून त्याला मान्यता दिली. सुलतान म्हणजे राज्याचा प्रमुख. अल्तमश हा



अल्तमशचे चांदीचे नाणे - टंका

दिल्लीचा पहिला सुलतान म्हणून ओळखला जातो. त्याने टंका हे चांदीचे नाणे पाडले.

**रझिया :** अल्तमशने आपली मुलगी रझियाला वारस म्हणून नेमले होते. त्याने रझियाला उत्तम प्रकारचे शिक्षण दिले होते. अल्तमशच्या काळात तिला राज्यकारभाराचा अनुभव मिळाला होता. ती कर्तबगार, पराक्रमी व प्रजाहितदक्ष होती. सैन्याच्या मोहिमांचे नेतृत्व स्वत: करत असे. एखाद्या स्त्रीने सुलतानपदी येणे ही गोष्ट त्या काळात समाजाला मान्य होण्यासारखी नव्हती. त्यामुळे तिला दरबारातील अनेक सरदारांचा विरोध झाला. सरदारांवर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नात तिला यश आले नाही. इ.स. १२४० मध्ये तिला ठार मारले गेले. दिल्लीच्या सुलतानपदी

बसणारी रझिया ही पहिली व एकमेव स्त्री होय.

**बल्बन :** रझियानंतर दिल्लीच्या गादीवर आलेला महत्त्वाचा सुलतान म्हणजे बल्बन हा होय. त्याने सिंध, बंगाल, अयोध्या प्रांतांतील बंडखोर सरदारांचे पारिपत्य केले. मंगोल आक्रमकांचा बंदोबस्त करून त्याने भारताची वायव्य सरहद्द सुरक्षित केली. दिल्लीची सुलतानशाही दृढ केली. इ.स. १२८६ मध्ये बल्बनचा मृत्यू झाला. अमीर खुसरौ हा प्रसिद्ध तत्त्वज्ञ आणि कवी त्याच्या दरबारी होता.

**अल्लाउद्दीन खल्जी :** अल्लाउद्दीन खल्जी इ.स. १२९६ मध्ये दिल्लीचा सुलतान झाला. आपल्या राज्याचे रूपांतर विशाल साम्राज्यात करावे, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. मंगोल आक्रमकांपासून त्याने आपले राज्य सुरक्षित केले. गुजरात आणि माळवा हे प्रदेश आपल्या प्रभुत्वाखाली आणले.

राजस्थानातील रणथंबोर, चितोड हे किल्ले जिंकून घेतले. राजस्थानातील बहुतेक राजांनी अल्लाउद्दीन खल्जीचे प्रभुत्व मान्य केले. अल्लाउद्दीनने दक्षिणेमधील सत्तांचा पराभव करून त्यांना आपले प्रभुत्व मान्य करण्यास भाग पाडले. अशा रीतीने अल्लाउद्दीन खल्जीने दक्षिणेमध्ये आपल्या सत्तेचा विस्तार केला.

अल्लाउद्दीन खल्जीची प्रशासनावर घट्ट पकड होती. त्याने महसूलव्यवस्थेत सुधारणा केली. प्रत्यक्ष लागवडीखाली असलेल्या जमिनीची मोजणी करून महसूल ठरवण्यात आला. आपल्या सैन्याला जीवनावश्यक वस्तू योग्य दरात मिळाव्या, म्हणून वस्तूंच्या किमती ठरवून दिल्या. वजने व मापे यांवर कडक नियंत्रण घातले. इ.स. १३१६ मध्ये अल्लाउद्दीनचा मृत्यू झाला.

**मुहम्मद तुघलक** : इ.स. १३२५ मध्ये मुहम्मद तुघलक हा सुलतानपदी आला. तुघलकाच्या साम्राज्यात उत्तरेस पेशावरपासून दक्षिणेस मदुरैपर्यंत आणि पश्चिमेस सिंधपासून पूर्वेस आसामपर्यंतचा प्रदेश होता.




Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. The territorial waters of India extended into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. The responsibility rest with the publisher. © Government of India Copyright- 2008

मुहम्मदाने आपल्या या विस्तृत पसरलेल्या साम्राज्याच्या कारभारात सुधारणा करण्याचे प्रयत्न केले.

राजधानीचे ठिकाण मध्यवर्ती असावे, ते मंगोल आक्रमणांपासून सुरक्षित असावे, या हेतूने मुहम्मदाने आपली राजधानी दिल्लीहून देवगिरीला नेली. देवगिरीचे नाव दौलताबाद असे ठेवले. हे स्थलांतर करताना दरबारी लोक, उमराव आणि प्रजा यांची अत्यंत गैरसोय झाली. त्यांच्यामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली, तेव्हा राजधानीचे स्थलांतर करण्याचा निर्णय त्याने रद्द केला.

मुहम्मदाने चलनव्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याने तांब्याची नवीन नाणी पाडली. प्रचारात असलेल्या सोन्या-चांदीच्या नाण्यांऐवजी तांब्याची नाणी उपयोगात आणण्याचा हुकूम दिला, पण तांब्याची नाणी पाडण्यावर नियंत्रण ठेवले गेले नाही. व्यवहार करताना त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली, तेव्हा मुहम्मदाने तांब्याची नाणी परत घेऊन त्याऐवजी सोन्या-चांदीची नाणी देण्याचे आदेश दिले. परिणामी सरकारी तिजोरीवर प्रचंड ताण पडला. त्यास हा उपक्रम मागे घ्यावा लागला.

मुहम्मदाने कृषी विभाग सुरू केला. या विभागाकडे काही जमीन दिली. पडीक जमिनीतून पीक घेण्यास सांगितले. आळीपाळीने पीक घेतल्यास पीक उत्पादनात वाढ होते का हेही पाहण्यास सांगितले. या उपक्रमाची नीट अंमलबजावणी झाली नाही. अधिकाऱ्यांनी निधीचा मोठ्या प्रमाणावर अपहार केला. त्यामुळे त्याचा हाही उपक्रम अयशस्वी झाला.

मुहम्मद तुघलक हा कल्पक होता, तथापि कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठीचे व्यावहारिक कौशल्य त्याच्याजवळ नव्हते. त्यामुळे त्याच्या चांगल्या कल्पनाही अयशस्वी झाल्या.

मुहम्मद तुघलकाच्या अखेरच्या काळात सर्वत्र अशांतता व बंडाळी निर्माण झाली. त्याच्या हयातीतच सुलतानशाहीच्या विघटनास सुरुवात झाली. इ.स. १३५१ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

**फिरोज तुघलक :** मुहम्मद तुघलकानंतर फिरोज तुघलक दिल्लीचा सुलतान झाला. त्याने लोककल्याणाची काही कामे केली. मुहम्मद तुघलकाने शेतकऱ्यांना दिलेली कर्जे त्याने माफ केली. सतलज व यमुना या नद्यांवर कालवे काढले. अधिक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. लोकांना जाचक असलेले कर त्याने रद्द केले. फिरोजपूर, जौनपूर, हिस्सार, फिरोजाबाद इत्यादी नवीन नगरे त्याने वसवली. याच्याच कारकिर्दीत कुतुबमिनारचे काम पूर्ण झाले.

नासिरुद्दीन महमूद हा तुघलक घराण्यातील शेवटचा सुलतान. त्याच्या कारकिर्दीत इ.स. १३९८ मध्ये मंगोल सत्ताधीश तिमूरलंग याने भारतावर स्वारी केली. दिल्ली आणि आसपासच्या प्रदेशातून प्रचंड लूट घेऊन तो मायदेशी परतला. यानंतर अल्पावधीतच तुघलकांची सत्ता संपुष्टात आली.

तुघलकानंतर दिल्लीवर काही काळ सय्यद घराण्याचा अंमल राहिला. त्यानंतर दिल्ली येथे लोदी घराण्याची सत्ता स्थापन झाली. इब्राहीम लोदी हा शेवटचा सुलतान होय. त्याच्या स्वभावदोषामुळे त्याला अनेक शत्रू निर्माण झाले. अफगाण सरदारही त्याचे विरोधक बनले. पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी याने काबूल येथील सत्ताधीश बाबर यास इब्राहीम लोदीविरुद्ध पाचारण केले. इ.स. १५२६ मध्ये बाबराने इब्राहीम लोदीचा पराभव केला आणि त्याचबरोबर सुलतानशाहीचा शेवट झाला.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) कुतुबमिनारच्या कामास .......... याच्या काळात सुरुवात झाली.
(अल्तमश, मुहम्मद तुघलक, कुतुबुद्दीन ऐबक)

(आ) अल्तमशने .......... हे चांदीचे नाणे पाडले.
(होन, रुपया, टंका)

(इ) दिल्लीच्या सुलतानपदी बसणारी ......... ही पहिली व एकमेव स्त्री होय.
(रझिया, चांदबिबी, नूरजहान)

(ई) मुहम्मद तुघलकाने ............. नाव दौलताबाद असे ठेवले.
(रणथंबोरचे, देवगिरीचे, कनोजचे)

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अल्लाउद्दीन खल्जीने वस्तूंच्या किमती का ठरवून दिल्या?

(आ) मुहम्मद तुघलकाने आपली राजधानी दिल्लीहून देवगिरीला का नेली?

(इ) फिरोज तुघलकाने कोणती नवीन नगरे वसवली?

३. **तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अल्लाउद्दीन खल्जीने कोणत्या सुधारणा केल्या?

(आ) मुहम्मद तुघलकाला तांब्याची नवीन नाणी पाडण्याचा उपक्रम मागे का घ्यावा लागला?

(इ) फिरोज तुघलकाने लोककल्याणाची कोणती कामे केली?

४. **कारणे लिहा.**

(अ) बगदादच्या खलिफाने अल्तमशला सुलतान म्हणून मान्यता दिली.

(आ) मुहम्मद तुघलकाने सुरू केलेला कृषी विभागाचा उपक्रम अयशस्वी झाला.

# ५. विजयनगर व बहमनी राज्ये

दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघलक याच्या कारकिर्दीत तुघलक साम्राज्याच्या विघटनास सुरुवात झाली. दिल्लीच्या मध्यवर्ती सत्तेविरुद्ध दक्षिणेमध्ये उठाव झाले. त्यातूनच विजयनगर व बहमनी ही दोन प्रबळ राज्ये उदयास आली.

## विजयनगरचे राज्य

**स्थापना :** हरिहर व बुक्क हे दोघे भाऊ दिल्लीच्या सुलतानशाहीच्या सेवेत सरदार म्हणून होते. मुहम्मद तुघलकाच्या काळात दक्षिणेत राजकीय अस्थिरता निर्माण झाली. हरिहर व बुक्क यांनी या परिस्थितीचा फायदा घेऊन इ.स. १३३६ मध्ये दक्षिणेत विजयनगरचे राज्य स्थापन केले. 'हंपी' ही या राज्याची राजधानी होती. हरिहर हा विजयनगरचा पहिला राजा होय.

**राज्यविस्तार :** हरिहराने आपल्या कारकिर्दीत तुंगभद्रा नदीच्या परिसरातील प्रदेश, कोकणातील काही भाग आणि केरळमधील मलबारच्या किनारपट्टीचा प्रदेश जिंकून घेतला. बहमनी सत्तेशी त्यास संघर्ष करावा लागला.

हरिहरानंतर त्याचा भाऊ बुक्क सत्तेवर आला. बुक्काने रामेश्वरपर्यंतचा प्रदेश आपल्या आधिपत्याखाली आणला. मलबार आणि श्रीलंकेच्या राजांनी त्याचे प्रभुत्व मान्य केले.

बुक्कानंतर दुसरा हरिहर सत्तेवर आला. त्याचा सेनापती गुंड याने कारवार, म्हैसूर, तिरुचिरापल्ली व कांची इत्यादी प्रदेश जिंकून घेतले. विजयनगर व बहमनी या राज्यांमध्ये सतत संघर्ष होत राहिला.

विजयनगरचा राजा पहिला देवराय याने बहमनी सत्तेबरोबर संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यामध्ये त्याला यश आले नाही.

**कृष्णदेवराय** : इ.स.१५०९ मध्ये कृष्णदेवराय हा विजयनगरच्या गादीवर आला. विजयनगर राज्याच्या इतिहासातील हा सर्वांत कर्तबगार राजा होय. कृष्णदेवरायाने उडीसाचा राजा गजपती प्रतापरुद्र याचा पराभव केला. त्याच्याकडून विजयवाडा, राजमहेंद्री हे प्रदेश जिंकून आपल्या राज्यास जोडले. कृष्णदेवरायाने बहमनी सुलतान महमूदशाह याच्या नेतृत्वाखाली एकत्रित आलेल्या सुलतानांच्या सैन्याच्या संघाचा पराभव केला. त्याच्या कारकिर्दीत विजयनगरचे राज्य पूर्वेस कटकपासून पश्चिमेस गोव्यापर्यंत व उत्तरेस रायचूर दोआबापासून दक्षिणेस हिंदी महासागरापर्यंत पसरलेले होते. त्याने पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगिजांशी सलोख्याचे संबंध ठेवले. इ.स. १५३० मध्ये कृष्णदेवरायाचा मृत्यू झाला.



कृष्णदेवराय

कृष्णदेवराय महान सेनानी होता. प्रत्येक लढाईच्या अखेरीस तो युद्‌धक्षेत्राची पाहणी करत असे. जखमी झालेल्या सैनिकांना योग्य त्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तो स्वत: लक्ष घालत असे. कृष्णदेवरायाच्या या सैनिकांबद्‌दलच्या जिव्हाळ्यामुळे त्यास सैनिकांची निष्ठा लाभली.

कृष्णदेवराय हा स्वत: विद्वान होता. त्याने तेलुगु भाषेमध्ये 'आमुक्तमाल्यदा' हा राजनीतीविषयक ग्रंथ लिहिला. त्याला संगीताची जाण होती. त्याने शिल्पकलेला प्रोत्साहन दिले. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत विजयनगरमधील हजार राम मंदिर आणि विठ्ठल मंदिराचे बांधकाम झाले. या मंदिरावरील शिल्पकाम अप्रतिम आहे. विठ्ठल मंदिरातील मंडप वैशिष्ट्यपूर्ण आहे. दौडत जाणाऱ्या घोडेस्वारांची शिल्पे या मंदिराच्या स्तंभांवर कोरलेली आहेत. कृष्णदेवरायाचे वर्णन 'महान न्यायी राज्यकर्ता' असे केले जाते.




Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. The territorial waters of India extended into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. The responsibility rest with the publisher. © Government of India Copyright- 2008

**शेतीविषयक धोरण :** कृष्णदेवरायाने शेतीकडे विशेष लक्ष दिले. शेती त्याचा जिव्हाळ्याचा विषय होता. तो असे म्हणत असे, की प्रदेश लहान असला तरी तलाव, कालव्यांसारख्या जलसिंचनाच्या सुविधा असाव्या. त्यासाठी त्याने अनंतसागरम, कुरवाई, व्यासराय समुद्र इत्यादी ठिकाणी तलाव बांधले. कर्नाटकातील कोरगाल येथे मोठे धरण बांधून त्यास कालवा काढला.

कृष्णदेवरायाने जंगलांचे महत्त्व ओळखले होते. जंगले चांगली राखावी, ती आपल्या राज्याच्या सरहद्दीपर्यंत वाढवावी, असा त्याचा कटाक्ष होता.

कृष्णदेवरायानंतर विजयनगरच्या राज्यास उतरती कळा लागली. आजच्या कर्नाटक राज्यातील तालिकोट येथे आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही व बरीदशाही आणि विजयनगर यांच्यात इ.स. १५६५ मध्ये लढाई झाली. या लढाईत विजयनगरच्या रामरायाचा पराभव झाला. यानंतर विजयनगरचे महत्त्व लोप पावले.

## बहमनी राज्य

**स्थापना :** मुहम्मद तुघलकाचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी दक्षिणेमध्ये सरदारांनी बंड केले. त्यांनी दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. या सरदारांचा प्रमुख हसन गंगू याने दिल्लीच्या सुलतानाच्या सैन्याचा पराभव केला. इ.स. १३४७ मध्ये नवीन राज्य अस्तित्वात आले. यास बहमनी राज्य असे म्हणतात. हसन गंगू हा बहमनी राज्याचा पहिला सुलतान झाला. त्याने 'अल्लाउद्दीन बहमनशाह' असा किताब धारण केला.

**राज्यविस्तार :** अल्लाउद्दीन बहमनशाह याने कर्नाटक राज्यातील

'गुलबर्गा' येथे आपली राजधानी स्थापन केली. त्याने बिदर, मालखेड, गोवा, कोल्हापूर, तेलंगण आणि दाभोळ हे प्रदेश जिंकून घेतले. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा पहिला मुहम्मदशाह सत्तेवर आला. त्याने विजयनगर व वरंगळविरुद्ध संघर्ष चालूच ठेवला. पुढे सुलतानपदी आलेल्या अहमदशाहाच्या कारकिर्दीत बिदर ही राजधानी झाली.

**महमूद गावान :** तिसऱ्या मुहम्मदशाहाच्या काळात महमूद गावान हा मुख्य वजीर होता. तो उत्तम प्रशासक होता. त्याने बहमनी राज्यास अधिक सामर्थ्य प्राप्त करून दिले. गावानने सैनिकांना जहागिरी देण्याऐवजी रोख पगार देण्यास सुरुवात केली. सैन्यामध्ये शिस्त आणली.

महमूद गावानने जमीन महसूल व्यवस्थेतही सुधारणा केली. जमिनीची मोजणी करून महसुलाचा दर निश्चित केला. परिणामी बहमनी राज्याच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाली.

महमूद गावान हा विद्याप्रेमी होता. गणित व वैद्यक विषयांत त्यास गती होती. त्याने पाठवलेल्या पत्रांचा संग्रह 'रियाज़-उल-इन्शा' या नावाने प्रसिद्ध आहे. त्याचा स्वत:चा व्यक्तिगत ग्रंथसंग्रह होता. त्याने बिदरला अरबी व फार्सी विद्यांच्या अभ्यासासाठी मदरसा स्थापन केली. बहमनी राज्याच्या जडणघडणीत त्याचा मोठा वाटा होता.

महमूद गावाननंतर बहमनी सरदारांमध्ये गटबाजी वाढीस लागली. परिणामी बहमनी सत्ता दुर्बल झाली. विजयनगर व बहमनी यांच्यामधील संघर्षाचा बहमनी राज्यावर प्रतिकूल परिणाम झाला. प्रांतातील अधिकारी अधिक स्वतंत्र वृत्तीने वागू लागले. बहमनी राज्याचे विघटन झाले. त्यातून वऱ्हाडची इमादशाही, बिदरची बरीदशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी बहमनी राज्याची पाच शकले झाली.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) विजयनगरचा पहिला राजा .......... हा होय.
(बुक्क, हरिहर, कृष्णदेवराय)

(आ) कृष्णदेवरायाने 'आमुक्तमाल्यदा' हा ग्रंथ ..........भाषेत लिहिला.
(हिंदी, तमीळ, तेलुगु)

(इ) बहमनशाहाने कर्नाटक राज्यातील .......... येथे आपली राजधानी स्थापन केली.
(बिदर, गुलबर्गा, कोरगाल)

२. **'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) कृष्णदेवराय | (१) मुख्य वजीर |
| (आ) हसन गंगू | (२) महान सेनानी |
| (इ) महमूद गावान | (३) बहमनी राज्याचा पहिला सुलतान |
| | (४) विजयनगरचा पहिला राजा |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत कोणत्या मंदिरांचे बांधकाम झाले?
(आ) कृष्णदेवरायाचा जंगलाच्या बाबतीत कोणता कटाक्ष होता?
(इ) बहमनी सत्ता दुर्बल का झाली?

४. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कृष्णदेवरायाला सैनिकांची निष्ठा का लाभली?
(आ) महमूद गावानने कोणत्या सुधारणा केल्या?

# ६. धार्मिक समन्वय

मध्ययुगीन भारतातील समाजजीवनामध्ये भक्तिपरंपरेचे एक वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व आहे. भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांमध्ये ही परंपरा निर्माण झाली. यासंबंधीची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

**भक्ती चळवळ :** दक्षिण भारतामध्ये नायनार आणि अळवार या भक्ती चळवळी उदयास आल्या. नायनार हे शिवभक्त होते. अळवार हे विष्णुभक्त होते. या भक्ती चळवळीमध्ये समाजातील सर्व स्तरांमधील लोक सहभागी झालेले होते. ईश्वरप्रेम, माणुसकी, भूतदया, करुणा इत्यादी मूल्यांसंबंधीची शिकवण त्यांनी दिली. दक्षिण भारतात रामानुज आणि इतर आचार्यांनी भक्ती चळवळीचा पाया भक्कम केला. ईश्वर सर्वांसाठी आहे, ईश्वर भेदभाव करत नाही, असे त्यांनी सांगितले. उत्तर भारतातही रामानुजांच्या शिकवणुकीचा मोठा प्रभाव पडला.



संत कबीर

उत्तर भारतात भक्ती चळवळीचे महत्त्व संत रामानंद यांनी सांगितले. त्यांचे शिष्य संत कबीर हे होत. त्यांनी तीर्थक्षेत्रे, व्रते, मूर्तिपूजा यांना महत्त्व दिले नाही. संत कबीरांनी सत्यालाच ईश्वर मानले. सर्व मानव एक आहेत. राम आणि रहीम वेगळे नाहीत अशी शिकवण त्यांनी दिली. त्यांनी जातिभेद, पंथभेद, धर्मभेद मानले नाहीत. कबीरांना हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य साधायचे होते.

बंगालमध्ये चैतन्य महाप्रभू यांनी कृष्णभक्तीचे महत्त्व सांगितले. त्यांनी भारतभर भ्रमण केले. हरिनाम संकीर्तनाचा उपदेश केला. त्यांच्या उपदेशामुळे लोक जाती, पंथांची बंधने ओलांडून भक्ती चळवळीत सहभागी झाले. चैतन्य महाप्रभूंच्या प्रभावाने शंकरदेव यांनी आसाममध्ये कृष्णभक्तीचा प्रसार केला. गुजरातमधील संत नरसी मेहता हे प्रसिद्ध वैष्णव संत होऊन गेले. ते निस्सीम कृष्णभक्त होते. त्यांनी समतेचा संदेश दिला. त्यांनी भक्तिपर विपुल काव्यरचना केलेल्या आहेत. त्यांना गुजराती भाषेचे आद्य कवी मानतात.

संत मीराबाईंनी कृष्णभक्तीचा महिमा सांगितला. त्या मेवाडच्या राजघराण्यातील होत्या. राजघराण्यातील सुखांचा त्याग करून कृष्णभक्तीत त्या तल्लीन झाल्या. राजस्थानी व गुजराती भाषेमध्ये त्यांनी भक्तिरचना केल्या. त्यांची भक्तिगीते भक्ती, सहिष्णुता व मानवतेचा संदेश देणारी आहेत. आजही त्यांच्या रचना लोकप्रिय आहेत. हिंदी साहित्यातील महाकवी सूरदास यांनी 'सूरसागर' हे काव्य लिहिले. कृष्णभक्ती हा त्या काव्याचा विषय आहे. संत तुलसीदासांच्या 'रामचरितमानस' या ग्रंथात रामभक्तीचा सुंदर आविष्कार झालेला आढळतो. पंडितांच्या कर्मठपणावर त्यांनी टीका केली.



श्री बसवेश्वर

कर्नाटकात बसवेश्वरांनी वीरशैव पंथ संघटित केला. जातिभेदाविरुद्ध भूमिका घेतली. श्रमाच्या प्रतिष्ठेचे महत्त्व सांगितले. आपल्या चळवळीमध्ये स्त्रियांनाही सहभागी करून घेतले.

आपली शिकवण लोकभाषेमध्ये म्हणजे कन्नड भाषेमध्ये दिली. साधे आणि निर्मळ जीवन जगावे, असा त्यांचा संदेश होता. त्यांच्या कार्याचा समाजावर मोठा परिणाम झाला. कर्नाटकमध्ये पुरंदरदास हे एक थोर संत होऊन गेले. त्यांनी कन्नड भाषेत अनेक भक्तिकवने रचली. आजही ती लोकप्रिय आहेत. महाराष्ट्रातील भक्तिपरंपरेसंबंधीची माहिती आपण पुढे घेणार आहोत.

**गुरुनानक :** गुरुनानक यांनी विविध तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. ते मक्केलाही गेले होते. भक्तिभावना सगळीकडे सारखीच आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. सर्वांशी सारखेपणाने वागावे, अशी त्यांची शिकवण होती. हिंदू आणि मुस्लिम यांचे ऐक्य साधावे, यासाठी त्यांनी उपदेश केला. शुद्ध आचरणावर भर दिला. 'परमेश्वर एकच आहे. शुद्ध आचरणानेच त्याची प्राप्ती होते,' असे त्यांनी सांगितले. स्त्रियांना त्यांनी आदराचे स्थान दिले.

गुरुनानकांच्या उपदेशाने अनेक लोक प्रभावित झाले. त्यांच्या शिष्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. त्यांनी आपल्या शिष्यांना जो उपदेश केला तो एका ग्रंथात संग्रहीत केलेला आहे. त्याला 'आदिग्रंथ' असे म्हणतात. गुरुनानकांच्या अनुयायांना शिष्य म्हणजे 'शीख' असे म्हणतात. 'आदिग्रंथ' म्हणजेच 'ग्रंथसाहिब' हा शिखांचा पवित्र ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये संत नामदेव,



गुरुनानक

चैतन्य महाप्रभू आणि संत कबीर यांच्या रचनांचा समावेश आहे. गुरुनानकांनंतर शिखांचे नऊ गुरू झाले. गुरुगोविंदसिंग हे शिखांचे दहावे गुरू. सर्व शीख 'ग्रंथसाहिब' या धर्मग्रंथालाच गुरू मानून त्याचे पठण करतात.

**सुफी पंथ :** सुफी पंथ हा मूळचा इराणमधला. परमेश्वर प्रेममय आहे आणि प्रेम व भक्ती या मार्गांनीच त्याच्यापर्यंत पोहचता येते, अशी सुफी साधूंची श्रद्‌धा होती. हे साधू अत्यंत साधेपणाने राहत. सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करावे, परमेश्वराचे चिंतन करावे, साधेपणाने राहावे, अशी त्यांची शिकवण होती. भारतात आलेल्या सुफी संतांपैकी ख्वाजा मोइनुद्‌दीन चिश्ती हे एक विख्यात तत्त्वज्ञ होते. त्यांच्याप्रमाणेच शेख निझामुद्‌दीन अवलिया हे एक थोर सुफी संत होते. सुफी संतांच्या उपदेशाचा परिणाम जसा मुसलमान समाजावर झाला, तसाच तो हिंदू समाजावरही झाला. हे समाज जवळ येण्यास फार मोठा हातभार लागला.

संतांनी सांगितलेला भक्तिमार्ग सर्वसामान्यांना आचरण्यास सोपा होता. सर्व स्त्री-पुरुषांना भक्तीचळवळीमध्ये प्रवेश होता. संतांनी आपले विचार लोकभाषेतून मांडले. सर्वसामान्य लोकांना ते अधिक जवळचे वाटले. भारतीय संस्कृतीची जी जडणघडण झाली आहे, तिच्यामध्ये भक्तिमार्गाचा फार मोठा वाटा आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) सूरदास यांनी..........हे काव्य लिहिले.

(आ) शिखांचा पवित्र ग्रंथ ..........हा आहे.

(इ) शेख निझामुद्‌दीन अवलिया हे एक थोर..........संत होते.

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) भक्ती चळवळीने कोणती शिकवण दिली?

(आ) संत मीराबाईंनी आपल्या भक्तिगीतांतून कोणता संदेश दिला?

(इ) सुफी साधूंची कोणती श्रद्धा होती?

३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) संत कबीरांनी कोणती शिकवण दिली?

(आ) बसवेश्वरांनी कोणते कार्य केले?

(इ) गुरुनानकांनी कोणती शिकवण दिली?

### उपक्रम

'संतांच्या शिकवणुकीचा समाजावर झालेला परिणाम' या विषयावर शिक्षकांच्या मदतीने वर्गात चर्चासत्र आयोजित करा.

# ७. मुघल सत्तेची स्थापना व विस्तार

इ.स. १५२६ मध्ये दिल्ली येथील सुलतानशाही संपुष्टात आली. तेथे मुघल सत्तेची स्थापना झाली. मुघल सत्तेची स्थापना आणि तिचा विस्तार यासंबंधीची माहिती आपण या पाठामध्ये घेणार आहोत.

बाबर : बाबर हा मुघल सत्तेचा संस्थापक होय. तो मध्य आशियातील फरघाना राज्याचा राजा होता. मध्य आशियातील सत्तास्पर्धेमध्ये त्याला स्थैर्य लाभले नाही. त्याने अफगाणिस्तानातील काबूल, गझनी आणि त्याच्या आसपासचा प्रदेश जिंकून घेतला. अफगाणिस्तानमध्ये त्याने आपली सत्ता स्थिर केली. भारतातील संपत्तीसंबंधीचे वर्णन त्याने ऐकलेले होते, म्हणूनच त्याने भारतावरील स्वारीची आखणी केली.



बाबर

दिल्लीमध्ये इब्राहीम लोदी हा सुलतान राज्यकारभार करत होता. सुलतानशाहीतील पंजाबच्या प्रदेशात दौलतखान लोदी हा प्रमुख अधिकारी होता. इब्राहीम लोदी आणि दौलतखान लोदी यांच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला. दौलतखानाने भारतावर आक्रमण करण्यासाठी बाबराला निमंत्रित केले. ही संधी साधून बाबराने भारतावर आक्रमण केले. बाबराच्या आक्रमणास विरोध करण्याकरिता

इब्राहीम लोदी सैन्य घेऊन निघाला. इब्राहीम लोदी आणि बाबर यांच्यामध्ये २१ एप्रिल १५२६ या दिवशी पानिपत या ठिकाणी लढाई झाली. या लढाईमध्ये बाबराने भारतात प्रथमच तोफखान्याचा प्रभावी उपयोग केला. इब्राहीम लोदीच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईनंतर बाबर पुढे दिल्लीकडे गेला. भारताच्या इतिहासामध्ये ही पानिपतची पहिली लढाई म्हणून ओळखली जाते.

पानिपतच्या लढाईनंतर बाबराला राजपुतांच्या विरोधास तोंड द्यावे लागले. मेवाडच्या राणासंगाने राजपूत राजांना एकत्र आणले. बाबर आणि राणासंग यांच्यामध्ये खानुआ या ठिकाणी लढाई झाली. या लढाईत राणासंग आणि त्याच्या सैन्याने पराक्रमाची शर्थ केली, तथापि याही लढाईत बाबराचा तोफखाना आणि त्याचे राखीव सैन्य यांनी मोठी प्रभावी कामगिरी केली. राणासंगाच्या सैन्याचा पराभव झाला. अशा रीतीने राजपुतांकडून मिळालेल्या आव्हानावर मात करण्यात बाबर यशस्वी झाला. इ.स. १५३० मध्ये बाबराचा मृत्यू झाला.

**हुमायून :** बाबराच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हुमायून गादीवर आला. बाबराने अफगाणांची सत्ता संपुष्टात आणलेली होती. अफगाण हे मुघलांचे विरोधक झालेले होते. बिहारमधील अफगाणांचा प्रमुख शेरखान आणि हुमायून यांच्यामध्ये चौसा या ठिकाणी लढाई झाली. शेरखानाने या लढाईत हुमायूनचा पराभव केला. चौसाच्या लढाईनंतर शेरखानाने 'शेरशाह' हे नवीन नाव धारण केले. हुमायून व शेरशाह यांच्यामध्ये कनोज येथे इ.स. १५४० मध्ये पुन्हा लढाई झाली. याही लढाईत शेरशाहाने हुमायूनचा पराभव केला. शेरशाहाने आग्रा, दिल्ली जिंकून घेतले. बाबराने स्थापन केलेले राज्य हुमायून गमावून बसला. शेरशाहाने दिल्ली येथे सूर घराण्याची सत्ता स्थापन केली. हुमायूनला पुढे पंधरा वर्षे राज्याविना भटकंती करावी लागली.

**शेरशाह सूर :** दिल्लीवर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर शेरशाहाने आपल्या राज्याचा विस्तार केला. त्याच्या साम्राज्यामध्ये पंजाब, मुलतान, सिंध, राजस्थानचा बराचसा भाग, माळवा, बुंदेलखंड या प्रदेशांचा समावेश होता.

शेरशाहाने प्रशासनामध्ये कार्यक्षमता आणली. जमीन महसूल पद्धतीमध्ये सुधारणा केली. एकूण पीक उत्पादनापैकी शेतकऱ्यांनी सरकारला द्यायचा हिस्सा निश्चित केला. त्याने राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. लोककल्याणाकडे विशेष लक्ष पुरवले. राजधानीला जोडणाऱ्या महामार्गांवर सरायांचे जाळे निर्माण केले. सैन्याच्या हालचालींसाठी व टपालाची ने-आण करणाऱ्या सेवकांसाठी सरायांचा उपयोग होत होता. शेरशाहाने चलनव्यवस्थेत सुधारणा केली. रुपया हे नाणे त्यानेच सुरू केले. त्याने व्यापार आणि व्यवसायास चालना दिली. साम्राज्याच्या बाहेरून साम्राज्यात वस्तू आणताना त्यावरील अनावश्यक कर त्याने रद्द केले.



**शेरशाहाचे नाणे - रुपया**

शेरशाह हा न्यायी होता. सर्वसामान्य लोकांना न्याय मिळावा, असा त्याचा कटाक्ष होता. गरिबांसाठी त्याने मोफत अन्नछत्रालये सुरू केली. अनाथ मुले, विधवा स्त्रिया यांना मदत मिळावी असा त्याचा प्रयत्न असे. अशा रीतीने कार्यक्षम प्रशासनाबरोबरच जनहित साधण्याचा त्याने प्रयत्न केला. इ.स. १५४५ मध्ये शेरशाहाचा मृत्यू झाला.


**अकबर :** हुमायूनने अफगाणांकडून दिल्ली पुन्हा जिंकून घेतली. त्यानंतर लगेचच हुमायूनचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याचा मुलगा अकबर हा गादीवर आला. अकबराचा अफगाणांबरोबर संघर्ष अटळ होता. सूर घराण्यातील सुलतान मुहम्मद आदिलशाह याचा सेनापती हेमू याच्या बरोबर १५५६ मध्ये अकबराची पानिपत येथे लढाई झाली. अकबराने हेमूच्या सैन्याचा पराभव केला. मुघलांनी निर्णायक विजय मिळवला. सूर घराण्याची सत्ता कायमची संपुष्टात आली. ही पानिपतची दुसरी लढाई म्हणून ओळखली जाते.



**सम्राट अकबर**

अकबर हा एक सुजाण आणि जागरूक शासक होता. त्याने समाजातील अनिष्ट प्रथांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. युद्धकैद्यांना गुलाम केले जाण्याची प्रथा बंद केली. यात्रा कर, जिझिया कर यांसारखे कर रद्द केले. सती, बालहत्या यांसारख्या प्रथांवर बंदी घातली. विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता दिली.

अकबराचे धार्मिक धोरण उदार व सहिष्णू होते. सर्व धर्मांतील चांगली तत्त्वे एकत्र करून अकबराने 'दीन-इ-इलाही' ही नवी व्यवस्था निर्माण केली. मानवतावाद, एकेश्वरवाद आणि विश्वबंधुत्व या तत्त्वांवर आधारित ही नवी व्यवस्था होती. हा एक विश्वधर्माचा प्रयोग होता. अकबराने दीन-इ-इलाही स्वीकारण्याची सक्ती कोणावरही केली नाही.




Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. The territorial waters of India extended into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. The responsibility rest with the publisher. © Government of India Copyright- 2008

अकबर हा विद्याप्रेमी आणि कलाप्रेमी होता. अकबराच्या दरबारात अनेक विद्वान व्यक्ती, तसेच गुणी कलाकार होते. अबूल फजल हा विद्वान पंडित व इतिहासकार होता. फैजी हा कवी व तत्त्वज्ञ होता. मुत्सद्देगिरी व चातुर्यासाठी बिरबल प्रसिद्ध होता. तानसेन हा संगीत-सम्राट होता. बदायुनी हा प्रसिद्ध इतिहासकार होता. गुणग्राहकता, विशाल

दृष्टी, मानवतावादी दृष्टिकोन इत्यादी गुणांमुळे अकबर हा एक महान राज्यकर्ता म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. इ.स.१६०५ मध्ये सम्राट अकबराचा मृत्यू झाला.

अकबराचे साम्राज्य उत्तरेला काश्मीरपासून दक्षिणेला अहमदनगरपर्यंत, तर पश्चिमेला काबूल, कंदाहारपासून पूर्वेला बिहार, बंगालपर्यंत पसरले होते. अकबराने आपले एकछत्री साम्राज्य निर्माण केले. या साम्राज्य निर्मितीमध्ये मेवाडचा राणा प्रताप आणि अहमदनगरची चांदबिबी यांनी अकबराविरुद्ध केलेला संघर्ष उल्लेखनीय आहे.

**राणा प्रताप :** अकबराला आपल्या राज्याचा विस्तार करायचा होता. अकबराच्या या साम्राज्यवादी धोरणास मेवाडचा राणा उदयसिंह याने विरोध दर्शवला. मेवाडची राजधानी चितोडला अकबराने वेढा दिला व चितोडचा किल्ला जिंकून घेतला. उदयसिंहाच्या मृत्यूनंतर मेवाडच्या गादीवर महाराणा प्रताप आला. त्याने मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी अकबराबरोबर संघर्ष चालू ठेवला. कितीही प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली तरीही त्यास तोंड द्यायचे, असा निर्धार त्याने केला. अकबराला शेवटपर्यंत मेवाड जिंकून घेता आला नाही. अशा रीतीने राणा प्रतापने अखेरपर्यंत मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला.



राणा प्रताप

**चांदबिबी :** इ.स. १५९५ मध्ये मुघलांनी निजामशाहीची राजधानी अहमदनगरवर हल्ला केला. मुघल सैन्याने अहमदनगरच्या किल्ल्याला



चांदबिबी

वेढा दिला. अहमदनगरच्या राजघराण्यातील कर्तबगार स्त्री चांदबिबीने अत्यंत धैर्याने तो किल्ला लढवला. या वेळी निजामशाहीतील सरदारांमध्ये दुही निर्माण झाली. या दुहीतून चांदबिबीस ठार मारले गेले. पुढे मुघलांनी अहमदनगरचा किल्ला जिंकून घेतला.मात्र संपूर्ण निजामशाहीचे राज्य मुघलांच्या ताब्यात आले नाही.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) मुघल सत्तेचा संस्थापक .......... हा होय.

(आ) शेरशाहाने .......... हे नाणे सुरू केले.

(इ) दीन-इ-इलाही हा एक .......... प्रयोग होता.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) बाबराने भारतावर स्वारीची आखणी का केली?

(आ) सरायांचा उपयोग कशासाठी होत होता?

(इ) अकबराने कोणत्या प्रथांना बंदी घातली?

(ई) महाराणा प्रतापने अकबराशी संघर्ष का केला?

३. **तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शेरशाह सूरने कोणत्या सुधारणा केल्या?

(आ) दीन-इ-इलाहीविषयी माहिती सांगा.

**उपक्रम**

बिरबलाच्या चातुर्यकथांचे वाचन करून त्या वर्गात सांगा.

# ८. मुघल सत्तेचा विस्तार

जहांगीर, शाहजहान आणि औरंगजेब या बादशाहांच्या काळात मुघल सत्तेचा विस्तार कसा झाला, त्याची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.



जहांगीर

**जहांगीर :** अकबराच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा जहांगीर हा बादशाह झाला. आपल्या कारकिर्दीत जहांगिराने पूर्व बंगालमध्ये सत्ता दृढ केली. त्याने पंजाबमधील कांगडा हा प्रदेश जिंकून घेतला. अकबराचे दक्षिणेकडील राज्यविस्ताराचे धोरण त्याने पुढे चालू ठेवले. इ.स. १६२७ मध्ये जहांगिराचा मृत्यू झाला.



नूरजहान

राज्यकारभारात जहांगिराची पत्नी नूरजहानचा विशेष सहभाग होता. तिचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होते. तिला काव्य, संगीत, चित्रकला यांची आवड होती.

**शाहजहान :** जहांगिराच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा शाहजहान हा बादशाह झाला. शाहजहानने आदिलशाही आणि कुतुबशाही या दोन सत्तांना आपले प्रभुत्व मान्य

करण्यास भाग पाडले. त्याने आदिलशाहीच्या मदतीने निजामशाहीचे अस्तित्व संपुष्टात आणले. त्यांनी निजामशाहीचा प्रदेश आपापसांत वाटून घेतला.

शाहजहानने आपल्या साम्राज्याची वायव्येकडील सरहद्द सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याला इराण आणि अफगाणिस्तानच्या सरहद्दीवरील कंदाहारचा किल्ला इराणच्या शहाकडून घ्यायचा होता, पण त्यास तो किल्ला जिंकून घेता आला नाही. तसेच मध्य आशियातील बाल्ख व बदाक्शान हे प्रांत त्याने जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. त्यातही त्याला अपयश आले. शाहजहानचे मध्य आशियासंबंधीचे धोरण यशस्वी झाले नाही.



शाहजहान

शाहजहान आजारी पडल्यानंतर त्याच्या मुलांमध्ये सत्तेसाठी संघर्ष सुरू झाला. त्यात औरंगजेब यशस्वी झाला. त्याने शाहजहानला कैद केले व स्वतःस बादशाह म्हणून घोषित केले. पुढे आग्र्याच्या किल्ल्यात नजरकैदेत असतानाच शाहजहानचा इ. स. १६६६ मध्ये मृत्यू झाला.

**औरंगजेब :** इ. स. १६५८ मध्ये औरंगजेब बादशाह झाला. त्या वेळी मुघल साम्राज्य हे उत्तरेस काश्मीरपासून दक्षिणेस अहमदनगरपर्यंत आणि पश्चिमेस काबूलपासून पूर्वेला बंगालपर्यंत पसरलेले होते. औरंगजेबाने आपल्या कारकिर्दीत या साम्राज्यात पूर्वेकडील आसाम, दक्षिणेतील विजापूर व गोवळकोंड्याचा प्रदेश आणि महाराष्ट्राचा काही भाग या प्रदेशांची भर घातली. परिणामी मुघल सत्ता जवळजवळ सर्व भारतभर पसरली.

औरंगजेबाच्या असहिष्णू धोरणाविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया झाली. आसाममध्ये आहोमांनी मुघलांच्या वर्चस्ववादी धोरणाविरुद्ध संघर्ष केला. वायव्य सरहद्दीवरील पठाण, मथुरेच्या परिसरातील जाट आणि उत्तर भारतातील सत्नामी पंथाचे लोक यांनी औरंगजेबाच्या धोरणाविरुद्ध उठाव केले. औरंगजेबाने ते मोडून काढले.



औरंगजेब

**आहोम :** इसवी सनाच्या तेराव्या शतकात म्यानमार या देशामधून आलेले शान जमातीचे लोक ब्रम्हपुत्रा नदीच्या खोऱ्यात स्थायिक झाले. तेथे त्यांनी आपले राज्य स्थापन केले. स्थानिक लोक या लोकांना आहोम असे म्हणत. इसवी सनाच्या सोळाव्या शतकामध्ये आहोमांनी ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यात आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

औरंगजेबाच्या काळात आहोमांचा मुघलांशी दीर्घकाळ संघर्ष झाला. आहोमांची या संघर्षामध्ये दोन उद्दिष्टे होती. एक म्हणजे गुवाहाटी आणि आसपासच्या प्रदेशातून मुघलांना हुसकावून लावणे. दुसरे म्हणजे संपूर्ण ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यावर आपले वर्चस्व निर्माण करणे. मुघलांनी संपूर्ण कुचबिहार राज्याचा प्रदेश आपल्या साम्राज्यास जोडून घेतला. त्यांनी आहोमांच्या प्रदेशावरही आक्रमण केले. आहोमांनी मुघलांविरुद्धच्या संघर्षात गनिमी युद्धतंत्राचा अवलंब केला. गदाधरसिंह याच्या नेतृत्वाखाली आहोम संघटित झाले. मुघलांना आसाममध्ये आपली सत्ता दृढ करणे अशक्य झाले.

**शिखांशी संघर्ष :** शिखांचे नववे गुरू गुरुतेघबहाद्दर यांनी औरंगजेबाच्या असहिष्णू धार्मिक धोरणाविरुद्ध तीव्र नापसंती दर्शवली. औरंगजेबाने गुरुतेघबहाद्दरांना कैद करून त्यांचा शिरच्छेद केला. गुरुतेघबहाद्दर यांच्यानंतर गुरुगोविंदसिंग हे शिखांचे गुरू झाले.


गुरुगोविंदसिंग

गुरुगोविंदसिंगांनी आपल्या अनुयायांना संघटित करून त्यांच्यातील लढाऊ वृत्तीला प्रोत्साहन दिले. लढाऊ शीख तरुणांचे एक दल उभे केले. त्यास 'खालसा दल' असे म्हणतात. त्यांनी हिमाचल प्रदेशातील पहाडी भागात शीख सत्ता दृढ केली. आनंदपूर हे त्यांचे प्रमुख केंद्र होते. औरंगजेबाने शिखांविरुद्ध सैन्य पाठवले. मुघल फौजांनी आनंदपूरवर हल्ला चढवला. त्या वेळी शिखांनी प्रखर झुंज दिली, परंतु त्यांना यश आले नाही. त्यांची अपरिमित हानी झाली. यानंतर गुरुगोविंदसिंग दक्षिणेत आले. इ. स. १७०८ मध्ये नांदेड मुक्कामी त्यांच्यावर हल्ला झाला. पुढे त्यातच त्यांचे निधन झाले.

**राजपुतांशी संघर्ष :** अकबराने आपल्या सलोख्याच्या धोरणाने राजपुतांचे सहकार्य मिळवले होते. मुघल सत्तेच्या विस्तारकार्यात आणि तिच्या दृढीकरणात राजपुतांचे सहकार्य मोलाचे ठरले होते. औरंगजेबाला राजपुतांचे सहकार्य मिळवता आले नाही. मारवाडचा राणा जसवंतसिंगाच्या मृत्यूनंतर त्याचे राज्य औरंगजेबाने मुघल साम्राज्यास जोडून घेतले. दुर्गादास राठोड याने जसवंतसिंगाचा अल्पवयीन मुलगा अजितसिंह याला

मारवाडच्या गादीवर बसवले. दुर्गादास राठोडने मुघलांविरुद्ध मोठा संघर्ष केला. दुर्गादासाचा हा प्रतिकार मोडून काढण्यासाठी औरंगजेबाने राजपुत्र अकबर याला मारवाडमध्ये पाठवले. राजपुत्र अकबर हा स्वतः राजपुतांना जाऊन मिळाला. दुर्गादास राठोड याने मारवाडच्या अस्तित्वासाठी मुघलांविरुद्धचा हा संघर्ष चालू ठेवला.

**मराठ्यांशी संघर्ष :** महाराष्ट्रात शिवाजीमहाराजांच्या नेतृत्त्वाखाली स्वराज्याची स्थापना झाली. त्यांना स्वराज्य स्थापन करण्याच्या या प्रयत्नामध्ये इतर शत्रूंबरोबरच मुघलांशीही संघर्ष करावा लागला. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर संपूर्ण दक्षिण भारत जिंकून घेण्याच्या हेतूने औरंगजेब दख्खनमध्ये आला. त्याने मराठ्यांविरुद्ध मोहीम हाती घेतली. मराठ्यांनी औरंगजेबाशी तीव्र संघर्ष केला आणि आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण केले. या सर्व संघर्षाची माहिती आपण पुढे घेणार आहोत.

बाबराने मुघल सत्तेचा पाया घातला. अकबराने मुघल साम्राज्याची निर्मिती केली. जहांगीर आणि शाहजहान यांच्या काळात दक्षिणेमध्ये मुघल सत्तेचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न झाले. औरंगजेबाच्या कारकिर्दीत मुघल सत्तेचा मोठा विस्तार झाला. औरंगजेबाच्या असहिष्णू आणि संकुचित धोरणामुळे त्यास ठिकठिकाणच्या उद्रेकांना सामोरे जावे लागले. हे उद्रेक मोडून काढताना मुघल सत्ता खिळखिळी होत गेली. इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल सत्ता अधिकच दुर्बल झाली.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) जहांगिराच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा ............ हा बादशाह झाला.

(आ) आसाममध्ये .......... मुघलांच्या वर्चस्ववादी धोरणाविरुद्ध संघर्ष केला.

(इ) अकबराने आपल्या............ धोरणाने राजपुतांचे सहकार्य मिळवले होते.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शाहजहानने कोणत्या दोन सत्तांना मुघलांचे प्रभुत्व मान्य करण्यास भाग पाडले?

(आ) आहोमांनी कोणत्या प्रदेशात वर्चस्व प्रस्थापित केले?

(इ) 'खालसा दल' कोणी संघटित केले?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) औरंगजेबाने मुघल साम्राज्यात कोणत्या प्रदेशांची भर घातली?

(आ) मुघलांविरुद्धच्या संघर्षामध्ये आहोमांची कोणती दोन उद्दिष्टे होती?

४. **कारणे लिहा.**

(अ) औरंगजेबाने राजपुत्र अकबर याला मारवाडमध्ये पाठवले.

(आ) औरंगजेबाला ठिकठिकाणच्या उठावांना सामोरे जावे लागले.

**उपक्रम**

गुरुगोविंदसिंगांचे चरित्र वाचा.

# ९. नव्या सत्ताकेंद्रांची निर्मिती

औरंगजेबानंतरचे मुघल बादशाह दुर्बल होते. या परिस्थितीचा फायदा घेऊन मातब्बर मुघल अधिकाऱ्यांनी आपल्या प्रभुत्वाखालील प्रदेशांमध्ये आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. असे प्रयत्न बंगाल, हैदराबादमध्ये झाले. पंजाबमध्ये शिखांनी मुघल सत्तेशी संघर्ष करून आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. याची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

**बंगाल :** औरंगजेबाच्या मृत्यूच्या वेळेस मुर्शिदकुलीखान हा बंगाल व उडीसा प्रांतांच्या महसूल व्यवस्थेचा प्रमुख होता. पुढे तो बंगालचा सुभेदार झाला. त्याने बंगालची राजधानी ढाक्का येथून मुर्शिदाबाद येथे नेली. कार्यक्षम प्रशासन निर्माण केले. प्रशासनावरील खर्च त्याने कमी केला. आपल्या प्रदेशांतील व्यापारास व उद्योगास प्रोत्साहन दिले. अंतर्गत शांतता ठेवली. या काळात मुघल बादशाहाचे बंगालवरील नियंत्रण हळूहळू कमी होत गेले. इ.स. १७४० मध्ये अलीवर्दीखान बंगालचा शासक झाला. त्याने स्वत:स 'नवाब' ही पदवी घेतली. यानंतर मुघल बादशाहाचे बंगालवर नियंत्रण राहिले नाही.

**हैदराबाद :** मुघल बादशाह फर्रूखसियर याने निजाम-उल-मुल्क याची दख्खनचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. इ.स.१७१३ मध्ये निजामाने हैदराबाद येथे आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याला मुघल अधिकाऱ्यांबरोबरही संघर्ष करावा लागला. निजाम आपली धोरणे स्वतंत्रपणे ठरवू लागला. मनसबदारांच्या नेमणुका करू लागला. त्यांना जहागिरी देऊ लागला. मुघल बादशाहाच्या आज्ञेशिवाय तो स्वतंत्रपणे कारभार पाहू लागला. निजामाने घेतलेल्या निर्णयावर

शिक्कामोर्तब करणे एवढेच बादशाहाचे काम राहिले. अशा प्रकारे निजामाने दख्खनमध्ये आपली सत्ता दृढ केली.

पंजाब : मुघलांविरुद्ध शिखांचा संघर्ष चाललेला होता. या संघर्षकाळात गुरुगोविंदसिंग हे नांदेडला आलेले होते. त्यांना येथे लक्ष्मणदास या नावाचा एक बैरागी भेटला. त्याने स्वतःस गुरुगोविंदसिंगांचे शिष्य म्हणवून घेतले. तो स्वतःस 'बंदा' म्हणवून घेऊ लागला. गुरुगोविंदसिंगांनी त्याला 'पंजाबात जावे, तेथे 'खालसा'चे नेतृत्व करावे,' असे सांगितले. त्यांच्या संदेशानुसार बंदा बैरागी पंजाबमध्ये गेला. तेथे त्याने शिखांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी मुघलांविरुद्ध संघर्ष केला. त्याने चाळीस हजार शिखांचे 'खालसा दल' संघटित केले. सतलज ते यमुना या नद्यांच्या खोऱ्यांतील प्रदेश व्यापला. मुखलिसपूर येथे लोहगड हा भक्कम किल्ला बांधला. तो खालसाचा कारभार पाहू लागला. गुरुनानक आणि गुरुगोविंदसिंग यांच्या नावाने त्याने नाणी पाडली. मुघलांनी शिखांविरुद्धची मोहीम तीव्र केली. बंदा बैरागी यास पकडण्यात आले. दिल्ली येथे नेऊन त्यास इ.स. १७१६ मध्ये ठार मारण्यात आले.

इ. स. १७३९ मध्ये इराणचा बादशाह नादिरशाह याने दिल्लीवर आक्रमण केले. त्याच्या आक्रमणाचा तडाखा मुघल सत्तेला बसला. मुघल सत्ता खिळखिळी झाली. शिखांनी या अस्थिर राजकीय परिस्थितीचा फायदा घेतला. पंजाबवर आपले नियंत्रण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अफगाणिस्तानच्या अहमदशाह अब्दालीने पंजाबवर आपले प्रभुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शिखांनी त्यास तीव्र विरोध केला. त्यांनी आपले राज्य बारा संघांमध्ये संघटित केले. अशा रीतीने शिखांनी मुघल सत्तेशी संघर्ष करत आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) मुर्शिदकुलीखान हा .............. व उडीसा प्रांतांच्या महसूल व्यवस्थेचा प्रमुख होता.

(आ) निजामाने .......... येथे आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

(इ) लक्ष्मणदासाने स्वत:स ................ यांचे शिष्य म्हणवून घेतले.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अलीवर्दीखानाने स्वत:स कोणती पदवी घेतली?

(आ) बंदा बैरागीने कोणाच्या नावाने नाणी पाडली?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) मुर्शिदकुलीखानने बंगाल प्रांतात कोणती कामगिरी केली?

(आ) बंदा बैरागी याने मुघलांविरुद्ध संघर्ष कसा केला?

### उपक्रम

भारताच्या नकाशात दिल्ली, हैदराबाद व नांदेड हे ठिकाणे दाखवा.

# १०. मुघलकालीन समाजजीवन

मुघल काळात भारताच्या आर्थिक व सामाजिक जीवनात अनेक बदल घडून आले. वास्तुकला, चित्रकला, साहित्य या क्षेत्रांत मोलाची भर पडली. याची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

**आर्थिक जीवन :** या काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. शेतकरी ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ, कापूस, ऊस इत्यादी पिके घेत असत. तंबाखू, मका, बटाटा व मिरची ही पिके नव्याने घेण्यात येऊ लागली.

मुघल राज्यकर्त्यांनी शेतीला उत्तेजन दिले. अधिक जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न केले. शेतकऱ्यांना दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये बी-बियाणे व शेतीच्या कामांसाठी कर्ज दिले जाई.

शेतीखेरीज मासेमारी, खनिज उद्योग, मीठ उत्पादन इत्यादी व्यवसाय रूढ होते. कापड उद्योग विशेष भरभराटीस आला होता. गुजरात, बंगाल, उडीसा हे प्रांत कापड निर्मितीसाठी विशेष प्रसिद्ध होते. याशिवाय रेशमी कापड उत्पादनासाठी आग्रा, पाटणा, खंबायत, पैठण इत्यादी ठिकाणे प्रसिद्ध होती. रंग तयार करणे, विविध प्रकारचे धातुकाम करणे, जहाजबांधणी यांसारखे उद्योगधंदेही या काळात भरभराटीला आले.

निरनिराळ्या व्यवसायांची केंद्रे, व्यापारी केंद्रे आणि बंदरे यांना जोडणाऱ्या रस्त्यांचे एक मोठे जाळेच पसरलेले होते. या दळणवळणाच्या व्यवस्थेमध्ये आग्रा हे मध्यवर्ती केंद्र होते. आग्र्याहून काबूल, कंदाहार, खंबायत, बऱ्हाणपूर आणि सोनारगाव येथे प्रमुख महामार्ग गेलेले होते. या महामार्गांवर प्रवाशांच्या विश्रांतीसाठी सराया म्हणजे धर्मशाळा बांधल्या होत्या. महामार्गावर प्रवाशांना सावली मिळावी म्हणून झाडे लावली होती. विहिरी खोदून पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

मुघल बादशाहांनी मुबलक प्रमाणात नाणी पाडली. त्यामुळे व्यापाऱ्यांना पुरेसे चलन उपलब्ध झाले. सोन्याची नाणी पाडली जात. सोन्याच्या नाण्यास 'मोहर' असे म्हणत. मात्र, व्यापारामध्ये चांदीच्या



**मुघलकालीन नाणी**

रुपयाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असे. लहान स्वरूपाच्या व्यवहारात तांब्याच्या नाण्याचा उपयोग केला जाई. तांब्याच्या नाण्याला 'दाम' म्हणत. खंबायत, सुरत, भरूच, कोचीन, हुगळी इत्यादी बंदरांतून व्यापार होत असे. दिल्ली, आग्रा, बऱ्हाणपूर, सोनारगाव, काबूल इत्यादी नगरे व्यापारी केंद्रे म्हणून भरभराटीस आली. चलनाची उपलब्धता व नगरांचा विकास या गोष्टींमुळे भारताचा अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीस लागला.

देशांतर्गत व्यापारामध्ये धान्य, कापूस, विविध प्रकारचे कापड, मीठ, शिसे, सुगंधी द्रव्ये इत्यादी वस्तूंचा अंतर्भाव होता. मालाची वाहतूक करण्यासाठी घोडे, बैल, उंट, गाढव, बैलगाड्या यांचा वापर होत असे.

आशिया आणि युरोप खंडांतील विविध देशांशी भारताचा व्यापार चालत असे. भारतातून मुख्यतः मसाल्याचे पदार्थ, कापड, काष्ठौषधी, नीळ इत्यादी गोष्टींची निर्यात होत असे. सोने, चांदी, तांबे, कथील, जस्त,

पारा इत्यादी गोष्टींची भारतात आयात होत असे.

**समाजजीवन** : मुघलकालीन भारतीय समाजात आर्थिकदृष्ट्या सर्वसाधारणपणे तीन वर्ग होते. पहिला वर्ग हा राजघराण्यातील लोक, अमीर-उमराव, जमीनदार इत्यादी धनिकांचा होता. दुसऱ्या वर्गात प्रशासनातील दुय्यम अधिकारी, व्यापारी इत्यादींचा अंतर्भाव होत असे. तिसऱ्या वर्गात शेतकरी, कारागीर, शेतमजूर इत्यादी लोक असत.


या काळातील शिक्षण पद्धतीमध्ये महत्त्वाचे बदल घडून आले नाहीत. हिंदूंच्या पाठशाळा आणि मुसलमानांच्या मदरसा या उच्च शिक्षण देणाऱ्या प्रमुख शिक्षण संस्था होत्या. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. अभ्यासाचे विषय पारंपरिक होते. शिक्षणामध्ये नवीन आशय, नवीन विचार नव्हता. पारंपरिक ज्ञानशाखांमध्ये महत्त्वाची भर पडली नाही.

समाजावर अंधश्रद्धेचा पगडा होता. जनजीवनात रूढी-परंपरांना अनन्यसाधारण महत्त्व होते. कर्मकांडांचे व आचारधर्माचे स्तोम वाढले होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. बालविवाह, पडदापद्धती, सती अशा अनेक अनिष्ट प्रथा समाजात प्रचलित होत्या.

**वास्तुकला** : मुघल काळात भारतीय वास्तुकलेत प्रगती झाली. पारंपरिक भारतीय कला आणि इराणी कला यांचा सुरेख संगम वास्तुकलेमध्ये झालेला आढळतो. इमारतीची प्रमाणबद्धता, भव्यता व नाजूकपणा यांचा समन्वय, वास्तूभोवतालची विस्तीर्ण उद्याने ही या वास्तुरचनेची वैशिष्ट्ये होत. उंच चौथऱ्यावर बांधलेली इमारत, इमारतीसाठी वापरलेला लाल अथवा संगमरवरी दगड, कोरीव पाना-फुलांनी सुशोभित केलेल्या संगमरवरी कमानी, इमारतीतील नक्षीदार दगडी


जाळ्या आणि वास्तूवरील दुहेरी घुमट ही मुघलकालीन वास्तूंची आणखी काही वैशिष्ट्ये आहेत.

अकबराने आग्र्याजवळ फत्तेपूर सिक्री हे नवीन शहर वसवले. येथील बुलंद दरवाजा, दिवाण-इ-खास, दिवाण-इ-आम इत्यादी वास्तू विशेष उल्लेखनीय आहेत. बुलंद दरवाजा हा भव्यतेसाठी प्रसिद्ध आहे.



बुलंद दरवाजा

शाहजहानच्या काळात शुभ्र संगमरवरी दगडाचा वापर वास्तू बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला गेला. मुमताजमहल या आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ शाहजहानने आग्रा येथे 'ताजमहाल' ही वास्तू बांधली. ही वास्तू भव्य आहे. ती साधी व सौंदर्यपूर्ण आहे. वास्तूच्या आतील जाळीकाम विलोभनीय आहे. संगमरवरी भिंतींवर पानाफुलांचे नक्षीकाम



ताजमहाल

असून ते रत्नजडित आहे.वास्तूभोवती विस्तीर्ण बाग आहे. ताजमहाल ही जगातील एक सुंदर वास्तू आहे. शाहजहानने दिल्ली येथे बांधलेला किल्ला 'लाल किल्ला' म्हणून प्रसिद्ध आहे. या किल्ल्यातील दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास ही दालने विशेष प्रसिद्ध आहेत.



लाल किल्ला - दिल्ली

**चित्रकला :** मुघलांच्या दरबारी भारतीय व इराणी चित्रकार होते. भारतीय चित्रकार हे व्यक्तींची हुबेहूब चित्रे काढण्यात कुशल होते. इराणी चित्रकार सुरेख निसर्गचित्रे काढत. जहांगिराने पशुपक्ष्यांची व फुलांची अनेक चित्रे काढून घेतली. त्याच्या काळात निसर्गचित्रणाला महत्त्वाचे स्थान मिळाले.

या काळात मोठमोठ्या विस्तीर्ण बागा तयार करण्यात आल्या. त्यांपैकी काश्मीरमधील शालीमार बाग हे याचे उत्तम उदाहरण आहे.

**वाङ्मय :** या काळात संस्कृत, फार्सी त्याचप्रमाणे प्रादेशिक भाषांमध्ये विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली. बाबराने लिहिलेले 'तुझुक-इ-बाबरी' हे त्याचे तुर्की भाषेतील आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. बाबराची कन्या गुलबदन बेगम हिने लिहिलेला 'हुमायूननामा' हा चरित्र-ग्रंथ आहे. अबुल फजल याने लिहिलेल्या 'अकबरनामा' व 'ऐन-इ-अकबरी' मध्ये अकबराच्या काळाबद्दल माहिती मिळते. शाहजहानचा मुलगा दारा शुकोह याने काही उपनिषदांचे फार्सीमध्ये केलेले भाषांतर प्रसिद्ध आहे. मलीक मुहम्मद जायसी या कवीचे 'पद्मावत' हे काव्य हिंदीमधील अभिजात काव्य म्हणून मानले जाते.

कला व साहित्याच्या क्षेत्रांत मुघल काळात मोलाची भर पडली. पारंपरिक भारतीय कलेवर मध्य व पश्चिम आशियाई शैलींचा परिणाम झाला. या परस्पर समन्वयातून भारतीय संस्कृती समृद्ध झाली.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) मुघल काळात तांब्याच्या नाण्याला ............... म्हणत.

(आ) भारतीय कला आणि .................. कला यांचा सुरेख संगम मुघलकालीन वास्तुकलेमध्ये झालेला आढळतो.

(इ) मुघल काळात................ या बादशाहाने पशुपक्ष्यांची व फुलांची चित्रे काढून घेतली.

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) तुझुक-इ-बाबरी | (१) गुलबदन बेगम |
| (आ) हुमायूननामा | (२) बाबर |
| (इ) अकबरनामा | (३) दारा शुकोह |
| | (४) अबुल फजल |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) कापड निर्मितीसाठी कोणते प्रांत विशेष प्रसिद्ध होते?

(आ) भारतातून मुख्यत: कोणत्या गोष्टींची निर्यात होत असे?

(इ) मुघल काळातील वास्तुरचनेची कोणती वैशिष्ट्ये आहेत?

४. कारणे लिहा.

(अ) मुघल काळात भारताचा अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीस लागला.

(आ) ताजमहाल ही जगातील एक सुंदर वास्तू आहे.

**उपक्रम**

मुघलकालीन वास्तूंच्या चित्रांचा संग्रह करा.

# ११. शिवपूर्वकालीन महाराष्ट्र

सतराव्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्रातील बहुतांश प्रदेश अहमदनगरचा निजामशाह आणि विजापूरचा आदिलशाह यांच्या ताब्यात होता. मुघलांचा खानदेशामध्ये शिरकाव झालेला होता. दक्षिणेमध्ये आपला सत्ताविस्तार घडवून आणणे हे त्यांचे उद्‌दिष्ट होते. कोकणच्या किनारपट्‌टीवर पोर्तुगीज आणि सिद्‌दी या दोन सागरी सत्ता होत्या.तसेच इंग्रज, डच यांच्या वखारी किनारपट्‌टीवर होत्या. ते आपला व्यापार वाढवण्याच्या उद्योगात गुंतलेले होते. या सर्व सत्तांमध्ये म्हणजेच आदिलशाही, निजामशाही, मुघल, सिद्‌दी व पोर्तुगीज यांचे परस्परांमध्ये सतत संघर्ष होत असत. या संघर्षांमुळे महाराष्ट्रात अस्थिरता व असुरक्षितता निर्माण झाली होती.

**मौजा :** बहुतेक लोक गावामध्येच राहत. गावाला मौजा असेही म्हणत. पाटील हा गावाचा प्रमुख असे. पाटील गावातील जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्न करी. जेव्हा गावामध्ये तंटाबखेडा होत असे, तेव्हा शांतता निर्माण करण्याचे काम पाटील पाही. पाटलास त्याच्या कामात कुलकर्णी मदत करत असे. जमा झालेल्या महसुलाची नोंद करणे हे काम कुलकर्णी करत असे. गावामध्ये निरनिराळे कारागीर असत. त्यांच्याकडे व्यवसायासंबंधीचे हक्क वंशपरंपरेने चालत आलेले असत. गावात ते जी सेवा देत असत त्याबद्‌दल कुळांकडून त्यांना शेतीतील उत्पन्नाचा काही वाटा मिळे. त्यास बलुता असे म्हणत. शेती करण्याचे काम कुळे करत.

**कसबा :** कसबा हे एक मोठे खेडेगावच असे. सामान्यत: परगण्याचे ते मुख्य ठिकाण असे. इंदापूर परगण्याचा इंदापूर कसबा, वाई

परगण्याचा वाई कसबा ही परगण्याची मुख्य ठिकाणे होती. मुख्य व्यवसाय शेतीचा असे. कसब्यात कसबी कारागीर असत. उदा., सुतार, लोहार इत्यादी. कसब्याला जोडूनच बाजारपेठ असे. शेटे व महाजन हे पेठेचे वतनदार असत. प्रत्येक गावात पेठ असेल असे नाही, मात्र गावात पेठ वसवण्याचे काम शेटे-महाजनांचे असे. त्यासाठी त्यांना सरकारातून जमीन आणि गावकऱ्यांकडून काही हक्क मिळत. पेठेचा हिशेब ठेवण्याचे काम महाजन पाहत असे.

**परगणा :** अनेक गावे मिळून परगणा होत असे. उदा., पुणे परगणा हा मोठा परगणा होता. त्यात २९० गावे होती. चाकण परगण्यात ६४ गावे होती. शिरवळ परगणा लहान होता. त्यात ४० गावे होती. देशमुख व देशपांडे हे परगण्याचे वतनदार अधिकारी असत. देशमुख हा परगण्यातील पाटलांचा प्रमुख असे. गावपातळीवर जे काम पाटील करत असे. तेच काम परगणा पातळीवर देशमुख करत असे. तसेच परगण्यातील कुलकर्ण्यांचा प्रमुख देशपांडे असे. गावपातळीवर कुलकर्णी जे काम करत असे. ते काम परगणा पातळीवर देशपांडे करत असे. हे वतनदार अधिकारी रयत आणि सरकार यांच्यामधील दुवा होते. परगण्यातील गावांवरती कधी परचक्र आले किंवा दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झाली तर, अशा वेळी रयतेचे म्हणणे सरकारकडे मांडण्याचे काम हे वतनदार अधिकारी करत. काही वेळेला हे अधिकारी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करत. कधी रयतेकडून अधिक पैसा जमा करत किंवा रयतेकडून गोळा केलेली रक्कम सरकारकडे जमा करण्यास विलंब लावत. अशा वेळी प्रजा त्रासली जात असे.

**दुष्काळाचे संकट :** शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असे. पाऊस पडला नाही तर शेतात पीक येत नसे. धान्यवस्तूंचे भाव

वाढत. लोकांना अन्नधान्यादी वस्तू मिळणे मुश्कील होई. जनावरांना चारा मिळत नसे. पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होई. लोकांना गावात राहणे कठीण होई. लोक गाव सोडत. लोकांवर परागंदा होण्याची वेळ येई. दुष्काळ हे रयतेला सर्वांत मोठे संकट वाटे.

महाराष्ट्रामध्ये असाच एक मोठा दुष्काळ इ.स.१६३० मध्ये पडलेला होता. या दुष्काळाने लोक हवालदिल झाले. 'भाकरीच्या तुकड्यासाठी लोक स्वत:ला विकून घेण्यास तयार होते, पण विकत घेणाराच कोणी नव्हता,' असे वर्णन या दुष्काळाबद्दलचे येते. धान्याची तीव्र टंचाई निर्माण झाली. कुटुंबे उद्ध्वस्त झाली. गुरे-ढोरे मेली. शेतीव्यवसाय खचला. उद्योगधंदे संपुष्टात आले. आर्थिक व्यवहार खुंटले. लोक देशोधडीला लागले. अशा उद्ध्वस्त झालेल्या लोकजीवनाची घडी बसवणे हे एक मोठे आव्हान होते.

**संतांचे कार्य :** अंधश्रद्धा व कर्मकांड यांचा समाजावर जबरदस्त पगडा होता. लोक दैववादाच्या आहारी गेले होते. त्यांची प्रयत्नशीलता थंडावली होती. रयतेची स्थिती तर फारच हलाखीची होती. अशा परिस्थितीत समाजात चैतन्य निर्माण करण्याचे प्रयत्न महाराष्ट्रातील संतांनी केले.

महाराष्ट्रात श्री चक्रधर, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर यांच्यापासून सुरू झालेली संतपरंपरा समाजाच्या विविध स्तरांमधून आलेल्या संतांनी पुढे चालवली. या संत परंपरेमध्ये समाजातील सर्व स्तरांतील लोक होते. उदा., संत चोखामेळा, संत रोहिदास, संत सेना, संत गोरा, संत सावता, संत नरहरी, संत शेख महंमद इत्यादी. त्याचप्रमाणे या संतमंडळीत संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा यांसारख्या स्त्रियाही होत्या. या

संत चळवळीचे पंढरपूर हे केंद्र होते. विठ्ठल हे त्यांचे दैवत होते. पंढरपुरात चंद्रभागेच्या काठी ही सर्व संतमंडळी आणि वारकरी भक्तिरसात न्हाऊन निघत.



संत ज्ञानेश्वर

संतांनी लोकांना परमेश्वर भक्तीचा अत्यंत साधा, सोपा मार्ग सांगितला. अगदी साध्या नामस्मरणाचाही भक्तिमार्ग त्यांनी सांगितला. संत चळवळीमध्ये मोठ्या प्रमाणावर मराठी भाषेतील साहित्यनिर्मिती झाली. ज्ञानेश्वरांनी गीतेचा अर्थ स्पष्ट करणारा 'भावार्थ दीपिका' अर्थातच 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला. तसेच त्यांनी 'अमृतानुभव' या ग्रंथाची रचना केली. त्यांनी वारकरी चळवळीचा पाया घातला.



संत नामदेव

संत नामदेवांची अभंग रचना प्रसिद्ध आहे. ते पंजाबमध्ये गेले होते. त्यांनी लिहिलेली हिंदी पदे शिखांच्या 'ग्रंथसाहिब' या ग्रंथात समाविष्ट आहेत. त्यांनी भागवत धर्माचा संदेश गावोगावी पोचवण्याचे कार्य केले.

संत एकनाथांचे साहित्य विपुल व विविध प्रकारचे आहे. त्यात अभंग, गौळणी, भारुडे



संत एकनाथ

इत्यादींचा समावेश होतो. त्यांनी भागवत धर्माची मांडणी सोपी व सविस्तर केलेली आहे. त्यांनी भावार्थ रामायणात रामकथेच्या निमित्ताने लोकजीवनाचे चित्र रेखाटले आहे. त्यांच्या अभंगांत भक्तीचा जिव्हाळा आहे. संत एकनाथांच्या भारुडांनी व गौळणींनी लोकनाट्याच्या परंपरेस उचलून धरले. परमार्थप्राप्तीसाठी प्रपंच सोडण्याची आवश्यकता नाही, हे त्यांनी स्वत:च्या आचरणाने दाखवून दिले. ते खऱ्या अर्थाने लोकशिक्षक होते. आपली मराठी भाषा कोणत्याही अर्थाने संस्कृत भाषेपेक्षा कमी नाही. 'संस्कृत वाणी देवे केली। तरी प्राकृत काय चोरापासुनि झाली?' हे त्यांनी संस्कृत पंडितांना ठणकावून विचारले.

संत तुकारामांची अभंग रचना प्रसन्न आणि प्रासादिक आहे. ही सर्व रचना अभंग छंदात आहे. त्यांच्या अभंगांना श्रेष्ठ कवित्वाची उंची लाभली आहे. तुकारामांची ही अभंगवाणी मराठी भाषेचा अमोल ठेवा आहे. ते रंजल्यागांजल्यांमध्ये देवत्व पाहण्यास सांगतात.



संत तुकाराम

'जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा'।

रामदासस्वामींनी बलोपासनेचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।' असे सांगून लोकचळवळीचे आणि लोकसंघटनाचे महत्त्व सांगितले. आळशी, निरुद्योगी जीवन जगणे त्यांना मान्य नव्हते. त्यांनी लोकांना सतत कार्यरत राहण्याचा संदेश दिला.



रामदासस्वामी

संतांनी लोकांच्या मनात आपला प्रदेश, आपली भाषा, आपले साहित्य,आपली संस्कृती यांविषयी स्वत्वभावना निर्माण केली. लोकांना समतेचा संदेश दिला. माणुसकी व मानवताधर्म शिकवला. एकमेकांवर प्रेम करावे, एकत्र यावे व एकजुटीने राहावे ही त्यांची शिकवण होती. संतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. परचक्र किंवा दुष्काळजन्य परिस्थिती किंवा निरनिराळ्या प्रकारची निसर्गसंकटे यांतून दैनंदिन जीवन जगताना संतांचा भक्तीचा उपदेश हा लोकांचा आधार ठरला. संतांच्या या कार्यामुळे महाराष्ट्रातील लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) अनेक गावे मिळून .......... होत असे.

(आ) संत चळवळीचे ..........हे केंद्र होते.

(इ) संत तुकारामांची अभंग रचना ................ आणि प्रासादिक आहे.

(ई) रामदासस्वामींनी ............ चे महत्त्व स्पष्ट केले.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोकणच्या किनारपट्टीवर कोणत्या सागरी सत्ता होत्या?
(आ) संत ज्ञानेश्वरांनी कोणते ग्रंथ लिहिले?
(इ) संत नामदेवांनी कोणते कार्य केले?
(ई) संत एकनाथांच्या साहित्यात कोणते प्रकार आढळतात?

३. **कारणे लिहा.**

(अ) रयतेला दुष्काळ हे सर्वांत मोठे संकट वाटे.
(आ) संतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली.

**उपक्रम**

(अ) संतांची चित्रे वहीत चिकटवा व त्यांखाली त्यांचे विचार लिहा.
(आ) शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात संत एकनाथांचे भारूड साभिनय सादर करा.




# १२. स्वराज्यस्थापना

शके १५५१, फाल्गुन वद्य तृतीयेस म्हणजेच १९ फेब्रुवारी, १६३० रोजी पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळील शिवनेरी किल्ल्यावर शिवाजीमहाराजांचा जन्म झाला. शहाजीराजे हे दक्षिणेतील एक मातब्बर सरदार होते. मुघलांनी निजामशाही जिंकून घेण्यासाठी मोहीम हाती घेतली. या मोहिमेत विजापूरच्या आदिलशाहाने मुघलांशी सहकार्य केले. शहाजीराजांनी त्यांना प्रखर विरोध करून निजामशाही वाचवण्याचा प्रयत्न केला; परंतु मुघल व आदिलशाही यांच्या सामर्थ्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. इ.स. १६३६ मध्ये निजामशाहीचा पाडाव होऊन ती नष्ट झाली.

निजामशाहीचे अस्तित्व संपुष्टात आल्यानंतर शहाजीराजे विजापूरच्या आदिलशाहीचे सरदार झाले. शहाजीराजांकडील भीमा व नीरा या नद्यांमधील पुणे, सुपे, इंदापूर व चाकण हे परगणे हा त्यांच्या मूळ जहागिरीचा मुलूख आदिलशाहाने त्यांच्याकडेच ठेवला. आदिलशाहाकडून शहाजीराजांना कर्नाटकात बंगळूर व त्याच्या आसपासचा प्रदेश जहागीर म्हणून मिळाला.

शहाजीराजांनी पुण्याच्या जहागिरीचा कारभार शिवाजीराजे व वीरमाता जिजाबाई यांच्याकडे सोपवला. त्यांच्यासोबत दादाजी कोंडदेव हा एकनिष्ठ व अनुभवी अधिकारी दिला. दादाजीने जहागिरीमध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण केली.

**सहकारी :** शिवाजीमहाराजांनी स्वराज्यस्थापनेची सुरुवात मावळ भागात केली. मावळचा प्रदेश डोंगराळ, दऱ्याखोऱ्यांचा व दुर्गम.



छत्रपती शिवाजीमहाराज

मावळच्या भौगोलिक परिस्थितीचा उपयोग महाराजांनी स्वराज्यस्थापनेत मोठ्या कौशल्याने केला. त्यांनी लोकांच्या मनात विश्वासाची व आपलेपणाची भावना निर्माण केली. या स्वराज्यस्थापनेच्या कार्यात

त्यांना चांगले सवंगडी व सहकारी मिळाले. येसाजी कंक, बाजी पासलकर, बापूजी मुद्‌गल, नऱ्हेकर देशपांडे बंधू, कावजी कोंढाळकर, जिवा महाला, तानाजी मालुसरे, कान्होजी जेधे, बाजीप्रभू देशपांडे, दादाजी नरसप्रभू देशपांडे यांसारखे अनेक सवंगडी, सहकारी मिळाले. या सहकाऱ्यांच्या बळावर शिवाजीमहाराजांनी स्वराज्याचे कार्य हाती घेतले.

**राजमुद्रा :** स्वराज्यस्थापनेमागील शिवाजीमहाराजांचे ध्येय त्यांच्या तत्कालीन राजमुद्रेवरून स्पष्ट होते. त्यांच्या या राजमुद्रेवर पुढील संस्कृत ओळी कोरलेल्या आहेत.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥


शिवाजीमहाराजांची राजमुद्रा

शिवाजीमहाराजांनी या राजमुद्रेतून 'शहाजीचा पुत्र शिवाजी याचे प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढत जाणारे हे राज्य लोकांच्या कल्याणासाठी आहे,' अशी लोकांना ग्वाही दिलेली आहे.

**स्वराज्यस्थापनेच्या हालचाली :** शिवाजीमहाराजांच्या जहागिरीतील किल्ले हे त्यांच्या अमलात नव्हते, तर ते आदिलशाहीच्या ताब्यात होते. त्या काळात किल्ल्यांचे विशेष महत्त्व होते. किल्ला ताब्यात असला म्हणजे आजूबाजूच्या प्रदेशांवर नियंत्रण ठेवता येत असे. 'ज्याचे किल्ले त्याचे राज्य' अशी परिस्थिती असे. यामुळे किल्ले ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आदिलशाही सत्तेस आव्हान देण्यासारखे होते. आपल्या जहागिरीतील किल्ले आपल्या ताब्यात

घेण्याचे महाराजांनी ठरवले. त्यांनी मुरुंबदेव, तोरणा, कोंढाणा, पुरंदर हे किल्ले ताब्यात घेतले आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. मुरुंबदेव किल्ल्याची डागडुजी करून त्याचे नाव 'राजगड' ठेवले. सुरुवातीच्या काळात राजगड ही स्वराज्याची पहिली राजधानी होती.

आदिलशाहीमध्ये जावळीचे मोरे, मुधोळचे घोरपडे व वाडीचे सावंत इत्यादी सरदार होते. स्वराज्यस्थापनेच्या कार्यास त्यांचा विरोध होता. या व अशांसारख्या सरदारांचा बंदोबस्त करणे हे स्वराज्यस्थापनेसाठी आवश्यक होते.

**जावळीचा ताबा** : सातारा जिल्ह्यातील जावळी या ठिकाणी चंद्रराव मोरे हा आदिलशाहीतील मातब्बर सरदार होता. स्वराज्यस्थापनेच्या कार्यास त्याने विरोध दर्शवला. तेव्हा इ.स. १६५६ मध्ये शिवाजीमहाराजांनी जावळीवर स्वारी करून तो प्रदेश जिंकून घेतला. तेथे आपले ठाणे वसवले. नंतर रायगडही जिंकून घेतला. जावळीवरील विजयाने महाराजांच्या कोकणातील हालचाली वाढल्या. त्यांनी किनारपट्टीवरील कल्याण व भिवंडी ही ठिकाणे जिंकून घेतली. त्यांचा संबंध पश्चिम किनारपट्टीवरील सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज या सत्तांशी आला. या सत्तांशी संघर्ष करायचा असेल, तर आपल्याला प्रबळ असे आरमार उभारले पाहिजे हे महाराजांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी आरमार उभारणीकडे लक्ष दिले. जावळीच्या खोऱ्यात प्रतापगड हा किल्ला बांधला. जावळीची प्रचंड संपत्ती शिवाजीमहाराजांच्या हाती पडली. अशा रीतीने जावळीच्या विजयाने त्यांचे सामर्थ्य सर्व प्रकारे वाढले.

**अफजलखानाचे पारिपत्य** : शिवाजीमहाराजांनी आपल्या जहागिरीतील व आसपासच्या आदिलशाही प्रदेशातील किल्ले घेण्यास

सुरुवात केली होती. जावळीच्या मोऱ्यांचा विरोध मोडून काढलेला होता. कोकण किनारपट्टीवर स्वराज्यस्थापनेच्या कार्यास गती आली होती. या सर्व गोष्टी हे आदिलशाहीस आव्हान होते. या वेळी आदिलशाहीचा कारभार बडी साहेबीण पाहत होती. शिवाजीमहाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी तिने आदिलशाहीतील अफजलखान या बलाढ्य व अनुभवी सरदारास पाठवले.

अफजलखान विजापूरहून तुळजापूर, पंढरपूर व रहिमतपूर या मार्गे वाईस आला. वाटेत त्याने लोकांना व मंदिरांना उपद्रव दिला. अफजलखानास वाई प्रांताची चांगली माहिती होती. वाईजवळील प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी शिवाजीमहाराज आणि अफजलखान यांची १० नोव्हेंबर १६५९ रोजी भेट झाली. या भेटीत अफजलखानाने महाराजांना दगाफटका करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांनी अफजलखानास ठार मारले. आदिलशाही सैन्याचे पारिपत्य केले.

अफजलखानाच्या वधानंतर शिवाजीमहाराजांनी लढाईतील जखमी सैनिकांना भरपाई दिली. ज्यांनी या लढाईत चांगली कामगिरी केली, त्यांना बक्षिसे दिली. अफजलखानाच्या सैन्यातील जे सैनिक व अधिकारी शिवाजीमहाराजांच्या सैन्याच्या हाती लागले त्यांना चांगली वागणूक दिली.

**सिद्दी जौहरची स्वारी :** शिवाजीमहाराजांनी आदिलशाहीतील बलाढ्य सरदार अफजलखानाचे पारिपत्य केले होते. त्यानंतर त्यांनी आदिलशाहीतील पन्हाळा, वसंतगड व खेळणा हे किल्ले जिंकून घेतले. खेळणा किल्ल्यास महाराजांनी 'विशाळगड' असे नाव दिले.

शिवाजीमहाराजांनी आदिलशाहीसमोर मोठे आव्हान निर्माण केले, तेव्हा आदिलशाहाने इ.स. १६६० मध्ये सिद्दी जौहर या कर्नुल प्रांताच्या सरदारास महाराजांवर चालून जाण्यास सांगितले. आदिलशाहाने

सिद्दीला 'सलाबतखान' असा किताब दिला. सिद्दी जौहरच्या मदतीस रुस्तुम-इ-जमान, बाजी घोरपडे व फाजलखान हेही होते. या परिस्थितीत शिवाजीमहाराजांनी पन्हाळा किल्ल्यावर आश्रय घेतला. सुमारे पाच महिने सिद्दीच्या सैनिकांचा पन्हाळ्यास वेढा चालू होता. वेढ्यातून बाहेर पडणे महाराजांना कठीण झाले होते. नेतोजी पालकरने बाहेरून सिद्दीच्या सैन्यावर हल्ला करून वेढा उठवण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचे सैन्य थोडे असल्याने ते शक्य झाले नाही. सिद्दी वेढा उठवेल अशी चिन्हे दिसत नव्हती. तेव्हा महाराजांनी सिद्दीशी बोलणी सुरू केली. त्यामुळे पन्हाळगडास दिलेल्या वेढ्यामध्ये शिथिलता निर्माण झाली.

या परिस्थितीचा फायदा शिवाजीमहाराजांनी घेतला. ते पन्हाळगडाच्या वेढ्यातून बाहेर पडून विशाळगडाकडे निघाले. ही बातमी सिद्दीस समजली. सिद्दीच्या सैन्याने त्यांचा पाठलाग केला. महाराजांनी सिद्दीच्या सैन्यास विशाळगडाच्या पायथ्याजवळ थोपवण्याची जबाबदारी बाजीप्रभू देशपांडे याच्याकडे सोपवली. बाजीप्रभूने गजापूरजवळील घोडखिंडीत सिद्दीच्या सैन्यास अडवले. त्याने पराक्रमाची शर्थ केली. या संघर्षात बाजीप्रभूला वीरमरण आले. बाजीप्रभूच्या सैन्याने सिद्दीच्या सैन्यास थोपवून धरल्यामुळे महाराजांना विशाळगडाकडे कूच करणे शक्य झाले. विशाळगडाकडे जाताना महाराजांनी आदिलशाही सरदार पालवनचे दळवी व शृंगारपूरचे सुर्वे यांचाही विरोध मोडून काढला. महाराज विशाळगडावर सुखरूप पोचले.

शिवाजीमहाराज पन्हाळगडाच्या वेढ्यात अडकले होते, तेव्हा मुघल सरदार शायिस्ताखानाने पुणे प्रांतावर स्वारी केलेली होती. आदिलशाहीशी संघर्ष चालू होता. मुघलांचे सैन्यही स्वराज्यावर चालून

आले होते. अशा परिस्थितीत दोन शत्रूंबरोबर एकाच वेळी लढणे, ही गोष्ट बरोबर होणार नाही, हे महाराजांनी लक्षात घेतले. विशाळगडावर सुखरूप पोचल्यानंतर त्यांनी आदिलशाहाबरोबर तह केला. या तहानुसार पन्हाळा किल्ला आदिलशाहाला परत केला.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) शिवाजीमहाराजांनी स्वराज्यस्थापनेची सुरुवात ..........भागात केली.

(आ) खेळणा किल्ल्यास महाराजांनी ................ असे नाव दिले.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शिवाजीमहाराजांच्या सहकाऱ्यांची नावे सांगा.

(आ) शिवाजीमहाराजांनी कोणते किल्ले घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली?

(इ) स्वराज्यस्थापनेच्या कार्यास कोणत्या सरदारांचा विरोध होता?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) राजमुद्रेतून शिवाजीमहाराजांनी लोकांना कोणती ग्वाही दिली?

(आ) शिवाजीमहाराजांनी सिद्दी जौहरशी वाटाघाटीची बोलणी का सुरू केली?

**उपक्रम**

या पाठात आलेल्या कोणत्याही एका किल्ल्याची प्रतिकृती तयार करा.

# १३. मुघलांशी संघर्ष

आतापर्यंत महाराजांनी आदिलशाहीशी यशस्वी संघर्ष केलेला होता; परंतु स्वराज्याचा विस्तार करताना मुघलांशी संघर्ष अटळ होता. स्वराज्यावर मुघलांचे संकट आलेले होते. महाराजांनी याही संकटावर मात केली. मुघलांकडून आपले किल्ले आणि प्रदेश परत मिळवले. स्वत:स राज्याभिषेक करवून घेतला. दक्षिणेकडील मोहीम हाती घेतली. या सर्व घटनांची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

**शायिस्ताखानाची स्वारी :** फेब्रुवारी १६६० मध्ये शायिस्ताखान अहमदनगरहून निघून पुणे प्रांतात आला. सुपे, बारामती व होळमार्गे तो शिरवळला आला. त्याने आसपासच्या प्रदेशात लहान लहान तुकड्या पाठवून स्वराज्याचा प्रदेश उद्ध्वस्त केला. चाकणलाही त्याने तळ दिला. चाकणच्या किल्ल्याचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याने शायिस्ताखानाच्या सैन्यास तीव्र प्रतिकार केला. शेवटी मुघलांनी चाकणचा किल्ला जिंकून घेतला.

शायिस्ताखान पुण्यातील लाल महालात तळ ठोकून बसला. त्याने आसपासच्या प्रदेशात फौजा पाठवल्या. या फौजा प्रजेची लूट करत. दोन वर्षे झाली, तरी तो पुण्यातील मुक्काम सोडण्याचा विचार करत नव्हता. त्याचा परिणाम प्रजेच्या नीतिधैर्यावर होणे स्वाभाविक होते. अशा परिस्थितीत महाराजांनी एक धाडसी बेत आखला.

५ एप्रिल १६६३ रोजी शिवाजीमहाराजांनी लाल महालावर छापा घातला. या छाप्यात शायिस्ताखानाची बोटे तुटली. त्याची मानहानी झाली; त्याने पुणे सोडले व आपला मुक्काम औरंगाबादला हालवला.

शायिस्ताखानाने औरंगजेबाची नाराजी ओढवून घेतली. औरंगजेबाने त्यास बंगालच्या सुभ्यावर पाठवले. शायिस्ताखानावरील या यशस्वी हल्ल्याचा परिणाम लोकांवरही झाला. महाराजांच्या कर्तृत्वावरील प्रजेचा विश्वास अधिकच वृद्धिंगत झाला.

**सुरतेवरील स्वारी :** शायिस्ताखानाने तीन वर्षांच्या काळात स्वराज्याचा प्रदेश उद्ध्वस्त केला होता. त्याची भरपाई करणे आवश्यक होते. त्यासाठी शिवाजीमहाराजांनी मुघलांना धडा शिकवण्याची योजना आखली. मुघलांच्या ताब्यातील सुरत हे एक मोठे बंदर होते. तेथे युरोपियनांच्या म्हणजे इंग्रज, डच व फ्रेंच यांच्या वखारी होत्या. हे शहर आर्थिकदृष्ट्या संपन्न होते. सुरत शहरावर त्यांनी हल्ला करण्याचे ठरवले. महाराजांनी सुरतेवरील स्वारीची योजना आखली. सुरतेचा सुभेदार महाराजांच्या स्वारीचा प्रतिकार करू शकला नाही. सुरतेमधून महाराजांनी मोठी संपत्ती मिळवली. महाराजांची सुरतेवरील ही मोहीम पूर्ण यशस्वी झाली. या मोहिमेमुळे औरंगजेब बादशाहाच्या प्रतिष्ठेस धक्का बसला.

**जयसिंगाची स्वारी :** शिवाजीमहाराजांच्या वाढत्या हालचालींचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेबाने जयसिंग हा अनुभवी आणि मातब्बर मुघल सरदार पाठवला. जयसिंग पुण्यामध्ये आला. प्रथम शिवाजीमहाराजांचा बंदोबस्त करायचा आणि नंतर आदिलशाहाकडे वळायचे, असे या मोहिमेचे उद्दिष्ट होते. शिवाजीमहाराजांच्या विरोधात सर्व शक्ती संघटित करण्यासाठी जयसिंगाने आपले प्रयत्न सुरू केले. गोवा व वसईचे पोर्तुगीज, वेंगुर्ल्याचे डच, सुरतेचे इंग्रज, जंजिऱ्याचे सिद्दी यांनी महाराजांविरुद्ध आरमारी मोहीम काढावी, असे जयसिंगाने त्यांना सुचवले.

जयसिंगाने शिवाजीमहाराजांकडील किल्ले जिंकून घेण्याचा बेत आखला. जयसिंग आणि दिलेरखान यांनी पुरंदर किल्ल्यास वेढा दिला. स्वराज्याच्या विविध भागांत मुघल सैनिकांच्या तुकड्या पाठवण्यात आल्या. मुघल सैन्याने स्वराज्याचा भूप्रदेश बेचिराख केला. महाराजांनी मुघलांना प्रतिकार करण्याचे प्रयत्न केले. मुघलांनी घातलेल्या पुरंदरच्या वेढ्याच्या वेळी मुरारबाजी देशपांडे याने आपल्या पराक्रमाची शर्थ केली. त्यास वीरमरण आले. मुघलांबरोबरच्या या संघर्षामध्ये आपले व आपल्या प्रजेचे मोठे नुकसान होत आहे, हे लक्षात घेऊन महाराजांनी जयसिंगाबरोबर सलोख्याची बोलणी सुरू केली. महाराजांनी जयसिंगाची भेट घेतली. जयसिंग व महाराज यांच्यात जून १६६५ मध्ये तह झाला. हा तह 'पुरंदरचा तह' म्हणून ओळखला जातो. या तहानुसार महाराजांनी मुघलांना तेवीस किल्ले व त्यांच्या भोवतालचा वार्षिक चार लाख होन उत्पन्नाचा प्रदेश दिला. महाराजांनी आदिलशाहीविरुद्ध मुघलांना मदत करण्याचे आश्वासनही दिले. या तहास औरंगजेबाने मान्यता दिली.

**आग्रा भेट :** जयसिंगाने आदिलशाहीविरुद्ध मोहीम हाती घेतली. महाराजांनी जयसिंगास मदत केली, तथापि जयसिंगाची ही मोहीम यशस्वी झाली नाही. महाराजांना काही काळ तरी दक्षिणेच्या राजकारणापासून दूर ठेवावे, असा विचार जयसिंग व औरंगजेब बादशाह यांनी केला. महाराजांनी बादशाहाच्या भेटीस आग्र्यास जावे, असा प्रस्ताव जयसिंगाने त्यांच्यापुढे ठेवला. जयसिंगाने त्यांच्या सुरक्षिततेबद्दलची हमी दिली. शिवाजीमहाराज आग्रा भेटीस निघाले. त्यांनी आपल्याबरोबर राजपुत्र संभाजी, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, हिरोजी फर्जंद इत्यादी विश्वासू आणि जिवास जीव देणारी मंडळी बरोबर घेतली.

शिवाजीमहाराज आग्र्यास पोहचले. औरंगजेबाने दरबारामध्ये त्यांचा योग्य तो मान ठेवला नाही. त्यांनी संताप व्यक्त केला. त्यानंतर बादशाहाने शिवाजीमहाराजांना नजरकैद केले. आग्र्यातील वास्तव्यात महाराजांनी नजरकैदेतून आपली सुटका करून घेण्याची योजना आखली. आग्र्यातून ते शिताफीने निसटले. महाराज २० नोव्हेंबर १६६६ रोजी राजगडास आले. त्यांनी आग्र्याहून येताना संभाजीस मथुरा येथे ठेवले होते. पुढे राजपुत्र संभाजीस सुखरूपपणे राजगडावर आणण्यात आले.

**मुघलांविरुद्‌ध आक्रमक पवित्रा :** आग्र्याहून सुटून आल्यानंतर महाराजांना मुघलांबरोबर लगेचच संघर्ष नको होता. स्वराज्याची घडी बसवण्यावर त्यांनी आपले सर्व लक्ष केंद्रित केले.

पुरंदरच्या तहात मुघलांना दिलेले किल्ले आणि प्रदेश परत मिळवणे हे महाराजांचे उद्‌दिष्ट होते. त्यासाठी त्यांनी एक व्यापक व धडाडीची योजना तयार केली. निरनिराळ्या किल्ल्यांवर जय्यत तयारीनिशी सैन्य पाठवून ते किल्ले घ्यायचे, तर दुसऱ्या बाजूला मुघलांच्या प्रभुत्वाखालील दख्खनमधील प्रदेशांवर हल्ले करून त्यांना अस्थिर ठेवायचे असे हे धोरण होते. महाराजांनी अहमदनगर, जुन्नर या मुघलांच्या प्रदेशांवर हल्ले केले. पुढे एकापाठोपाठ सिंहगड, पुरंदर, लोहगड, माहुली, कर्नाळा, रोहिडा हे किल्ले जिंकून घेतले. यानंतर महाराजांनी सुरतेवर दुसऱ्यांदा स्वारी केली. सुरतेहून परत येताना नाशिक जिल्ह्यातील वणी-दिंडोरी या ठिकाणी मुघलांबरोबर मोठा संघर्ष झाला. या संघर्षात महाराजांनी मुघल सरदार दाऊदखानाचा पराभव केला. त्यानंतर मोरोपंत पिंगळे यांनी नाशिकजवळील त्र्यंबकगड जिंकून घेतला.


शिवाजीमहाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य
सूची
शिवाजीमहाराजांचे स्वराज्य
तंजावरचे राज्य (व्यंकोजीराजे)
परकीय सत्ता
किल्ला
भा र त
नर्मदा नदी
तापी नदी
मुंबई
अहमदनगर
गोवळकोंडा
पन्हाळा
कोल्हापूर
बंगलोर
जिंजी
वेलोर
श्रीलंका
लक्षद्वीप बेटे
उ.
किलोमीटर
हिंदी महासागर


अशा रीतीने शिवाजीमहाराजांच्या मुघलांविरुद्धच्या चढाईच्या धोरणास यश मिळाले. या चढाईच्या मोहिमांमध्ये तानाजी मालुसरे, मोरोपंत पिंगळे, प्रतापराव गुजर इत्यादी सरदारांनी मोलाची कामगिरी केली. या मोहिमांचे वर्णन कृष्णाजी अनंत सभासद या बखरकाराने 'चहू महिन्यात सत्तावीस गड घेतले. मोठी ख्याती केली.' असे केले आहे.

**राज्याभिषेक :** सतत तीस वर्षांच्या अविश्रांत परिश्रमांतून मराठ्यांचे स्वराज्य साकार झाले होते. स्वराज्याचे अस्तित्व स्वतंत्र व सार्वभौम आहे, हे स्पष्ट करण्यासाठी स्वराज्यास सर्वमान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे, हे महाराजांच्या लक्षात आले. यासाठी विधिवत राज्याभिषेकाची आवश्यकता होती. ६ जून १६७४ या दिवशी विद्वान पंडित गागाभट्ट यांनी रायगडावर शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक केला.

महाराज स्वराज्याच्या तख्ती बसले. ते आता स्वराज्याचे छत्रपती झाले. सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणून 'राज्याभिषेक शक' ही नवीन कालगणना सुरू करण्यात आली. महाराज शककर्ते झाले. राज्याभिषेक प्रसंगी 'श्री राजा शिवछत्रपती' ही अक्षरे कोरलेली, सोन्याचा 'होन' व तांब्याची 'शिवराई' ही खास नाणी पाडण्यात आली. तेथून पुढे राजपत्रांवर



होन



शिवराई


'क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपती' असा उल्लेख होऊ लागला. फार्सी शब्दांना पर्यायी संस्कृत शब्द असणारा असा एक कोश तयार करण्यात आला. यालाच 'राज्यव्यवहारकोश' असे म्हणतात. अशा रीतीने महाराजांनी राज्यकारभारातील स्वभाषेचे महत्त्व बिंबवले.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासामधील शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक ही एक क्रांतिकारी घटना होय. या घटनेचे महत्त्व सांगताना सभासद म्हणतो, 'मऱ्हाटा पातशाह येव्हढा छत्रपती जाला ही गोष्ट काही सामान्य झाली नाही.'

यानंतर शिवरायांनी अल्पावधीत निश्चलपुरी गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली दुसऱ्यांदा राज्याभिषेक करवून घेतला.

**दक्षिणेची मोहीम :** ऑक्टोबर १६७७ मध्ये महाराजांनी कर्नाटक मोहीम हाती घेतली. महाराज गोवळकोंड्यास गेले. तेथे कुतुबशाहाची भेट घेतली. त्याच्याबरोबर मैत्रीचा तह केला. तंजावर येथे महाराजांचा सावत्र भाऊ व्यंकोजी हा राज्य करत होता. शक्य झाले तर त्यालाही आपल्या स्वराज्यकार्यात सहभागी करून घेण्याचा महाराजांचा प्रयत्न होता. त्यास व्यंकोजीकडून प्रतिसाद मिळाला नाही. पुढे महाराजांनी कर्नाटकातील बंगळूर, होसकोट, तसेच जिंजी, वेल्लोर इत्यादी किल्ले आणि आदिलशाहीचा काही प्रदेश जिंकून घेतला. जिंकलेल्या प्रदेशाचा कारभार

पाहण्यासाठी मुख्य कारभारी म्हणून रघुनाथ नारायण हणमंते याची नेमणूक केली. दक्षिणेची ही मोहीम आटोपून महाराज स्वराज्यामध्ये परत आले. या मोहिमेनंतर अवघ्या दोनच वर्षांनी ३ एप्रिल १६८० रोजी महाराजांचे रायगडावर निधन झाले.



शिवाजीमहाराजांची समाधी - रायगड

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) चाकणच्या किल्ल्याचा किल्लेदार .......... याने शायिस्ताखानाच्या सैन्यास तीव्र प्रतिकार केला.

(आ) रायगडावर शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक ........... यांनी केला.

(इ) सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणून .......... ही नवीन कालगणना सुरू करण्यात आली.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) जयसिंगाच्या स्वारीचे कोणते उद्दिष्ट होते?

(आ) राज्याभिषेक प्रसंगी कोणती खास नाणी पाडण्यात आली?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शिवाजीमहाराजांनी जयसिंगाबरोबर सलोख्याची बोलणी का सुरू केली?

(आ) पुरंदरच्या तहात कोणत्या गोष्टी ठरल्या?

४. **कारणे लिहा.**

(अ) शायिस्ताखानाने आपला मुक्काम औरंगाबादला हालवला.

(आ) शिवाजीमहाराजांनी सुरत शहरावर हल्ला करण्याचे ठरवले.

**उपक्रम**

(अ) छत्रपती शिवाजीमहाराजांचे चरित्र वाचा.

(आ) भारताच्या नकाशात स्वराज्याचा प्रदेश दाखवा.

# १४. स्वराज्याचा कारभार

शिवाजीमहाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. स्वत:स राज्याभिषेक करवून घेतला. राज्याभिषेकानंतर महाराजांनी दक्षिण दिग्विजय केला. स्वराज्याचा विस्तार झाला. या स्वराज्यात महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे या जिल्ह्यांमधील बराचसा प्रदेश अंतर्भूत होता. तसेच कर्नाटक राज्यातील बेळगाव, कारवार व धारवाड जिल्ह्यांतील काही भाग आणि तमिळनाडू राज्यातील जिंजी, वेल्लोर आणि आसपासचा भाग स्वराज्यात समाविष्ट झालेला होता. स्वराज्याचा कारभार सुरळीतपणे व्हावा, त्यामध्ये लोकांचे कल्याण साधले जावे यासाठी महाराजांनी स्वराज्याची घडी बसवली.

**अष्टप्रधान मंडळ :** शिवाजीमहाराजांनी राज्याभिषेक प्रसंगी अष्टप्रधान मंडळाच्या नेमणुका केल्या. राज्यकारभाराच्या सोईसाठी आठ खात्यांमध्ये विभागणी केली. प्रत्येक खात्याच्या प्रमुखपदी मंत्र्यांची नेमणूक केली. असे एकूण आठ मंत्री होते. हेच ते 'अष्टप्रधान' मंडळ होय. मंत्र्यांची नेमणूक करणे किंवा त्यांना त्यांच्या पदावरून दूर करणे, हा महाराजांचा अधिकार होता. आपापल्या खात्याच्या कारभारासाठी हे मंत्री महाराजांना जबाबदार होते.

मोरो त्रिंबक पिंगळे हे मुख्य प्रधान होते. मुख्य प्रधानाचे काम राज्यकारभार चालवणे आणि जिंकून घेतलेल्या प्रदेशाची व्यवस्था पाहणे. रामचंद्र नीलकंठ मुजुमदार हे अमात्य होते. अमात्याचे काम राज्याचा जमाखर्च पाहण्याचे होते. अण्णाजी दत्तो हे सचिव होते. सचिवाचे काम

सरकारी आज्ञापत्रे तयार करण्याचे होते. दत्ताजी त्रिंबक वाकनीस हे मंत्री होते. मंत्र्याचे काम पत्रव्यवहार सांभाळण्याचे होते. हंबीरराव मोहिते हे सेनापती होते. सेनापतीचे काम सैन्याची व्यवस्था ठेवणे, राज्यरक्षण करणे हे होते. रामचंद्र त्रिंबक डबीर हे सुमंत होते. सुमंताचे काम परराज्यांशी संबंध ठेवण्याचे होते. निराजी रावजी हे न्यायाधीश होते. न्यायाधीशाचे काम न्यायदान करण्याचे होते. मोरेश्वर पंडितराव हे पंडितराव होते. पंडितरावांचे काम धार्मिक व्यवहार पाहणे हे होते.

**शेतीविषयीचे धोरण :** महाराजांनी शेतकऱ्यांच्या हिताकडे लक्ष दिले. अण्णाजी दत्तो या आपल्या कर्तबगार व अनुभवी अधिकाऱ्यावर जमीन महसुलाची व्यवस्था लावण्याची जबाबदारी सोपवली. ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा अधिक महसूल गोळा करू नये, अशी ताकीद त्यांनी अधिकाऱ्यांना दिली. पडीक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी उत्तेजन दिले. अतिवृष्टी झाली किंवा अवर्षण पडले, पीक हातचे गेले किंवा शत्रुसैन्याने गावचा प्रदेश उद्‌ध्वस्त केला, तर अशा सर्व प्रसंगी सरकारकडून गावकऱ्यांना शेतसारा व इतर करांमध्ये सूट देण्यात येई. शेतकऱ्यांना बैलजोड्या, नांगर आणि पेरणीसाठी चांगली बी-बियाणे पुरवावी, अशी महाराजांची अधिकाऱ्यांना आज्ञा होती.

**व्यापारास उत्तेजन :** शेतीव्यवसाय हा खेड्यातील अर्थकारणाचा कणा होता. खेड्यात शेतीव्यवसायाला पूरक असे व्यवसाय उभे राहत. गावातील कारागीर वस्तूंचे उत्पादन करत. ते स्थानिक लोकांच्या गरजा भागवत. या अर्थाने खेडे हे एक स्वयंपूर्ण घटक होते. शेतकरी आपल्या उत्पादनातून आवश्यक तो वाटा कारागिरांना देत. या वाट्यास बलुते असे म्हणत.

व्यापारवृद्धीशिवाय राज्य भरभराटीस येत नाही हे महाराजांनी ओळखले होते. व्यापाऱ्यांमुळे नवीन नवीन व गरजेच्या वस्तू राज्यात येतात. वस्तूंची मुबलकता वाढते. व्यापार वाढतो. संपत्तीत भर पडते. महाराजांचा व्यापाऱ्यांकडे पाहण्याचा नेमका समर्पक दृष्टिकोन आज्ञापत्रात आला आहे. आज्ञापत्रात 'साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा' असे व्यापाऱ्यांसंबंधी वर्णन येते.

उद्योगांना संरक्षण देण्याचे महाराजांचे धोरण होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मिठाचा उद्योग होय. त्यांनी कोकणातील मीठ उद्योगाला संरक्षण दिले. पोर्तुगीज प्रदेशातून स्वराज्यात येणाऱ्या मिठावर मोठी जकात बसवली. यामागे हेतू हा, की पोर्तुगीज प्रदेशातून येणारे मीठ महाग होईल त्यामुळे त्याच्या आयातीत घट होईल.

**लष्करी व्यवस्था :** महाराजांच्या लष्कराची विभागणी दोन भागांमध्ये होती. एक पायदळ आणि दुसरे घोडदळ. पायदळात सर्वांत लहान गट हा दहा सैनिकांचा असे. या दहा सैनिकांवर एक नाईक असे. नाईकांच्यावर हवालदार हा अधिकारी असे. पाच नाईकांवर एक हवालदार असे. दोन हवालदारांवर एक जुमलेदार असे. जुमलेदारांवर एक हजारी असे. सैन्याच्या प्रमुखास 'सरनोबत' म्हणत. तो पायदळातील सर्वोच्च अधिकारी होता.

घोडदळात दोन प्रकारचे घोडेस्वार होते. एक शिलेदार आणि दुसरा बारगीर. शिलेदाराकडे स्वतःचा घोडा व स्वतःची हत्यारे असत, तर बारगिराला सरकारकडून घोडा व हत्यारे दिली जात. घोडदळात बारगिरांची संख्या अधिक होती. घोडदळातही पायदळासारख्याच अधिकाऱ्यांच्या श्रेणी असत. घोडदळातील सरनोबत हा सर्वोच्च अधिकारी होता. नेतोजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते हे सरनोबत होते.

स्वराज्याचे शत्रूंपासून रक्षण करणे आवश्यक होते. यासाठी शत्रूच्या हालचालींची नेमकी माहिती वेळेवर मिळणे आवश्यक होते. शत्रूच्या हालचालींची माहिती काढून ती महाराजांना देण्याचे काम हेर खात्याकडे होते. महाराजांचे हेरखाते अत्यंत कार्यक्षम होते. महाराजांकडील बहिर्जी नाईक हा हेर अशा कामात निष्णात होता.

**किल्ले :** मध्ययुगामध्ये किल्ल्याचे महत्त्व अनन्यसाधारण होते. किल्ला ताब्यात असला, की आजूबाजूच्या प्रदेशावर लक्ष ठेवता येते. परचक्र आल्यास किल्ल्याच्या आश्रयाने प्रजेचे रक्षण करता येते. किल्ल्यावरती लष्करी शिबंदी, अन्नधान्य, युद्धोपयोगी साहित्य, दारूगोळा यांचे भांडार उभे करता येते. स्वराज्यस्थापनेच्या कार्यातील किल्ल्याचे महत्त्व आज्ञापत्रात सांगितलेले आहे, ते असे, 'हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केले'.


स्वराज्यामध्ये सुमारे २४० किल्ले होते. या किल्ल्यांच्या बांधणी व दुरुस्तीवर महाराजांनी मोठा खर्च केला. प्रतापगड, पावनगड, राजगड यांसारखे डोंगरी किल्ले बांधले. प्रत्येक किल्ल्यावर हवालदार, सरनोबत व सबनीस हे अधिकारी असत. याखेरीज किल्ल्यावरील धान्याची कोठी आणि युद्धसाहित्याची व्यवस्था पाहण्यासाठी कारखानीस हा अधिकारी असे.

**आरमार :** भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचे सिद्दी, तसेच सुरत व राजापूरचे इंग्रज वखारवाले हे शत्रू स्वराज्य विस्ताराच्या कार्यात अडथळा आणत. या अडथळ्यास पायबंद घालणे आणि पश्चिम किनारपट्टीचे रक्षण करणे याची आवश्यकता होती. यासाठी महाराजांनी आरमार उभे केले. 'ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र' हे महाराजांनी ओळखले. महाराज हे दूरदर्शी होते !

आरमाराबरोबरच महाराजांनी सागरी किल्ल्यांचेही महत्त्व ओळखले. त्यांनी बांधलेल्या जलदुर्गांपैकी मालवणचा सिंधुदुर्ग हा उत्कृष्ट सागरी किल्ला आहे. या किल्ल्याच्या बांधणीमध्ये भक्कमपणा यावा, यासाठी किल्ल्याच्या पायाभरणीसाठी पाच खंडी शिसे ओतले होते. सिद्दीला शह देण्यासाठी राजापुरीसमोर पद्मदुर्ग नावाचा सागरी किल्ला बांधला. आपल्या एका पत्रात या किल्ल्याविषयी महाराज म्हणतात, 'पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली.'



सिंधुदुर्ग



**लढाऊ जहाज - गुराब**

आरमारात विविध प्रकारची चारशे जहाजे होती. यांमधील गुराब, गलबत व पाल ही लढाऊ जहाजे होती. कल्याण-भिवंडीची खाडी, विजयदुर्ग, मालवण येथे जहाजे बांधली जात. मायनाक भंडारी व दौलतखान हे आरमाराचे प्रमुख अधिकारी होते.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) शिवाजीमहाराजांनी .......... या अधिकाऱ्यावर जमीनमहसुलाची व्यवस्था सोपवली.

(आ) घोडदळातील .......... हा सर्वोच्च अधिकारी होता.

(इ) सिद्दीला शह देण्यासाठी शिवाजीमहाराजांनी .......... हा सागरी किल्ला बांधला.

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) मुख्य प्रधान | (१) सरकारी आज्ञापत्रे तयार करणे. |
| (आ) अमात्य | (२) सैन्याची व्यवस्था ठेवणे. |
| (इ) सेनापती | (३) राज्यकारभार चालवणे. |
| (ई) सचिव | (४) राज्याचा जमाखर्च पाहणे. |
| | (५) धार्मिक व्यवहार पाहणे. |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) किल्ल्यावर कोणते अधिकारी असत?

(आ) हेरखात्याकडे कोणते काम होते?

(इ) शिवाजीमहाराजांच्या आरमारातील लढाऊ जहाजांची नावे सांगा.

४. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) मध्ययुगात किल्ल्यांचे कोणते महत्त्व होते?

(आ) शिवाजीमहाराजांनी आरमार का उभे केले?

**उपक्रम**

सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग या किल्ल्यांची छायाचित्रे मिळवून त्यांची माहिती लिहा.

# १५. रयतेचा राजा

महाराष्ट्रावर आदिलशाही, पोर्तुगीज, मुघल या सत्तांचे वर्चस्व होते. या सत्तांविरुद्ध महाराजांनी संघर्ष केला. ते सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीस सामोरे गेले. त्यांनी स्वतंत्र व सार्वभौम असे स्वराज्य स्थापन केले. या स्वराज्याच्या कारभाराची त्यांनी व्यवस्था लावून दिली. स्वराज्याचे सुराज्य केले. महाराजांनी आपल्या कर्तृत्वाने नूतन सृष्टीच निर्माण केली. स्वराज्यस्थापनेसाठीचा संघर्ष करताना महाराज स्वतः अनेक मोठ्या धोक्यांना सामोरे गेले. अफजलखान भेटीचा प्रसंग, पन्हाळ्याचा वेढा, शायिस्ताखानावरील छापा, आग्र्यातून करून घेतलेली सुटका हे सर्व प्रसंग मोठ्या जोखमीचे होते. शिवाजीमहाराजांनी या सर्व प्रसंगांवर यशस्वी मात केली. त्यातून ते सुखरूपपणे बाहेर पडले.

**संघटनचातुर्य :** स्वराज्यकार्यासाठी महाराजांनी आपल्या सभोवतालच्या लोकांना प्रेरित केले. महाराजांकडे विलक्षण संघटनचातुर्य होते. त्या चातुर्याच्या जोरावर त्यांनी आपल्याभोवती शूर व जिवास जीव देणारे लोक गोळा केले. स्वराज्याच्या कार्यात महाराजांच्या या सहकाऱ्यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता आपले कर्तव्य पार पाडले. अफजलखान भेटीच्या प्रसंगी अत्यंत धोक्याच्या क्षणी बडा सय्यद यास ठार करणारा जिवा महाला, विशाळगडाकडे जाणाऱ्या शत्रूची वाट रोखून धरणारा बाजीप्रभू देशपांडे, पुरंदरचा किल्ला लढवणारा मुरारबाजी देशपांडे, सिंहगड जिंकण्यासाठी धारातीर्थी पडलेला तानाजी मालुसरे, महाराजांच्या आग्र्याहून सुटकेप्रसंगी मोठी जोखीम स्वीकारणारा हिरोजी फर्जंद अशी अनेक उदाहरणे स्वराज्य उभारणीच्या कार्यात आढळतात. महाराज आपल्या सहकाऱ्यांची काळजी घेत असत. उदा., स्वराज्यस्थापनेच्या

कार्यात कान्होजी जेधे हे महाराजांबरोबर आरंभापासून होते. उतारवयी ते आजारी पडले. त्या वेळी महाराजांनी कान्होजी जेधेंना असे सांगितले, की 'त्यांनी औषधोपचारात कोणत्याही प्रकारची हयगय करू नये.'

**रयतेची काळजी :** स्वराज्यस्थापनेच्या कार्यात महाराजांचा शत्रूशी संघर्ष चाललेला होता. शत्रूंच्या स्वाऱ्यांमुळे प्रजा त्रस्त होत असे. अशा वेळी रयतेची जास्तीत जास्त काळजी घेण्याचा महाराजांचा प्रयत्न असे. शायिस्ताखानाच्या स्वारीच्या वेळी महाराजांनी रोहिडखोऱ्याच्या देशमुखास रयतेच्या संबंधी आपले कर्तव्य पार पाडण्याविषयी ताकीद दिली. त्यांनी त्या देशमुखास गावोगाव हिंडून घाटाखाली जेथे सुरक्षित जागा असेल तेथे लोकांना नेण्यास सांगितले. या कार्यास 'एका घडीचा दिरंग न करणे' असे त्यास बजावले. पुढे महाराज देशमुखास बजावतात, की 'जर रयतेची अशी काळजी घेतली नाही तर मुघल सैन्य येईल, लोकांना कैद करेल आणि त्याचे पाप तुमच्या माथी बैसेल.' आपल्या सैनिकांकडून रयतेला त्रास होऊ नये अशी काळजी ते घेत असत.

**लष्करविषयक धोरण :** महाराजांच्या लष्कराची शिस्त कडक होती. सैन्यास वेळच्या वेळी वेतन दिले जावे, याबाबत महाराजांचा कटाक्ष होता. त्यांनी सैनिकांना वेतन रोख रकमेमध्ये देण्याची व्यवस्था केली. मध्ययुगीन भारतात ठिकठिकाणच्या राजवटींमध्ये आणि इतरत्र सैन्याच्या वेतनासाठी जहागीर देण्याची पद्धती होती. महाराजांनी ही पद्धत त्याज्य ठरवली. महाराजांच्या मोहिमा जेव्हा शत्रूच्या प्रदेशात जात, तेव्हा सैन्यास जे काही मिळेल ते सर्व सरकारात जमा करण्यासंबंधीची लष्करास ताकीद होती. लढाईत मिळालेला ऐवज कोणी लपवून ठेवला, तर त्यास कडक शासन केले जाई. मोहिमेमध्ये पराक्रम केल्याबद्दल सैनिकांचा मानसन्मान केला जात असे. लढाईत जे सैनिक मृत्यू पावत त्यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाची काळजी ते घेत असत.

लढाईत शरण आलेल्या शत्रू सैनिकांना किंवा कैद झालेल्या सैनिकांना ते चांगली वागणूक देत असत.

**सहिष्णू धोरण :** महाराजांना आदिलशाह, मुघल, सिद्दी या शत्रूंशी संघर्ष करावा लागला. या सत्ता इस्लामी होत्या. त्यांच्याशी संघर्ष करताना महाराजांनी स्वराज्यातील मुसलमानांना आपले प्रजाजन मानले. अफजलखानाच्या भेटीच्या वेळी महाराजांच्या सैन्यात सिद्दी इब्राहीम हा विश्वासू सेवक होता. सिद्दी हिलाल हा महाराजांच्या सैन्यातील सरदार होता. स्वराज्याच्या आरमारात दौलतखान हा महत्त्वाचा अधिकारी होता.

महाराजांचे धार्मिक धोरण सहिष्णू होते. महाराजांनी आदिलशाहीतील जो प्रदेश जिंकून घेतला, त्या प्रदेशातील मुस्लिम धर्मस्थळांना पूर्वी ज्या सवलती चालू होत्या, त्या त्यांनी तशाच पुढे चालू ठेवल्या. महाराजांच्या सहिष्णू धार्मिक धोरणाबद्दल तत्कालीन इतिहासकार खाफिखान लिहितो, 'शिवाजीने आपल्या सैनिकांसाठी असा सक्त नियम केला होता, की मोहिमेवर असताना त्यांनी मशिदीला धक्का लावू नये. कुरआनची एखादी प्रत हाती पडल्यास तिला पूज्यभाव दाखवून ती मुसलमान व्यक्तीच्या स्वाधीन करावी.'

**स्वातंत्र्याची प्रेरणा :** महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नांना एक वेगळे मूल्य आहे. ते मूल्य स्वातंत्र्याचे आहे. दुसऱ्या कोणत्याही सत्तेचे वर्चस्व न मानता आपले स्वतंत्र व सार्वभौम अस्तित्व ठेवणे, हा हेतू त्यामागे आहे. परकीय सत्तांच्या विरोधात संघर्ष करताना महाराजांनी स्वातंत्र्याची प्रेरणा इतरांनाही दिली. मुघलांच्या सेवेत असलेला छत्रसाल जेव्हा महाराजांना भेटला, तेव्हा त्यांनी त्यास बुंदेलखंडात स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची प्रेरणा दिली.

**महाराजांच्या कार्याची थोरवी :** आपल्या राष्ट्रीय चळवळीमध्ये महाराज हे एक मोठे प्रेरणास्थान होते. महात्मा जोतीराव फुले यांनी समतेच्या संघर्षामध्ये पोवाड्याद्‌वारे महाराजांची महती सांगितली. लोकमान्य टिळक यांनी राष्ट्रीय जागृतीसाठी शिवजयंती उत्सव सुरू केला. शिवचरित्राची महती सांगणारे पुस्तक लाला लजपतराय यांनी लिहिलेले आहे. तमीळ काव्याचे पितामह सुब्रमण्यम् भारती यांनी शिवाजीमहाराज हे आपल्या सहकाऱ्यांना उद्‌देशून बोलत आहेत, असा प्रसंग कल्पून काव्यरचना केली आहे. विश्वकवी रवींद्रनाथ टागोर यांनी महाराजांवर एक दीर्घ कविता लिहिली आहे. महाराजांच्या राज्यसाधनेच्या प्रयत्नांकडे ते 'थोर ध्येयसाधनेचे प्रयत्न' म्हणून पाहतात. पं. जवाहरलाल नेहरू यांनी महाराजांबद्‌दल असे म्हटले आहे, की 'महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हते, तर ते साऱ्या राष्ट्राचे होते... त्यांचे आपल्या देशावर फार प्रेम होते आणि मानवी सद्‌गुणांचे ते साक्षात प्रतीक होते'. भारतातील सर्व भाषांमध्ये महाराजांची प्रेरणा आणि आदर्श सांगणारे साहित्य निर्माण झालेले आहे.

शिवाजीमहाराजांची ही स्वराज्यकार्याची आणि त्याचे सुराज्यात रूपांतर करण्याची प्रेरणा भावी पिढ्यांनाही आदर्श राहील. शिवाजीमहाराज हे एक थोर राष्ट्रपुरुष होते.

## स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) शिवाजीमहाराजांनी ................ यास बुंदेलखंडात स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची प्रेरणा दिली.

(आ) स्वराज्याच्या आरमारात ......... हा महत्त्वाचा अधिकारी होता.

(इ) शिवचरित्राची महती सांगणारे पुस्तक .......... यांनी लिहिले.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) महाराष्ट्रावर कोणकोणत्या सत्तांचे वर्चस्व होते?

(आ) रोहिडखोऱ्याच्या देशमुखास शिवाजीमहाराजांनी कोणती ताकीद दिली?

(इ) शिवाजीमहाराजांची कोणती प्रेरणा भावी पिढ्यांना आदर्श राहील?


३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) महाराजांच्या सहिष्णू धार्मिक धोरणाबद्दल खाफिखानाने काय लिहिले आहे?

(आ) शिवाजीमहाराजांविषयी पं. जवाहरलाल नेहरूंनी काय म्हटले आहे?

**उपक्रम**

विश्वकवी रवींद्रनाथ टागोर यांनी शिवाजीमहाराजांचा गौरव केलेली कविता मिळवून ती वर्गात लावा.



विजयदुर्ग

# १६. मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर मुघल बादशाह औरंगजेब दक्षिणेत चालून आला. मराठ्यांनी छत्रपती संभाजीमहाराज, छत्रपती राजाराममहाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्यरक्षणासाठी मुघलांशी प्रखर लढा दिला. या लढ्याला मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम असे म्हणतात. या संग्रामात अनेक अडचणींवर मात करून मराठे विजयी झाले. स्वातंत्र्यसंग्राम हे मराठ्यांच्या इतिहासातील एक रोमहर्षक व तेजस्वी पर्व आहे. त्याचा अभ्यास आपण या पाठात करणार आहोत.

**छत्रपती संभाजीमहाराज :** शिवाजीमहाराजांनंतर संभाजीमहाराज हे छत्रपती झाले. त्या वेळी मराठ्यांचा मुघलांशी संघर्ष चालू होता. औरंगजेबाचा मुलगा शाहजादा अकबर याने पित्याविरुद्ध बंड केले. हे बंड बादशाहाने मोडून काढले. अकबर दक्षिणेत संभाजीमहाराजांच्या आश्रयाला आला. अकबराचे पारिपत्य करण्यासाठी बादशाह स्वतः इ.स. १६८२ मध्ये दक्षिणेत आला. त्याच्याबरोबर अफाट सैन्य, प्रभावी तोफखाना होता. बादशाहाने जंजिऱ्याच्या



छत्रपती संभाजीमहाराज

सिद्दीला मराठ्यांच्या विरुद्ध मोहीम हाती घेण्यास सांगितले. पोर्तुगिजांनाही आपल्यां बाजूला वळवून घेतले. यामुळे संभाजीमहाराजांवर एकाच वेळी अनेक शत्रूंना तोंड देण्याचा प्रसंग आला.

**सिद्दी व पोर्तुगिजांच्या विरुद्ध मोहीम :** जंजिऱ्याचा सिद्दी मराठी मुलखाला उपद्रव देत असे. संभाजीमहाराजांनी त्याच्या विरुद्ध मोहीम उघडली. मराठ्यांनी सिद्दीच्या ताब्यातील दंडाराजपुरी या किल्ल्याला वेढा घातला व जंजिऱ्यावरही तोफांचा भडिमार केला. त्याच वेळी मुघलांचे सैन्य स्वराज्यावर चालून आले. त्यामुळे जंजिऱ्याची मोहीम अर्धवट सोडून संभाजीमहाराजांना माघारी फिरावे लागले.

गोव्याच्या पोर्तुगिजांनी संभाजीमहाराजांच्या विरुद्ध बादशाहाशी हातमिळवणी केली होती. त्यामुळे त्यांनी पोर्तुगिजांना धडा शिकवण्याचे ठरवले. त्यांनी पोर्तुगिजांच्या चौल बंदरावर हल्ला केला. प्रत्युत्तर म्हणून पोर्तुगिजांनी गोव्याच्या सीमेवरील मराठ्यांच्या फोंडा किल्ल्यास वेढा घातला. मराठ्यांनी वेढा मोडून काढला. गोव्यावर चढाई केली. पोर्तुगीज मोठ्या संकटात सापडले. त्याच वेळी मुघलांनी दक्षिण कोकणवर आक्रमण केल्याची बातमी संभाजीमहाराजांना मिळाली. त्यामुळे हाताशी आलेला गोव्याचा विजय सोडून त्यांना मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी परतावे लागले.

**आदिलशाही व कुतुबशाहीचा शेवट :** औरंगजेबाला मराठ्यांविरुद्ध मोहिमेत यश येत नव्हते. त्याने मराठ्यांविरुद्धची मोहीम स्थगित केली. आपला मोर्चा आदिलशाही व कुतुबशाही राज्यांकडे वळवला. बादशाहाने ही राज्ये जिंकून घेतली.

विजापूर व गोवळकोंडा या दोन्ही राज्यांची संपत्ती व लष्कर मुघलांच्या हाती आल्यामुळे बादशाहाची स्थिती मजबूत झाली. त्यानंतर मराठ्यांचा पाडाव करण्यावर बादशाहाने आपली सर्व शक्ती केंद्रित केली. मराठी प्रदेशावर चोहोबाजूंनी हल्ले चढवले. मुघल सेनेचा प्रतिकार

करताना मराठ्यांचा सेनापती हंबीरराव मोहिते मारला गेला. त्यामुळे संभाजीमहाराजांची लष्करी बाजू कमकुवत झाली.

**संभाजीमहाराजांचा मृत्यू :** औरंगजेबाने मुकर्रबखान याची नेमणूक कोल्हापूर प्रांतावर केली होती. संभाजीमहाराज कोकणातील संगमेश्वर येथे असल्याची बातमी मुकर्रबखानास कळली, तेव्हा त्याने छापा घालून संभाजीमहाराजांना पकडले. बादशाहाच्या हुकुमाने ११ मार्च १६८९ रोजी अत्यंत अमानुषपणे छत्रपती संभाजीमहाराजांना ठार करण्यात आले. स्वाभिमान न सोडता अत्यंत धीरोदात्तपणे मराठ्यांचा हा छत्रपती मृत्यूला सामोरा गेला. संभाजीमहाराज शूर व पराक्रमी होते. त्यांनी संस्कृतमध्ये 'बुधभूषण' हा राजनीतिपर ग्रंथ रचला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी नऊ वर्षे सामर्थ्यशाली मुघल सत्तेशी झुंज दिली.


छत्रपती राजाराममहाराज

**छत्रपती राजाराममहाराज :** संभाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर मराठी राज्य जिंकून घेण्याचे आपले स्वप्न साकार होणार, असे औरंगजेबाला वाटू लागले. आपल्या छत्रपतींची बादशाहाने ज्या अमानुषपणे हत्या केली, त्यामुळे मराठे अधिक जिद्दीने पेटून उठले. त्यांनी संभाजीमहाराजांचा धाकटा भाऊ राजाराममहाराजांना छत्रपती केले. स्वराज्यरक्षणासाठी मुघलांशी निकराचा लढा देण्यासाठी ते सज्ज झाले.

बादशाहाने रायगडाला वेढा घालण्यासाठी झुल्फिकारखान यास पाठवले. त्या वेळी राजाराममहाराज व महाराणी ताराबाई, संभाजीमहाराजांची

पत्नी येसूबाई व पुत्र शाहू हे रायगडावरच होते. या सर्वांनी एकाच ठिकाणी राहणे धोक्याचे होते, तेव्हा राजाराममहाराजांनी रायगडाच्या वेढ्यातून बाहेर पडावे व आवश्यकता भासल्यास दूरवर जिंजीला जावे व महाराणी येसूबाईंच्या नेतृत्वाखाली रायगड लढवावा, असे धोरण ठरवण्यात आले.

**राजाराममहाराजांचे जिंजीला प्रयाण :** ५ एप्रिल १६८९ रोजी राजाराममहाराज आपल्या काही सहकाऱ्यांसह रायगडाच्या वेढ्यातून निसटले. त्यांनी दक्षिणेत जिंजीला जाण्याचा निर्णय घेतला. जिंजी हे ठिकाण आजच्या तमिळनाडू राज्यात आहे. जिंजीचा किल्ला अभेद्य होता. हा किल्ला जिंकून घेणे मुघलांना सोपे नव्हते. प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ, रूपाजी भोसले इत्यादी विश्वासू लोकांना बरोबर घेऊन राजाराममहाराज जिंजीला पोहोचले. त्यामुळे स्वातंत्र्यलढा जिंजीपर्यंतच्या विस्तृत प्रदेशात पसरला.

**मराठ्यांच्या हालचाली :** मुघल सामर्थ्यापुढे रायगड दीर्घ काळ लढवणे कठीण होते. मुघलांनी नोव्हेंबर १६८९ मध्ये रायगड ताब्यात घेतला आणि महाराणी येसूबाई व शाहू यांना कैद केले. जिंजीला जाताना राजाराममहाराजांनी मुघलांविरुद्धच्या संघर्षाची जबाबदारी रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यावर सोपवली होती.

मराठ्यांच्या दृष्टीने परिस्थिती आणीबाणीची होती. औरंगजेबाने अनेक मराठी सरदारांना वतने व जहागिरी देऊन आपल्या बाजूला वळवून घेतले होते. बादशाहाला शह देण्यासाठी राजाराममहाराजांनीही तेच तंत्र वापरले. मराठी सरदारांनी मुघल प्रदेश जिंकल्यास त्या प्रदेशाची जहागीर त्या सरदारांस दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. छत्रपतींच्या या आश्वासनामुळे अनेक पराक्रमी सरदार पुढे आले. त्यांनी मुघल प्रदेशावर

धडाक्याने आक्रमणाला सुरुवात केली. मुघल सेनानींना पराभूत केले. या पराक्रमात संताजी व धनाजी आघाडीवर होते. त्यांचे अनपेक्षित हल्ले व गनिमी कावा या युद्धतंत्रापुढे मुघलांना आपल्या प्रचंड साधनसामग्रीचा व अवजड तोफखान्याचा उपयोग करणे कठीण झाले. मराठ्यांनी मुघलांना सळो की पळो करून सोडले. एकदा तर संताजी घोरपडे व विठोजी चव्हाण यांनी बादशाहाच्या छावणीवर अचानक हल्ला करून त्याच्या तंबूवरील सोन्याचा कळस कापून नेला.

**जिंजीला वेढा :** रायगड ताब्यात घेतल्यावर बादशाहाने झुल्फिकारखानाला दक्षिणेस जिंजीच्या स्वारीवर पाठवले. त्याने जिंजीला वेढा घातला. मराठ्यांनी जिंजीचा किल्ला जवळ जवळ आठ वर्षे निकराने लढवला. संताजी व धनाजी यांनी वेढा घातलेल्या मुघल सेनेवर बाहेरून प्रखर हल्ले चढवले. राजाराममहाराज वेढ्यातून बाहेर पडले. त्यानंतर झुल्फिकारखानाने जिंजीचा किल्ला जिंकून घेतला.

राजाराममहाराज महाराष्ट्रात परत आल्यामुळे मराठ्यांचा जोर आणखीनच वाढला. त्यांनी मुघलांच्या ताब्यातील खानदेश, वऱ्हाड, बागलाण या प्रदेशांवर हल्ले चढवले. अल्पशा आजाराने राजाराममहाराजांचे मार्च १७०० मध्ये सिंहगडावर निधन झाले.

**महाराणी ताराबाई :** राजाराममहाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांविरुद्धचा संघर्ष थांबेल असे औरंगजेबाला वाटले; परंतु राजाराममहाराजांची कर्तबगार पत्नी महाराणी ताराबाईंनी आपल्या सरदारांच्या साहाय्याने स्वातंत्र्यलढा नेटाने पुढे चालू ठेवला. सामर्थ्यशाली मुघल सत्तेविरुद्ध महाराणी ताराबाईंनी दिलेला लढा स्फूर्तिदायी आहे. खाफिखान या समकालीन मुघल इतिहासकाराने महाराणी ताराबाईंचे वर्णन 'बुद्धीमान व शहाणी' स्त्री असे केले आहे. महाराणी ताराबाईंच्या

पराक्रमाचे वर्णन समकालीन मराठी कवी देवदत्त याने पुढील शब्दांत केले आहे - 'दिल्ली झाली दीनवाणी । दिल्लीशाचे गेले पाणी । ताराबाई रामराणी । भद्रकाली कोपली ॥' अशा प्रकारे छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पराक्रमाचा वारसा महाराणी ताराबाईंनी पुढे चालवला.



महाराणी ताराबाई

खंडेराव दाभाडे याने मुघलांना पराभूत करून गुजरातेत अहमदाबादपर्यंत धडक मारली. नेमाजी शिंदे याने नर्मदा ओलांडून माळव्यात मुसंडी मारून मुघलांना जेरीस आणले. मराठ्यांच्या या आक्रमक चढायांमुळे औरंगजेब बादशाह हताश झाला. सतत पंचवीस वर्षे मुघल-मराठे संघर्ष चालू होता. मराठ्यांचा पाडाव करणे मुघलांना जमले नाही. अशा परिस्थितीत औरंगजेब बादशाहाचा १७०७ मध्ये अहमदनगर येथे मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूबरोबरच मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम समाप्त झाला.

मराठ्यांचा हा स्वातंत्र्यसंग्राम म्हणजे भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व होय. मुघल सत्ताधीशांची साम्राज्याची लालसा आणि मराठी जनतेची स्वातंत्र्याची आकांक्षा यांच्यातील हा लढा होता. त्यात मराठ्यांचा विजय झाला.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) औरंगजेबाने ........... याची नेमणूक कोल्हापूर प्रांतावर केली होती.

(आ) जंजिऱ्याचा ............. मराठी मुलखाला उपद्रव देत असे.

(इ) संभाजीमहाराजांनी ..........हा राजनीतिपर ग्रंथ रचला.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) संभाजीमहाराजांना जंजिऱ्याची मोहीम अर्धवट सोडून माघारी का फिरावे लागले?

(आ) संभाजीमहाराजांनी पोर्तुगिजांना धडा शिकवण्याचे का ठरवले?

(इ) राजाराममहाराजांनी जिंजीला जाताना स्वराज्याच्या रक्षणाची जबाबदारी कोणावर सोपवली?

(ई) महाराणी ताराबाईंच्या पराक्रमाचे वर्णन देवदत्त या कवीने कोणत्या शब्दांत केले आहे?

३. **तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) औरंगजेबाने आपला मोर्चा आदिलशाही व कुतुबशाही राज्यांकडे का वळवला?

(आ) संभाजीमहाराजांनंतर मुघलांशी निकराचा लढा देण्यासाठी मराठे सज्ज का झाले?

(इ) महाराणी येसूबाईंच्या नेतृत्वाखाली रायगड लढवावा, असे धोरण का ठरवण्यात आले?


### उपक्रम

भारताच्या नकाशात गोवा, विजापूर, गोवळकोंडा, जिंजी, अहमदाबाद, अहमदनगर ही ठिकाणे दाखवा.

# १७. मराठी सत्तेचा विस्तार

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या आरंभी मुघल सत्ता आक्रमक होती, तर मराठ्यांचे धोरण बचावाचे होते. स्वातंत्र्ययुद्धाच्या अखेरीस मात्र परिस्थिती उलट झाली. मराठ्यांनी चढाईचे आणि मुघलांनी बचावाचे धोरण स्वीकारले. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठ्यांनी मुघल सत्तेला नमवून जवळजवळ भारतभर आपला सत्ताविस्तार केला. त्याचा अभ्यास आपण या पाठात करणार आहोत.

**शाहूमहाराजांची सुटका :** औरंगजेब बादशाहाच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्ये दिल्लीच्या गादीसाठी संघर्ष सुरू झाला. शाहजादा आझमशाह हा दक्षिणेत होता. बादशाही तख्त हस्तगत करण्यासाठी तो त्वरेने दिल्लीला निघाला. राजपुत्र शाहू त्याच्या ताब्यात होता. शाहूमहाराजांना कैदेतून सोडल्यास महाराणी ताराबाई व शाहूमहाराज यांच्यात छत्रपतींच्या गादीसाठी कलह होईल, मराठ्यांचे सामर्थ्य खच्ची होईल असे आझमशाहाला वाटले, म्हणून त्याने शाहूमहाराजांची सुटका केली.



छत्रपती शाहूमहाराज

**शाहूमहाराजांचा राज्याभिषेक :** कैदेतून सुटका झाल्यावर शाहूमहाराजांनी महाराष्ट्राकडे कूच केले. त्यांना काही मराठी सरदार येऊन

मिळाले परंतु; महाराणी ताराबाईंनी शाहूमहाराजांचा छत्रपतिपदावरील हक्क मान्य केला नाही. पुणे जिल्ह्यात भीमा नदीच्या काठी खेड येथे शाहूमहाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या सैन्यांमध्ये लढाई झाली. या लढाईत शाहूमहाराजांचा विजय झाला. त्यांनी सातारा जिंकून घेतले. स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. सातारा ही मराठी राज्याची राजधानी झाली.

शाहूमहाराजांना असलेला महाराणी ताराबाईंचा विरोध चालू राहिला. इ.स. १७१० मध्ये महाराणी ताराबाईंनी पन्हाळगडावर आपला अल्पवयीन मुलगा दुसरा शिवाजी याच्या नावाने छत्रपतिपदाची घोषणा केली, तेव्हापासून मराठेशाहीत साताऱ्याच्या राज्याखेरीज कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

**बाळाजी विश्वनाथ :** शाहूमहाराजांची मुघलांच्या कैदेतून मुक्तता झाल्यावर त्यांची बाजू घेणाऱ्यांमध्ये बाळाजी विश्वनाथ भट हा प्रमुख होता. बाळाजी हा मूळचा कोकणातील श्रीवर्धन या गावचा. तो कर्तृत्ववान व अनुभवी होता. शाहूमहाराज हेच मराठी राज्याचे खरे वारस आहेत, हे पटवून देऊन अनेक मराठी सरदारांना त्याने शाहूमहाराजांकडे वळवले.

कान्होजी आंग्रे हा मराठी आरमाराचा प्रमुख होता. त्याने महाराणी ताराबाईंची बाजू घेतली. त्याने शाहूमहाराजांच्या मुलखावर हल्ले केले. शाहूमहाराजांसमोर कठीण परिस्थिती निर्माण झाली. या परिस्थितीमध्ये त्यांनी बाळाजीला पेशवा केले. त्यास कान्होजीविरुद्ध पाठवले. बाळाजीने युद्ध टाळून मुत्सद्देगिरीने कान्होजीस शाहूमहाराजांकडे वळवले.

**चौथाई-सरदेशमुखीच्या सनदा :** शाहूमहाराजांचे आसन महाराष्ट्रात बळकट केल्यानंतर बाळाजीने आपले लक्ष उत्तरेकडील राजकारणाकडे वळवले. औरंगजेब बादशाहाच्या मृत्यूनंतर दिल्ली दरबारात दुही व गोंधळ निर्माण झाला होता. तेथे सय्यिद बंधू अब्दुल्ला

(हसन) व हुसैन अली यांचे वर्चस्व निर्माण झाले होते. त्यांच्या मदतीने बाळाजीने इ. स. १७१९ मध्ये मुघल बादशाहाकडून दख्खनच्या मुघल प्रदेशातून चौथाई-सरदेशमुखी वसूल करण्याच्या सनदा मिळवल्या. या सनदांमुळे मराठ्यांना दक्षिणेतील मुघल प्रदेशातून महसुली उत्पन्नाचा एक चतुर्थांश भाग (चौथाई) व एक दशांश भाग (सरदेशमुखी) गोळा करण्याचे हक्क मिळाले.

**पहिला बाजीराव :** शाहूमहाराजांनी बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा पहिला बाजीराव याची पेशवेपदी नेमणूक केली. बाजीरावाने आपल्या कारकिर्दीमध्ये निजामाला नामोहरम केले. माळवा आणि बुंदेलखंडामध्ये मराठी सत्तेचा विस्तार केला. दिल्लीवर स्वारी करून मुघल सत्तेला हादरा दिला. पोर्तुगिजांचा पराभव करून त्यांच्याकडून वसईचा किल्ला जिंकून घेतला.


पहिला बाजीराव

**निजामाचा पालखेड येथे पराभव :** निजाम-उल्-मुल्क हा इ. स. १७१३ मध्ये दक्षिणचा मुघल सुभेदार म्हणून आला. बादशाहाने मराठ्यांना दक्षिणेच्या मुघल सुभ्यांतून चौथाई-सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार दिले होते. याला निजामाचा विरोध होता. त्याने कोल्हापूरच्या छत्रपती संभाजीमहाराजांना हाताशी धरून पुणे परगण्याचा काही भाग जिंकून घेतला. बाजीरावाने निजामाला शह देण्याचे ठरवले. त्याने

निजामाचा औरंगाबादजवळ पालखेड येथे पराभव केला. निजामाने मराठ्यांचा चौथाई-सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मान्य केला. त्याने कोल्हापूरच्या संभाजीमहाराजांचे समर्थन न करण्याचे मान्य केले.

कोल्हापूरच्या संभाजीमहाराजांनी शाहूमहाराजांना विरोध करण्याचे धोरण चालूच ठेवले, तेव्हा शाहूमहाराजांनी संभाजीमहाराजांविरुद्ध मोहीम काढून त्यांना पराभूत केले. इ. स. १७३१ मध्ये त्यांच्यात वारणा नदीच्या काठी तह झाला. वारणा नदी ही सातारा व कोल्हापूर या राज्यांतील सीमा ठरली.

मुघल सत्ता कमकुवत झालेली असल्याने उत्तरेला सत्ताविस्तार करण्यास अधिक वाव आहे, हे बाजीरावाने ओळखले होते. शाहूमहाराजांनी त्याच्या धोरणाला पाठिंबा दिला.

**माळवा व बुंदेलखंड :** बाजीरावाने आपला भाऊ चिमाजीआप्पा याच्या नेतृत्वाखाली मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व उदाजी पवार यांना माळव्यात पाठवले. तेथे त्यांनी आपली ठाणी मजबूत केली.

बुंदेलखंडात छत्रसाल राजाने आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले होते. अलाहाबादचा मुघल सुभेदार महंमदखान बंगश याने बुंदेलखंडावर हल्ला केला. त्याने छत्रसालास पराभूत केले. छत्रसालाची कोंडी केली. छत्रसालाने बाजीरावाला मदतीची विनंती केली. बाजीराव मोठी फौज घेऊन बुंदेलखंडात गेला. त्याने बंगशाला पराभूत केले. छत्रसालाने बाजीरावाचा मोठा सन्मान केला. अशा रीतीने माळवा व बुंदेलखंडात मराठ्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

बाजीरावाने बादशाहाकडे माळव्याच्या सुभेदारीची व खंडणीची मागणी केली. बादशाहाने ही मागणी अमान्य केली, म्हणून बाजीरावाने मार्च १७३७ मध्ये दिल्लीवर स्वारी केली. मुघलांना आश्चर्यचकित केले.

**भोपाळची लढाई :** बाजीरावाच्या दिल्ली स्वारीमुळे बादशाह अस्वस्थ झाला. निजामाने मुघल सत्तेच्या रक्षणासाठी जाण्याचे ठरवले. निजाम दिल्लीला गेला. बादशाहाने निजामास सर्व प्रकारची मदत देऊ केली. त्यानंतर निजाम भोपाळला आला. बाजीरावाने निजामाच्या सैन्याची भोपाळच्या किल्ल्यामध्ये नाकेबंदी केली. निजाम शरण आला. त्याने मराठ्यांना माळव्याच्या सुभेदारीची सनद बादशाहाकडून मिळवून देण्याचे मान्य केले.

**पोर्तुगिजांचा पराभव :** कोकण किनारपट्टीवरील वसई, ठाणे हे भाग पोर्तुगिजांच्या ताब्यात होते. पोर्तुगीज सत्ताधीश प्रजेवर जुलूम करत. बाजीरावाने आपला भाऊ चिमाजीआप्पा यास पोर्तुगिजांचे पारिपत्य करण्यासाठी पाठवले. चिमाजीने ठाणे व आसपासचा प्रदेश जिंकून घेतला. त्यानंतर इ. स. १७३९ मध्ये त्याने वसईच्या किल्ल्याला वेढा घातला. किल्ला अतिशय मजबूत होता. पोर्तुगिजांजवळ प्रभावी तोफा होत्या, तरीही चिमाजीने चिकाटीने वेढा चालवून पोर्तुगिजांना शरण येण्यास भाग पाडले. वसईचा किल्ला व पोर्तुगिजांचा बराचसा मुलूख मराठ्यांच्या ताब्यात आला.

**बाजीरावाचा मृत्यू :** इराणचा बादशाह नादिरशाह याने भारतावर स्वारी केली. शाहूमहाराजांच्या आज्ञेने मुघल बादशाहीच्या रक्षणासाठी बाजीराव मोठी फौज घेऊन उत्तरेला निघाला. तो बऱ्हाणपूरला पोहोचला, तोपर्यंत नादिरशाह दिल्लीतून प्रचंड संपत्ती लुटून मायदेशी परत गेला होता. एप्रिल १७४० मध्ये नर्मदाकाठी रावेरखेडी येथे बाजीरावाचा मृत्यू झाला.

बाजीराव हा एक उत्तम सेनानी होता. आपल्या पराक्रमाने बाजीरावाने उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले. त्याने मराठी सत्तेला अखिल भारतीय पातळीवरील एक प्रबळ सत्ता म्हणून स्थान मिळवून दिले.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) छत्रपती शाहूमहाराजांनी .......... येथे स्वत:स राज्याभिषेक करवून घेतला.

(आ) इराणचा बादशाह.......... याने भारतावर स्वारी केली.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुघल बादशाहाकडून बाळाजीने कोणत्या सनदा मिळवल्या?

(आ) छत्रसालाने बाजीरावाला मदतीची विनंती का केली?

(इ) मराठ्यांच्या कोणत्या अधिकाराला निजामाचा विरोध होता?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) बाळाजी विश्वनाथाने कान्होजीस शाहूमहाराजांच्या बाजूस कसे वळवले?

(आ) बाजीरावाने मार्च १७३७ मध्ये दिल्लीवर स्वारी का केली?

४. **कारणे लिहा.**

(अ) आझमशाहाने शाहूमहाराजांची सुटका केली.

(आ) बाजीरावाने चिमाजीआप्पा यास पोर्तुगिजांचे पारिपत्य करण्यासाठी पाठवले.

# १८. पानिपतचे तिसरे युद्ध

बाजीरावानंतर बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब हा पेशवा झाला. नादिरशाहाच्या आक्रमणानंतर दिल्लीमध्ये अस्थिरता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत उत्तरेमध्ये मराठ्यांची सत्ता स्थिर करण्यासाठी नानासाहेब पेशव्याने प्रयत्न केले. अहमदशाह अब्दालीने पानिपतावर मराठ्यांच्या समोर आव्हान निर्माण केले. या सर्व घडामोडींची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

**उत्तरेतील परिस्थिती :** अफगाणिस्तानातून आलेले पठाण हिमालयाच्या पायथ्याशी अयोध्येजवळ स्थायिक झाले होते. या पठाणांना रोहिले म्हणत. रोहिलखंड या नावाने हा प्रदेश ओळखला जातो. गंगा-यमुना नद्यांच्या दोआबाच्या प्रदेशात रोहिल्यांनी धुमाकूळ घातला होता. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी अयोध्येच्या नबाबाने मराठ्यांना पाचारण केले. मराठ्यांनी रोहिल्यांचा बंदोबस्त केला.

**अफगाणांशी संघर्ष :** अफगाणिस्तानचा बादशाह अहमदशाह अब्दाली याला भारतातील संपत्तीचे आकर्षण होते. इ. स. १७५२ मध्ये त्याने पंजाब जिंकून घेतला. मुघल प्रदेशात अंदाधुंदी निर्माण झाली होती. मुघलांना अब्दालीच्या आक्रमणाची भीती होती. या परिस्थितीत आपल्या संरक्षणासाठी मराठ्यांची मदत घेणे मुघलांना आवश्यक वाटले, म्हणून अयोध्येचा नबाब सफदरजंग याने मुघल बादशाहातर्फे मराठ्यांशी एक करार केला. या करारानुसार मराठ्यांनी रोहिले, जाट, राजपूत, अफगाण इत्यादी शत्रूंपासून मुघल सत्तेचे रक्षण करण्याचे मान्य केले. त्याच्या बदल्यात पंजाब, मुलतान, राजपुताना, सिंध, रोहिलखंड या भागातून मराठ्यांना चौथाई वसूल करण्याचे हक्क मिळाले.

नानासाहेब पेशव्याचा भाऊ रघुनाथराव हा जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर यांना बरोबर घेऊन उत्तर भारतात मोहिमेवर गेला. दिल्लीजवळील मथुरा हे जाटांच्या सत्तेचे केंद्र होते. तेथे सूरजमल जाट हा प्रमुख होता. रघुनाथरावाने जाटांच्या प्रदेशावर आक्रमण केले. त्यामुळे जाट दुखावले गेले.



पेशवा नानासाहेब

जयपूरचा राजा सवाई जयसिंग याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्ये जयपूरच्या गादीसाठी संघर्ष निर्माण झाला. त्यात मराठ्यांनी हस्तक्षेप केला. त्यामुळे राजपूत नाराज झाले, म्हणून पानिपतच्या लढाईत जाट व राजपूत यांनी मराठ्यांना मदत केली नाही.

**अटकेवर मराठ्यांचा ध्वज फडकला :** नजीबखान हा रोहिल्यांचा सरदार होता. उत्तर भारतातील मराठ्यांचे वर्चस्व त्याला सहन होत नव्हते. नजीबखानाच्या सांगण्यावरून अब्दालीने पुन्हा भारतावर स्वारी केली. त्याने दिल्ली जिंकून घेतली. मोठी लूट घेऊन तो अफगाणिस्तानात परत गेला. रघुनाथराव व मल्हारराव होळकर हे पुन्हा उत्तरेत गेले. त्यांनी दिल्ली घेतली. त्यानंतर अब्दालीच्या अधिकाऱ्यांना पिटाळून लावून पंजाब जिंकला. अब्दालीच्या सैनिकांचा पाठलाग करत मराठे इ. स. १७५८ मध्ये अटकेपर्यंत गेले. अटकेवर मराठ्यांचा ध्वज फडकला. अटक हे ठिकाण आजच्या पाकिस्तानमध्ये आहे. मराठ्यांनी अटकेपार पेशावरपर्यंत मोहीम काढली. मराठ्यांनी आपल्या




Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. The territorial waters of India extended into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. The responsibility rest with the publisher. © Government of India Copyright- 2008

प्रभुत्वाखाली आणलेल्या या प्रदेशाची व्यवस्था नीट लावली नाही.

**दत्ताजीचा पराक्रम :** पंजाबवरील पकड घट्ट करण्यासाठी व नजीबखानाचे पारिपत्य करण्यासाठी पेशव्याने दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांना उत्तरेत पाठवले. दत्ताजी उत्तरेत गेला. नजीबखानाने त्याला

वाटाघाटीत अडकवून ठेवले. अब्दालीशी संधान साधले. त्यास मदतीस येण्याची विनंती केली. नजीबखानाचा संदेश मिळताच अब्दाली पुन्हा भारतावर चालून आला. दत्ताजी व अब्दाली यांची यमुनेच्या तीरावर बुराडी घाट येथे गाठ पडली. जोरदार लढाई झाली. दत्ताजीने असामान्य शौर्य गाजवले. या लढाईत त्याला वीरमरण आले.

**सदाशिवरावभाऊची उत्तरेला रवानगी :** अब्दालीचे पारिपत्य करण्यासाठी नानासाहेबाने सदाशिवरावभाऊ यास उत्तरेला पाठवले. त्याच्याबरोबर प्रचंड फौज व प्रभावी तोफखाना होता. इब्राहिमखान गारदी हा तोफखान्याचा प्रमुख होता. नानासाहेबाचा थोरला मुलगा विश्वासराव व अनेक पराक्रमी मराठी सरदार या मोहिमेमध्ये होते.

**पानिपतचा संग्राम :** उत्तरेच्या मोहिमेत सदाशिवरावभाऊने दिल्ली जिंकून घेतली. मराठ्यांचे सैन्य आणि अब्दालीचे सैन्य पानिपत येथे समोरासमोर आले. १४ जानेवारी, १७६१ रोजी मराठ्यांनी अब्दालीवर हल्ला करून लढाईला सुरुवात केली. लढाईत विश्वासरावाला गोळी लागून तो ठार झाला. हे सदाशिवरावभाऊला समजताच तो बेभान होऊन शत्रूवर तुटून पडला. युद्धाच्या धुमश्चक्रीत तो दिसेनासा झाला. आपला नेता नाहीसा झालेला पाहून मराठी सैनिकांचा धीर खचला. त्याच वेळी अब्दालीच्या राखीव व ताज्या दमाच्या सैन्याने मराठ्यांवर हल्ला चढवला. मराठ्यांचा पराभव झाला. महाराष्ट्रातील एक सबंध तरुण पिढी गारद झाली. अनेक पराक्रमी सरदार धारातीर्थी पडले. परक्या अब्दालीला येथे राज्य करण्याचा कोणताच नैतिक हक्क नाही, अशी मराठ्यांची भूमिका होती. भारतीयांसाठी भारत अशी व्यापक भूमिका घेऊन मराठे पानिपतावर लढले.

**पेशवा माधवराव :** नानासाहेब पेशव्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा माधवराव हा पेशवेपदी आला. माधवरावाने आपल्या कारकिर्दीत निजाम व हैदरअली यांचा बंदोबस्त केला. त्याने उत्तरेमध्ये मराठ्यांचे प्रभुत्व पुन्हा प्रस्थापित केले.



पेशवा माधवराव

पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झालेला पाहून निजामाने पुन्हा मराठ्यांच्या विरोधात हालचाली सुरू केल्या. त्याने मराठी मुलखावर आक्रमण केले. माधवरावाने पैठणजवळील राक्षसभुवन येथे निजामाला पराभूत केले.

हैदरअलीने राजाला बाजूला सारून म्हैसूरचे राज्य बळकावले होते. पानिपतवरील मराठ्यांच्या पराभवाचा फायदा घेऊन त्याने कर्नाटकातील मराठी प्रदेशावर हल्ले केले. मराठ्यांनी श्रीरंगपट्टणजवळील मोतीतलाव येथील लढाईत त्याला पराभूत केले. त्याने तुंगभद्रा नदीच्या उत्तरेकडील प्रदेश मराठ्यांना देण्याचे मान्य केले.

**मराठी सत्तेच्या वर्चस्वाची पुनर्स्थापना :** पानिपतच्या पराभवामुळे मराठ्यांच्या उत्तर भारतातील प्रतिष्ठेला जबर धक्का पोहोचला होता. उत्तरेत मराठ्यांची सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी माधवरावाने महादजी शिंदे, तुकोजी होळकर, रामचंद्र कानडे व विसाजीपंत बिनीवाले या सरदारांना पाठवले. मराठी फौजांनी जाट, रोहिले व राजपूत यांना पराभूत केले. बादशाह शाहआलम यास आपल्या आश्रयाखाली दिल्लीच्या

तख्तावर बसवले. उत्तरेमध्ये मराठ्यांची सत्ता पुनर्स्थापित झाली. यामध्ये महादजी शिंदे याचा सिंहाचा वाटा होता.

इ. स. १७७२ मध्ये माधवराव पेशव्याचा मृत्यू झाला. मराठ्यांच्या इतिहासात एक प्रामाणिक, कष्टाळू, जिद्दीचा आणि लोकहितदक्ष असा शासक म्हणून त्याचा उल्लेख येतो. ग्रँट डफने माधवरावाबद्दल 'मराठी साम्राज्याचे पानिपतवरील लढाईमध्ये झाले नाही एवढे मोठे नुकसान माधवरावाच्या अकाली मृत्यूने झाले.' असे उद्गार काढले. या कर्तृत्ववान पेशव्याच्या मृत्यूमुळे मराठी राज्याची मोठी हानी झाली.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) दिल्लीजवळील .......... हे ठिकाण जाटांच्या सत्तेचे केंद्र होते.

(आ) माधवरावाने पैठणजवळील .......... येथे निजामाला पराभूत केले.

(इ) मराठ्यांनी श्रीरंगपट्टणजवळील मोतीतलाव येथील लढाईत .......... याला पराभूत केले.

२. **'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) अहमदशाह अब्दाली | (१) अयोध्येचा नवाब |
| (आ) इब्राहिमखान गारदी | (२) अफगाणिस्तानचा बादशाह |
| (इ) सफदरजंग | (३) मराठ्यांच्या तोफखान्याचा प्रमुख |
| | (४) भरतपूरचा राजा |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) राजपूत मराठ्यांवर नाराज का झाले?

(आ) पेशव्याने दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांना उत्तरेस का पाठवले?

(इ) मराठे पानिपतावर कोणत्या भूमिकेतून लढले?

४. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सफदरजंग याने मुघल बादशाहातर्फे मराठ्यांशी कोणता करार केला?

(आ) पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव का झाला?



**वसईचा किल्ला**

# १९. मराठी सत्तेचे आधारस्तंभ

भारतात मराठी सत्तेचा विस्तार करण्याच्या कामी अनेक मराठी सरदारांनी मोलाची कामगिरी बजावली. त्यांपैकी काही प्रमुख सरदारांच्या कामगिरीचा आढावा आपण या पाठात घेणार आहोत.



मल्हारराव होळकर

**इंदौरचे होळकर :** मल्हारराव हा इंदौरच्या होळकरांच्या सत्तेचा संस्थापक. मल्हाररावाने दीर्घ काळ मराठी राज्याची सेवा केली. गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीत तो निष्णात होता. थोरला बाजीराव व नानासाहेब पेशवा यांच्या काळात त्याने उत्तरेत पराक्रम गाजवला. माळव्यात आणि राजपुतान्यात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात त्याचा मोठा वाटा होता. पानिपतानंतर उत्तरेतील मराठ्यांची प्रतिष्ठा सावरण्यास माधवराव पेशव्यास त्याची फार मदत झाली.

मल्हाररावाच्या निधनानंतर पुण्यश्लोक अहिल्याबाईच्या हाती इंदौरच्या कारभाराची सूत्रे आली. अहिल्याबाईने सुमारे अठ्ठावीस वर्षे समर्थपणे राज्याचा कारभार करून उत्तरेत मराठी सत्तेची प्रतिमा



अहिल्याबाई होळकर

उंचावली. अहिल्याबाईने राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करून प्रजेला सुखी केले.

**नागपूरचे भोसले :** परसोजी भोसले हा छत्रपती शिवाजीमहाराजांच्या सेवेत होता. शाहूमहाराजांच्या काळात त्याला वऱ्हाड व गोंडवन या प्रदेशांची सनद देण्यात आली. नागपूरकर भोसल्यांपैकी रघूजी हा सर्वांत कर्तबगार व पराक्रमी पुरुष होता. त्याने दक्षिणेतील तिरुचिरापल्ली व अर्काट यांच्या आसपासचा प्रदेश मराठी सत्तेच्या वर्चस्वाखाली आणला. बंगाल, बिहार व उडीसा प्रांतांच्या चौथाईच्या वसुलीचे अधिकार शाहूमहाराजांनी रघूजीला दिले होते. त्याने ते प्रदेश मराठ्यांच्या प्रभावाखाली आणले.



रघूजी भोसले

**ग्वालियरचे शिंदे :** थोरल्या बाजीरावाने राणोजी शिंदे याचे कर्तृत्व हेरून त्याला उत्तरेत सरदार म्हणून नेमले. राणोजीच्या मृत्यूनंतर जयप्पा, दत्ताजी व महादजी या त्याच्या मुलांनीही पराक्रम गाजवून उत्तर भारतात मराठी सत्ता प्रबळ केली.

माधवराव पेशव्याने शिंदे घराण्याची सरदारकी महादजीस दिली. तो पराक्रमी आणि मुत्सद्दी होता. पानिपतच्या पराभवानंतर उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व आणि प्रतिष्ठा निर्माण करण्याची कामगिरी त्याने केली. उत्तर भारताच्या सपाट प्रदेशात मराठ्यांची गनिमी काव्याची युद्धपद्धती

उपयुक्त ठरणार नाही हे त्याने ओळखले. त्याने फ्रेंच लष्करी तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली आपली फौज प्रशिक्षित केली व तोफखाना सुसज्ज केला. या कवायती फौजेच्या बळावर त्याने रोहिले, जाट, राजपूत, बुंदेले इत्यादींना नमवले. इंग्रजांनाही धाकात ठेवले. दिल्लीच्या बादशाहाने त्याला 'नायब वकील-इ-मुत्लक' (बादशाहाचा प्रमुख प्रतिनिधी) हा किताब देऊन त्याचा गौरव केला. बादशाहाने त्याच्या हाती आपला प्रतिनिधी म्हणून कारभार सोपवला. कोसळणाऱ्या बादशाहीचा डोलारा सावरणे सोपे काम नव्हते. महादजीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मोठ्या जिद्दीने इ. स. १७८४ ते १७९४ या काळात दिल्लीचा कारभार पाहिला. दिल्लीच्या कारभाराची व्यवस्था लावून महादजी पुण्यात आला. महादजीचा पुण्याजवळ वानवडी येथे मृत्यू झाला.



महादजी शिंदे

शिंदे, होळकर व भोसले यांच्याप्रमाणे इतरही काही प्रमुख सरदारांनी मराठी राज्याची उल्लेखनीय सेवा केली.

शिवाजीमहाराजांनी उभारलेले आरमार कान्होजी व तुळाजी आंग्रे या पितापुत्रांनी प्रबळ बनवले. या प्रबळ आरमाराच्या जोरावर त्यांनी पोर्तुगीज, इंग्रज व सिद्दी या आरमारी सत्तांना धाकात ठेवले. मराठी राज्याच्या किनारपट्टीचे रक्षण केले.

खंडेराव दाभाडे व त्याचा पुत्र त्रिंबकराव यांनी गुजरातमध्ये मराठी

सत्तेची पायाभरणी केली. खंडेरावाच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी उमाबाईने अहमदाबादच्या मुघल सरदाराचे पारिपत्य केले. तेथील किल्ला जिंकून घेतला. पुढे गायकवाडांनी गुजरातमधील वडोदरा हे आपल्या सत्तेचे केंद्र केले. मध्यप्रदेशातील धार आणि देवासच्या पवारांनी शिंदे व होळकर यांना उत्तरेत मराठी सत्तेचा विस्तार करण्यात मोलाचे साहाय्य केले.

माधवराव पेशव्याच्या मृत्यूनंतर मराठी राज्याची घडी विस्कटली होती. ती पेशव्यांचा प्रसिद्ध कारभारी नाना फडणवीस या मुत्सद्द्याने महादजीच्या मदतीने व्यवस्थित बसवली. महादजी उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व स्थापण्यात गुंतलेला असताना नानाने दक्षिणेकडील राजकारणाची सूत्रे सांभाळली. या कार्यात पटवर्धन, हरिपंत फडके, रास्ते इत्यादी सरदारांनी त्याला साथ दिली. त्यामुळे मराठी सत्तेचे दक्षिणेत वर्चस्व स्थापन झाले.

उत्तर व दक्षिण भारतात मराठी सत्तेचा प्रभाव निर्माण करण्यात मराठे सरदार यशस्वी झाले. महादजी शिंदे आणि नाना फडणवीस यांच्या मृत्यूनंतर मराठी सत्तेला उतरती कळा लागली. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात मराठ्यांचा उत्तरेतील व दक्षिणेतील प्रभाव कमी होत गेला. मराठ्यांची जागा इंग्रजांनी घेतली. इ. स. १८१८ मध्ये मराठ्यांची सत्ता संपुष्टात आली. इंग्रजांनी सर्व भारत आपल्या अधिपत्याखाली आणला. भारताच्या इतिहासातील मध्ययुग संपले. आधुनिक कालखंडाला सुरुवात झाली.

## स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) मल्हारराव होळकर .......... युद्धपद्धतीत निष्णात होता.

(आ) गायकवाडांनी गुजरातमधील ............ हे आपल्या सत्तेचे केंद्र केले.

(इ) खंडेरावाच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी .......... हिने अहमदाबादच्या मुघल सरदाराचे पारिपत्य केले.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शाहूमहाराजांच्या काळात परसोजी भोसलेला कोणत्या प्रदेशांची सनद दिली?

(आ) बादशाहाने महादजीचा कोणता किताब देऊन गौरव केला?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) महादजी शिंदेने आपली फौज प्रशिक्षित का केली?

(आ) नाना फडणविसाने कोणती कामगिरी केली?

## जीवन-कौशल्ये शिक्षण (Life-skills Education)

जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे, यासाठी विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे 'जीवन-कौशल्ये शिक्षण' होय. हे साध्य होण्यासाठी जीवनाच्या प्राथमिक टप्प्यात विद्यार्थ्यांना संधी पुरवणे नितांत गरजेचे आहे. याखेरीज या शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या भौतिक व मानसिक क्षमतांच्या जास्तीत जास्त उपयोगातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवणे हेही एक उद्‌दिष्ट आहे. राष्ट्रीय व राज्यस्तरीय अभ्यासक्रमांतदेखील यास महत्त्वाचे स्थान दिले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) यासाठी पुढीलप्रमाणे दहा जीवन कौशल्ये पुरस्कृत केली आहेत.

१. **स्वजागृती** (Self awareness) : स्वत:च्या क्षमता, मर्यादा, आवडीनिवडी, आकांक्षा ओळखण्याचे कौशल्य.

२. **समानुभूती** (Empathy) : दुसऱ्याच्या भूमिकेत शिरून विचार करण्याचे कौशल्य.

३. **समस्या निराकरण** (Problem solving) : उपलब्ध पर्यायांतून योग्य व संभाव्य पर्याय निवडून कार्यवाही करण्याचे कौशल्य.

४. **निर्णय घेणे** (Decision making) : समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेत अनेक पर्याय शोधून त्यातील योग्य पर्याय स्वीकारण्याचे कौशल्य.

५. **प्रभावी संप्रेषण** (Effective communication) : आपले विचार शाब्दिक किंवा अशाब्दिक माध्यमातून प्रभावीपणे व्यक्त करण्याचे कौशल्य.

६. **चिकित्सक विचारप्रक्रिया** (Critical thinking) : उपलब्ध माहितीचे विश्लेषण व परीक्षण वस्तुनिष्ठपणे करण्याचे कौशल्य.

७. **सर्जनशील विचारप्रक्रिया** (Creative thinking) : पारंपरिक व पुनरावृत्तीने आढळणाऱ्या पद्‌धतीपेक्षा वेगळ्या व अभिनव पद्‌धतीने एखाद्या समस्येबद्‌दल किंवा परिस्थितीबद्‌दल विचार करण्याचे कौशल्य.

८. **आंतरव्यक्ती संबंध** (Interpersonal relations) : दैनंदिन जीवनात सतत संपर्कात असलेल्यांबरोबरचे संबंध ओळखून निर्भेळ व स्नेहपूर्ण संबंध राखण्याचे कौशल्य.

९. **भावनांचे समायोजन** (Coping with emotions) : आपल्या व इतरांच्या भावना, तसेच त्यांचे परिणाम ओळखून त्यांवर नियंत्रण ठेवण्याचे कौशल्य.

१०. **ताणतणावांशी समायोजन** (Coping with stress) : ताणतणावांची कारणे शोधून त्यांचे होणारे शारीरिक व मानसिक परिणाम लक्षात घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य.

वर नमूद केलेली जीवन-कौशल्ये वर्गाध्यापनाच्या माध्यमातून साध्य करणे अपेक्षित आहे. इतिहास अध्यापनाची उद्‌दिष्टे व ही जीवन-कौशल्ये यांची योग्य सांगड घातल्यास वरीलपैकी बऱ्याच जीवन-कौशल्यांचा परिपोष विद्यार्थ्यांमध्ये करणे शक्य होईल.

## 'आज्ञापत्रातील' पर्यावरण रक्षण

रामचंद्रपंत अमात्यांनी 'आज्ञापत्र' लिहिले. यात शिवाजीमहाराजांच्या धोरणांचे प्रतिबिंब आढळते. खालील उताऱ्यातून महाराजांचा पर्यावरणासंबंधीचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

"आरमारास तक्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लाकडे असावी लागतात. आपले राज्यात अरण्यात सागवानादि वृक्ष आहेत, त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूर लेहून हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहित जे लागेल ते परमुलकीहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरून हेही लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची, परंतु त्यांस हात लाऊ न द्यावा. काय म्हणोन की, ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात असे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरांसारखी बहुत्‌काळ जतन करून वाढविली. ती झाडे तोडिल्यावर त्यांचे दुःखास पारावार काय? एकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारास हित स्वल्पकाळाचे बुडोन नाहीसेच होते; किंबहुना धनियाचेच पदरी प्रजापीडण्याचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीही होते. याकरिता हे गोष्टी सर्वथैव होऊ न द्यावी. कदाचित एखादे जे झाड बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याचे संतोषे ते तोडून न्यावे..."



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

रु. १३.००